CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक ३६१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हीं आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नित आपण आपल्या घरात आई स्वयंपाक करताना पाहतो. ती चुलीत लाकडे सरकवत असते. शिजविण्याच्या गरजेनुसार ती लाकडे पुढे मागे करते. काही वर असलेली लाकडे खाली जातात, मध्यभागी वा आत असतात, ती बाहेर काढते किंवा नवीन लाकडे घालते. आपणही सारे भारतमातेसाठी काम करीत आहोत. या यज्ञकुंडात गरजेनुसार आपली आहुती द्यायची आहे. काही वेळा आपल्याकडे पद असेल, काही वेळा नसेल. कधी आपण वर असू तर कधी खाली. आपले काम जळण्याचे आहे.


**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## महत्त्वाचे

### तीन सत्रांनंतर बाजार वधारला

**मुंबई** : सलग तीन सत्रांतील तोट्यानंतर भारतीय शेअर बाजारात सोमवारी सकारात्मक वातावरण दिसून आले. जागतिक बाजारातील तेजीमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला. निर्देशांक आणि निफ्टी दोन्हींमध्ये वाढ नोंदविण्यात आली. निर्देशांक ३१९ अंकांनी वाढून ८३,५३५ वर बंद झाला तर निफ्टी ८२ अंकांच्या वाढीसह २५,५७४ वर स्थिरावला. दिवसभरात बहुतांश शेअर्स वधारले होते. आयटी क्षेत्राने सर्वाधिक वाढ नोंदवली. या क्षेत्रात पुन्हा एकदा खरेदीचा प्रवाह दिसून आला. याशिवाय ऊर्जा, धातू, औषध कंपन्या आणि बँक शेअर्सही तेजीत राहिले. माध्यम जगत, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील शेअर्समधील तोट्याने बाजारात मोठी वाढ झाली नाही. ■

### धर्मेंद्र यांची प्रकृती चिंताजनक



**मुंबई** : ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती सोमवारी अचानक बिघडली. त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना जीवनरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांची एक टीम त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. डॉक्टरांचे म्हणणे आहे की, पुढील ७२ तास धर्मेंद्र यांच्यासाठी अत्यंत कठीण असतील. धर्मेंद्र यांचे कुटुंबीय रुग्णालयात उपस्थित आहेत तर त्यांच्या मुलींना अमेरिकेतून बोलाविण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी हेमा मालिनी या देखील ताबडतोब रुग्णालयात पोहोचल्या. ■

# लाल किल्ल्याजवळ स्फोट; दिल्ली हादरली

## कारमध्ये झाला स्फोट; १० ठार, २४ जखमी

**● कित्येक वाहनांना आग ● मुंबई, उत्तरप्रदेशला अतिसतर्कतेचा इशारा**



कारमध्ये भीषण स्फोट झाल्यानंतर आजूबाजूच्या अनेक वाहनांच्या चिंधड्या उडाल्या. अनेक वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली

**◆ नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**
**दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी सायंकाळी पावणेसात वाजताच्या सुमारास एका वाहनात झालेल्या भीषण स्फोटात १० जण ठार तर २४ जखमी झाले आहेत. यापैकी तीन जणांची प्रकृती गंभीर असून जखमींना लोकनायक जयप्रकाश नारायण रुग्णालयात दाखल करण्यात आले. भीषण स्फोटानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.**

या स्फोटामुळे परिसरातील कित्येक वाहनांना आग लागली. या स्फोटानंतर मुंबईपासून ते उत्तरप्रदेशपर्यंत अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला. स्फोटात जखमी झालेल्या नागरिकांना रुग्णालयात नेणाऱ्या रुग्णवाहिकांसाठी वाहतूक व्यवस्थेत विशेष बदल करण्यात आले होते. स्फोटाची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सायंकाळची वेळ असल्याने चाकरमाने घराकडे जात असल्याने वाहनांची मोठी गर्दी होती. साडेसहाच्या सुमारास लाल किल्ल्याजवळील मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ कारमध्ये स्फोट झाला. अचानक झालेल्या स्फोटच्या घटनेने एकच धावपळ उडाली. स्फोट होताच वाहनांमध्ये आग लागली. स्फोटके उच्च क्षमतेची असल्याने सात ते आठ वाहनांचे मोठे नुकसान झाले. काही जखमी रस्त्यावर विव्हळत होते. स्फोटाची माहिती मिळताच स्थानिक पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जवळच्या लोकनायक जयप्रकाश नारायण रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. स्फोटाच्या भीषणतेमुळे जवळपासच्या दुकानांच्या काचा फुटल्या. या स्फोटानंतर दिल्लीत अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला.

दरम्यान, अग्निशमन दलाचे सात बंब घटनास्थळी पाठवण्यात आले.

> लाल किल्ल्याजवळ एका आय-२० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटाची झळ काही वाहने आणि लोकांना बसली. काही लोकांचा या स्फोटात मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखा, विशेष शाखेचे अधिकारी, एनएसजी आणि एनआयएचे पथक माहिती तसेच पुरावे गोळा करीत आहे. आम्ही सर्वच शक्यतांची पडताळणी करीत आहोत. जो निष्कर्ष समोर येईल, तो लोकांसमोर ठेवला जाईल.
>
> **अमित शाह,**
> केंद्रीय गृहमंत्री

# देशात घातपाताचा मोठा कट

**● २९०० किलो स्फोटके जप्त ● आठ अतिरेक्यांना अटक**

**◆ श्रीनगर/फरिदाबाद, १० नोव्हेंबर**
काश्मीर, हरयाणा आणि उत्तरप्रदेशात पसरलेल्या जैश-ए-मोहम्मद आणि अन्सार गझावत-उल-हिंद या संघटनांशी संबंधित असलेल्या 'व्हाईट कॉलर' दहशतवादी मॉड्युलचा पर्दाफाश करीत तीन डॉक्टरांसह आठ जणांना अटक तर २९०० किलो स्फोटके जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले.

१५ दिवसांच्या कारवाईनंतर अटक करण्यात आलेल्यांमध्ये फरिदाबाद येथील काश्मीरचा डॉ. मुझम्मील गनी आणि लखनौची डॉ. शाहीनचा समावेश आहे. डॉ. शाहीनच्या वाहनात एके-४७ रायफल सापडली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

जम्मू-काश्मीर पोलिस, उत्तरप्रदेश आणि हरयाणा पोलिस दलासह केंद्रीय यंत्रणांनी केलेल्या संयुक्त कारवाईत हे यश मिळाले, असे अधिकाऱ्याने सांगितले. दहशतवाद्यांना नेमकी अटक कधी करण्यात आली, याची माहिती मात्र अधिकाऱ्यांनी दिली नाही. या कारवाईसह पोलिसांनी भारतातील इसिसची प्रतिबंधित शाखा अन्सार गझावत-उल-हिंद आणि जैश-ए-मोहम्मद या दोन्ही संघटनांचा विध्वंसक कट उधळला.

२९०० किलो स्फोटकांमध्ये अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम नायट्रेट आणि सल्फरचा समावेश आहे. यापैकी ३६० किलो अत्यंत ज्वालाग्रही समजला जाणारा अमोनियम नायट्रेट असल्याचा संशय आहे. फरिदाबाद येथे मुझम्मील गनीने भाड्याने घेतलेल्या घरातून काही शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, अशी माहिती जम्मू-काश्मीर पोलिसांनी दिली. विविध ठिकाणांहून जप्त केलेल्या वस्तूंमध्ये दारूगोळ्यासह एक चायनीज स्टार पिस्तूल व तिची काडतुसे, एके-५६ रायफल व काडतुसे, एके-क्रिन्कोव्ह रायफल आणि काडतुसे, स्फोटके, रसायने, अभिकर्मक, ज्वालाग्रही पदार्थ, इलेक्ट्रॉनिक सर्किट, बॅटरी, वायर, रिमोट कंट्रोल, टायमर्स आणि धातूचे पत्र्यांचा समावेश आहे. नवी दिल्लीजवळील हरयाणाच्या अल फलाह विद्यापीठात शिक्षक असलेल्या गनी जम्मू-काश्मिरात जैशचे समर्थन करणारे पोस्टर्स लावण्याच्या प्रकरणात पोलिसांना हवा होता. ◂(वृत्तसंस्था)

# मुलाच्या अपघाती मृत्यूमुळे खचलेल्या आई-वडिलांची गळफासाने आत्महत्या

### सांगोला तालुक्यातील हतीद येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१० नोव्हेंबर -**
चार वर्षांपूर्वी झालेल्या मुलाच्या अपघाती मृत्यूमुळे खचून गेलेल्या वामन महादेव घाडगे (वय-६२) व अनिता वामन घाडगे (वय-५५) या आई-वडिलांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सांगोला तालुक्यातील हतीद येथे सोमवार दि.१० नोव्हेंबर रोजी दुपारी दीडच्या सुमारास घडली.

याबाबत विकास वामन घाडगे रा.हतीद, ता.सांगोला यांनी सांगोला पोलिस ठाण्यात मी माझे मोटारसायकल घेवून हतीद गावात ग्रामपंचायत मध्ये कामानिमित्त गेलो होतो. त्याचवेळी माझी पत्नी स्वाती ही माझे चुलते विलास घाडगे यांचे घरी गेली होती. माझे आई-वडील घरीच शेतामधील काम करीत होते. दुपारी दीडच्या दरम्यान माझे हतीद गावामधील काम संपवुन घरी आलो. त्यावेळी स्वयंपाकाची पत्राची खोलीचे दोन्ही दार आतील बाजुने बंद होते. त्यामुळे मी पत्राचे सिमेंटच्या खिडकीतुन आतमध्ये पाहीले असता लोखंडी अँगलला माझे वडील व आई यांनी गळफास घेतल्याचे दिसत होते. त्यामुळे मी लगेच आराडा ओरड करून खोलीचा पाठीमागील दरवाजा जोराने ढकलून उघडला होता. त्यावेळी माझे आई-वडीलांनी वेगवेगळे साडीला खोलीचे मध्यभागी असलेल्या लोखंडी अँगलला गळफास घेतला होता. माझे आईवडील हे माझा भाऊ आकाश याचा अपघातामध्ये मृत्यू झाले नंतर त्याचे मरणानंतर खचले होते. त्यामुळे त्यांचा स्वभाव चिडचिडी आणि रागीट स्वरूपाचा झाला होता. त्यामुळे त्यांचे मध्ये कोणत्या तरी कारणांवरून चिडचिड झाल्याने त्या रागाचे भरात आज रोजी दुपारी दीडच्या पुर्वी माझे आई-वडीलांनी घरातील लोखंडी अँगलला गळफास घेवून आत्महत्या केली आहे अशी खबर दिली आहे. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.



वामन घाडगे | अनिता घाडगे

# अजितदादांचा रूपाली पाटील, अमोल मिटकरींना धक्का

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्ते पदावरून हकालपट्टी

**◆ मुंबई, १० नोव्हेंबर**
मागील काही दिवसांपासून वेगवेगळ्या मुद्यांवर बेधडक विधाने करून आपल्याच पक्षाची राजकीय कोंडी करणाऱ्या रूपाली पाटील व आमदार अमोल मिटकरी यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्ते पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे.

रूपाली पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्यावर तिखट हल्ला चढवला होता. तर, मिटकरी यांच्या विधानांमुळे सत्ताधारी महायुतीत तणाव निर्माण होताना दिसून येत होता. परिणामी राष्ट्रवादी काँग्रेसने या दोघांनाही प्रवक्ते पदावरून दूर करून स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. मिटकरी एकनाथ शिंदे आणि शिवसेनेवर सातत्याने टीका करीत होते. तसेच कोकणातील भारतीय जनता पक्षाच्या बड्या नेत्यांवरही त्यांनी तोंडसुख घेतले होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने सोमवारी पक्षाच्या १७ नव्या प्रवक्त्यांची यादी जाहीर केली. त्यात रूपाली पाटील व अमोल मिटकरी या दोन नेत्यांची नावे नाहीत. या यादीद्वारे राष्ट्रवादीने अनिल पाटील, चेतन तुपे, सना मलिक, हेमलता पाटील, राजीव साबळे, सायली दळवी, रूपाली चाकणकर, आनंद परांजपे, राजलक्ष्मी भोसले, प्रतिभा शिंदे, प्रशांत पवार, शशिकांत तरंगे, ब्रिजमोहन श्रीवास्तव, अविनाश आदिक, सुरज चव्हाण, विकास पासलकर व श्याम सनेर यांच्यावर प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपवली आहे. या नव्या नियुक्त्यांसह जुन्या प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# विट्यात भीषण आग; लहान मुलीसह चौघांचा मृत्यू

### शॉर्ट सर्किटमुळे घडलेली सोमवार सकाळची घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि.१० नोव्हेंबर -**
विट्यात भांड्याच्या दुकानाला लागलेल्या भीषण आगीत दोन वर्षांच्या मुलीसह चौघांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. अग्निशमन दलासह नागरिकांच्या मदतीने आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले तरी या दुर्घटनेत मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्त हानी झाली.

दुकानमालक विष्णू पांडुरंग जोशी (वय ४७), त्यांची पत्नी सुनंदा विष्णू जोशी (वय ४२), मुलगी प्रियांका योगेश इंगळे (वय २५) आणि नात सृष्टी योगेश इंगळे ( वय २) अशी मृत चौघांची नावे आहेत. विट्यातील सावरकरनगरमध्ये असणाऱ्या विष्णू जोशी यांचे घर आणि दुकान अशी तीन मजली इमारत आहे. यातील पहिल्या मजल्यावर असलेल्या जय हनुमान स्टील सेंटर दुकानाला आज सोमवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे अचानक भीषण आग लागली. या आगीत दुकानमालक जोशी, त्यांची पत्नी सुनंदा, मुलगी प्रियांका आणि नात सृष्टी या चौघांचा होरपळून मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली. ही भीषण आग लागल्याचे कळताच तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. सुरुवातीच्या काळात कमी प्रमाणात वाटणारी आग परिसरातील नागरिकांनी विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु, या आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले.





विटा नगरपालिकेचा अग्निशमन बंब तातडीने घटनास्थळावर दाखल झाला. सतर्क नागरिकांच्या मदतीने आग विझविण्याचा प्रयत्न त्यांनी सुरी केला. विट्यातील मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या सावरकरनगरमध्ये विष्णू जोशी यांच्या स्वतःच्या तीन मजली इमारतीत पहिल्या मजल्यावर जय हनुमान स्टील सेंटर दुकान आहे. तर उर्वरित इमारतीत जोशी यांचे कुटुंब राहते. दरम्यान आज सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास जय हनुमान स्टील सेंटर दुकानाच्या शटरमधून अचानक धूर येताना दिसला. या आगीची माहिती विटा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला देण्यात आली. त्यानंतर तातडीने विटा नगरपालिकेचा अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाला. घटनास्थळी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. या अचानक लागलेल्या आगीत इमारतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर जोशी कुटुंबातील सहाजन अडकले होते. आजुबाजूला घरे एकमेकांना चिटकून असल्याने ही आग विझवण्यासाठी आणि मदत कार्यात अडथळे येत होते. दहा वाजण्याच्या सुमारास कडेगांव, क्रांती साखर कारखाना कुंडल, उदगिरी कारखाना, पलुस आणि तासगाव येथून अग्निशमन वाहने आणून आग आटोक्यात आणण्याचा शर्थीचे प्रयत्न सुरू होते.

# पवनचक्की कंपनीच्या गाडीखाली पादचारी ठार!

**● संतप्त नागरिकांकडून वाहनांची तोडफोड**

**वाशी, दि. १० नोव्हेंबर-**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील शमशानभूमी परिसरात पवनचक्की कंपनीच्या अवजड साहित्याची वाहतूक करणाऱ्या गाडीखाली एक पादचारी चिरडून ठार झाला. ही घटना सोमवारी (दि.१० नोव्हेंबर) रात्री साडेसातच्या सुमारास घडली.

सविस्तर माहिती अशी की, कडकनाथवाडी शिवारात पवनचक्की उभारणीची कामे सुरू आहेत. त्यासाठी अवजड साहित्याची वाहतूक सुरू असताना तेरखेडा गावाकडून कडकनाथवाडी दिशेने जाणाऱ्या ट्रकने पादचाऱ्याला जोराची धडक दिली. या अपघातात दशरथ कुंभार (वय ५५, रा. कडकनाथवाडी) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला. संतप्त नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत पवनचक्की कंपनीच्या वाहनांची तोडफोड केली. अपघातानंतर वाहन चालकांनी काही अंतरावर वाहने उभी करून पसार झाल्याची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच येरमाळा पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली येरमाळा पोलीस करत आहेत. स्थानिक नागरिकांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना अटक केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.



### नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी

# पहिल्या दिवशी ६६४ उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी

**मुंबई, दि. १० नोव्हेंबर:**
निवडणूक होत असलेल्या २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता आजपासून नामनिर्देशपत्र सादर करण्यास सुरुवात झाली असून, त्यासाठी ६६४ उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांतील उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र दाखल करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येईल. एका नोंदणीद्वारे संबंधित प्रभागात एका उमेदवारास चार नामनिर्देशनपत्र दाखल करता येऊ शकतील. संकेतस्थळावर संपूर्ण नामनिर्देशनपत्र व शपथपत्र भरल्यानंतर त्याची मुद्रित प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करावी लागेल. त्यानंतर ती प्रत विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे आवश्यक राहील. इच्छूक उमेदवारांनी आताच ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करून घ्यावी व आपला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा. आताच ऑनालाईन नोंदणी करून ठेवल्यास ऐनवेळी होणारी धावपळ टळू शकेल. नामनिर्देशनपत्रांतील आणि शपथपत्रांतील संपूर्ण माहिती भरल्यानंतर प्रिंटआऊटवर सही करून ती संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबरपर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे सुलभ होईल. संकेतस्थळावरील ऑनलाईन माहिती मात्र १७ नोव्हेंबरला दुपारी २ वाजेपर्यंतच भरता येईल, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

# सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी आज प्रभाग आरक्षण सोडत

- **सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले; उत्सुकता शिगेला**
- **हरकती व सूचनांसाठी १७ ते २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर -**
सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम होणार आहे. या प्रारूप आरक्षण सोडती नंतर हरकती व सूचना मागविण्यासाठी दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आता राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचना आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदीर, सोलापूर येथे महिलांचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. प्रारूप आरक्षण सोडती नंतर प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यासाठी विहित नमुन्यात दि. १७ नोव्हेंबर २०२५ ते २४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन महानगरपालिका आयुक्त हे दि. २५ नोव्हेंबर २०२५ ते दि. १ डिसेंबर २०२५ या कालावधीत निर्णय घेणार असून अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात सादर करण्याचा दि. २ डिसेंबर २०२५ असा आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीकरीता, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित कशापध्दतीने करण्यात येणार आहे. याची माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या https://www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात आलेली आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी म्हटले आहे.



CMYK


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे...



### नाझरे बंधारा येथील गळती बंद करा; शेतकऱ्यांची मागणी

**सांगोला, दि. १० नोव्हेंबर-**

नाझरे (ता. सांगोला) येथील मान नदीवरील बंधाऱ्यातून लाखो लिटर पाणी वाया जात असून, अद्याप दरवाजे न बसवल्याने व त्याची गळती सुरू असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. त्यामुळे ताबडतोब दरवाजे टाकून गळती बंद करा व बंधाऱ्याची दुरुस्ती करा अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे. नाझरे, वझरे, बलवडी या परिसरासाठी हा बंधारा बांधला आहे. आसपासच्या बंधाऱ्याचे दरवाजे टाकले आहेत. परंतु नाझरे येथील दरवाजे न बसवल्याने व गळती न रोखल्याने पाणी दरवाजा मधून चिळकांड्या मारीत आहे. त्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. तसेच दरवाजे न टाकल्याने पाऊस पडून उपयोग काय असा प्रश्न शेतकरी वर्गात केला जात आहे.




### गैरमार्गाने पुतळा हटविणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

सांगोला तालुक्यातील चिणके येथील मालमत्ता क्रमांक ७२७ मध्ये छत्रपती संभाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे बसविले होते. त्यापैकी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गैरमार्गाने हटवुन गटविकास अधिकारी कुलकर्णी व तहसिलदार कणसे यांनी महामानवाच्या पुतळयाची अवहेलना केली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रशासकिय व फौजदारी कारवाई करण्यात यावी, म्हणून सोमवार दि. ३ नोव्हेंबरपासून चिणके गावापासून पायी लाँगमार्च व दि. ७ नोव्हेंबरपासून सोलापूर जिल्हा परिषद समोर बेमुदत धरणे आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. पंचायत समिती प्रशासन व तहसिल प्रशासन यांचेवर गावातील विनायक मिसाळ यांचे वर्चस्व असुन त्यांच्या सांगण्यावरुन प्रशासनाने खोटी व दिशाभुल करणारी माहिती कळविली आहे. याची शहानिशहा करावी. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गैरमार्गाने हटविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी चिणके येथील अबालवृध्द, महिला मोठ्या संख्येने उपोषणाला बसले आहेत.



### डॉ. हिमालय घोरपडे यांचा सन्मान

**सांगोला, दि. १० नोव्हेंबर -**

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श प्रशालेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुवर्णप्रभा घोरपडे यांचे चिरंजीव डॉ. हिमालय घोरपडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांचा आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे, सचिव निलकंठ शिंदे, डॉ.बाळकृष्ण घोरपडे, सुवर्णप्रभा घोरपडे उपस्थित होते.

### ओव्हरक्राऊडिंगमुळे कैद्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन; छावाचा कोर्टात अर्ज

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

जिल्हा कारागृहाची अधिकृत क्षमता केवळ १०० कैद्यांची असताना, सध्या या तुरुंगात तब्बल ५०२ कैदी बंदिस्त आहेत. त्यापैकी ४४६ पुरुष आणि ५६ महिला कैदी आहेत. कारागृहात क्षमतेपेक्षा पाचपट जास्त कैदी ठेवण्यात आल्यामुळे तुरुंगातील परिस्थिती अत्यंत अमानवी आणि असह्य बनली असून, कैद्यांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे. या गंभीर परिस्थिती विरोधात छावाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माहिती अधिकार कार्यकर्ते ॲड. योगेश पवार यांनी सोलापूर येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांचेकडे औपचारिक कायदेशीर अर्ज दाखल केला आहे. या अर्जात म्हटले आहे की, जिल्हा कारागृहात क्षमतेपेक्षा अनेक पटींनी अधिक कैदी ठेवणे हे संविधानाच्या कलम २१ अंतर्गत हमी दिलेल्या जीवन व प्रतिष्ठेच्या अधिकाराचे उघडपणे उल्लंघन आहे. तुरुंगातील गर्दीमुळे शौचालय, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा आणि महिला कैद्यांसाठी स्वतंत्र व सुरक्षित वॉर्ड अशा मूलभूत सुविधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तातडीने बैठक बोलावून सर्व कच्चे कैद्यांच्या प्रकरणांचा पुनर्विचार करावा. पात्र कैद्यांची तातडीने सुटका करून महिला कैद्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित व स्वच्छ वॉर्ड स्थापन करावे आणि तुरुंगातील आरोग्य, स्वच्छता व निवास सुविधांचा आढावा निरीक्षण समितीमार्फत घेण्याची मागणी ॲड. पवार यांनी केली आहे.

# समाजकल्याण विभागाच्या योजनांपासून लाभार्थी वंचित

## निवडणूकांमुळे अधिकारी व्यस्त असल्याचे कारण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची जोरदार चर्चा सुरु आहे. तर नगरपालिका व नगरपंचायत निवडणुका जाहीर झाल्याने आचारसंहीता सुरू झाली आहे. यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूका जाहीर होण्याची शक्यता असून त्यादृष्टीने प्रशासनाची तयारी सुरू आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील लकी ड्रॉ काढून लाभार्थ्यांना लाभ देणे गरजेचे आहे. मात्र जिल्हा परिषद समाज कल्याण विभागातील योजनांसाठी लाभार्थ्यांची नावे निश्चित करण्यासाठी वेळच मिळत नसल्याने लाभार्थी लाभापासून वंचित आहेत.

> समाजकल्याण विभागाकडून मागासवर्गीयसह दिव्यांगांसाठी विविध लाभाच्या योजना राबविण्यात येतात. त्या योजनांचा लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळणे आवश्यक आहे. मात्र समाजकल्याण विभागाच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थी लाभापासून वंचित आहेत. त्यामुळे लाभार्थी निवडीसाठी लकी ड्रॉ काढावे.
>
> - **नितीन रणखांबे,** तालुकाध्यक्ष, भाजपा अनूसूचित जमाती मोर्चा, दक्षिण सोलापूर

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनेची लॉटरी अद्याप काढण्यात आली नाही. त्यामुळे समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचे लाभ मिळविण्यासाठी जिल्ह्यातील अनेक मागासवर्गीय लाभार्थ्यांनी अर्ज दाखल केले आहेत. अर्ज दाखल करूनही आता महिना दीड महिने झाले. परंतु अद्याप वैयक्तिक लाभाच्या योजनेची लॉटरी काढण्यात आले नाही. कृषि, पशुसंवर्धन सह इतर विभागाने वैयक्तिक लाभाच्या योजनेची लॉटरी काढून साहित्याची खरेदी सुरू केली आहे. परंतु समाजकल्याण विभागाकडून अद्याप लॉटरी काढली नसल्याने लाभार्थ्यांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा परिषद सेस फंडातून समाजकल्याण विभागाकडून विविध योजना मागासवर्गीय नागरिकांसाठी राबविल्या जातात.

यासह दिव्यांगासाठी देखील अनेक योजना राबविल्या जातात. अनेक दिव्यांग बांधवही वैयक्तिक लाभाच्या योजनेची लॉटरी कधी निघेल ? याची विचारणा करण्यासाठी हेलपाटे मारत आहेत. मात्र प्रभारी अधिकारी असल्यामुळे लाभार्थी लॉटरी काढण्यासाठी मूहूर्त मिळत नसल्याचे दिसुन येते.

# तांडोर येथे अवैध वाळूसह अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० नोव्हेंबर**

तांडोर येथील भीमानदी पात्रातून अवैधरित्या वाळू भरुन जाणारे वाहनासह २ लाख ५२ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांच्या माहितीनुसार तांडोर येथील भीमा नदी पात्रातून बिगर नंबरचा टाटा एन्ट्रा कंपनीचे वाहन (छोटा हत्ती) दि.६ रोजी रात्री दीड वाजता बेकायदा २ हजार ३७५ रुपये किंमतीची अर्धा ब्रास वाळू घेवून जात असताना ग्राम महसूल अधिकारी संदीप पवार (रा.अजनाळे) यांनी पकडून वाहनासह २ लाख ५२ हजार ३७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन पोलीसांच्या ताब्यात दिला. सदर वाहनाचा चालक अंधाराचा फायदा घेवून वाहन जागीच सोडून पळून गेला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस हवालदार मनोज खंडागळे करीत आहेत. दरम्यान भीमा नदी पात्रातील पाणी कमी झाल्यामुळे वाळू तस्करवाले रात्री वाळू उपसा करुन त्याची विक्री करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. महसूल व पोलीस प्रशासन यांनी यापुढे डोळ्यात तेल घालून वाळू चोरी रोखून संबंधीतावर कारवाई करावी अशी मागणी पुढे येत आहे. सदर वाहनावर मागे व पुढील बाजूस दोन्ही ठिकाणी नंबर नसल्याचे निदर्शनास आले.

# अल्पवयीन मुलीवर शेजाऱ्याकडून अत्याचार; गर्भवती झाल्यानंतर उघड झाले प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१० नोव्हेंबर-**

बार्शी तालुक्यातील पांगरी गावात अल्पवयीन मुलीवर शेजारी राहणाऱ्या तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. पीडित १७ वर्षांची असून, ती सध्या १८ आठवड्यांची गर्भवती असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात पृथ्वीराज ऊर्फ संजय चांदणे (रा. पांगरी, ता. बार्शी) याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचार, फसवणूक, तसेच बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पीडित मुलगी सुमन (नाव बदलले सुमन) ही आपल्या आई-वडिलांसोबत पांगरी येथे वास्तव्यास असून, तिचे आई-वडील मजुरी करुन कुटुंबाची उपजीविका चालवतात. संशयित आरोपी पृथ्वीराज ऊर्फ संजय चांदणे हा त्यांचा शेजारी असून, गेल्या दोन वर्षांपासून त्याची पीडितेशी ओळख होती. या ओळखीचा गैरफायदा घेत त्याने तिच्या घरात ये-जा सुरु केली. सुमारे चार महिन्यांपूर्वी, मुलगी घरी एकटी असताना त्याने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केला. त्यानंतरही आरोपीने वारंवार असेच कृत्य केले. अल्पवयीन असल्याचे माहीत असूनही आरोपीने तिला फसवून तिचा गैरवापर केला, असे फिर्यादीने सांगितले आहे. 'आपण लग्न करु, हे कुणालाही सांगू नकोस' असा दम आरोपीने तिला दिला होता. दरम्यान, काल सकाळी पोटदुखीचा त्रास झाल्याने पीडित मुलगी व तिची आई उपचारासाठी श्रद्धा हॉस्पिटल, बार्शी येथे गेल्या. तेथे तपासणीदरम्यान डॉक्टरांनी पीडित मुलगी १८ आठवड्यांची गर्भवती असल्याचे सांगितले. त्यानंतर डॉक्टरांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

हॉस्पिटलमध्ये पोलीस पोहोचले असता त्यांनी प्राथमिक चौकशी करुन पीडित व तिच्या आईचा जबाब घेतला. त्यानंतर त्यांनी पांगरी पोलीस ठाण्यात येऊन संशयित आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# अकलुजमध्ये सावकारी करणाऱ्या १० जणांवर गुन्हा

## संशयीत आरोपी परागंदा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलुज,दि.१० नोव्हेंबर-**

खाजगी सावकार सिध्दार्थ पवार याने घरी येवुन गोंधळ घातला तसेच आई-बहिणीवरून शिवीगाळ करून मुददल व व्याजाचे पैसे एका तासामध्ये पाहिजेत व पैसे नाही दिलेतर वाईट होईल अशी धमकी दिली तसेच पत्नी व मुलांना देखील त्यांचे अंगावर धावुन जावुन शिवीगाळ केल्याची फिर्याद येथील मुनावर गुलमहंमद खान (वय ४८) (रा. अकलुज) यांनी दाखल केली आहे.

सन २०२१ पासुन ते वेळोवेळी तसेच दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. खाजगी सावकार आरोपी अनिल मदने, सिद्धार्थ पवार, मनोज साळुंखे, गुरु पवार, सचिन खिलारे (सर्व रा. अकलूज), भैय्या दत्तात्रय जगदाळे (रा. सराटी ता. इंदापुर), सोनु मोहीते (रा. संग्रामनगर ता. माळशिरस), गौरव माने (रा. मळोली ता. माळशिरस), अवधुत शेंडगे (रा. वेळापुर ता. माळशिरस), विलास मारकड (रा. खुडुस ता. माळशिरस) यांच्या रोजच्या त्रासाला कंटाळून फिर्यादी यांनी दि. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी सव्वाबाराचे सुमारास नविन एस. टि. स्टॅन्ड समोर बागेत बुटेक्स नावाचे विषारी औषध पिले व तेथेच बेशुध्द पडले असता त्यांचे ओळखीचे लोकांनी फिर्यादी यांचे घरी सांगितल्यावर फिर्यादीच्या मुलाने फिर्यादीस उपचाराकरीता अकलुज येथील अपेक्स हॉस्पिटल येथे दाखल केले होते. दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी फिर्यादी हे शुध्दीवर आल्यानंतर त्यांचा अपेक्स हॉस्पीटल येथे जबाब नोंद करुन त्यांनी वरील नमुद आरोपी विरुध्द फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीचा त्यांचे राहते घरी शोध घेतला असता मिळुन आलेले नाहीत ते गुन्हा दाखल झाल्यापासुन परागंदा झालेले आहेत. त्याच्याबाबत काही माहिती मिळताच अकलुज पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा. वरील आरोपीबाबत व इतर खाजगी सावकारीची तक्रार असल्यास अकलुज पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा असे आवाहन अकलुज पोलीस ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'जन्नतुल फिरदोस कब्रस्तान सांस्कृतिक भवन' उभारणीच्या कामाचे भूमिपूजन

**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधीतून सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ मध्ये 'जन्नतुल फिरदोस कब्रस्तान सांस्कृतिक भवन' उभारणीच्या कामाचे भूमिपूजन नुकतेच प्रदेश सरचिटणीस नजीब भाई मुल्ला यांच्या हस्ते झाले.




यावेळी शहर काजी जनाब अमजद सय्यद, अब्दुल राफे, मौलाना इब्राहिम कासमी सदर, शहा इकबाल हुसेन दुर्वेश, हाजी मकबूल मोहोळकर, शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, कब्रस्तान ट्रस्टचे अध्यक्ष पैगंबर इमाम शेख, माजी नगरसेवक तौफिक शेख, माजी स्थायी समिती सभापती रियाज हुंडेकरी, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, रियाज खैरादी, माजी नगरसेविका नूतन गायकवाड, प्रदेश सचिव इरफान शेख, अल्पसंख्यांक आयोग सदस्य वसीम बुराण, माजी परिवहन सभापती आनंद मुस्तारे, फारुख मटके, रियाज शेख, सायरा शेख, शिपन शेख, युसुफ पठाण, जमीर मुल्ला, शहाजान शेख, जाकीर कवठेकर, सिकंदर शेख, कोशन कुरेशी, फारूक बागवान, अहमद कासिम आळगी आदी उपस्थित होते. या प्रकल्पासाठी ५० लाख रुपयांचा निधी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झाला आहे. किसन जाधव यांनी प्रास्ताविकात प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे सांगून अल्पसंख्यांक, मोची, गवळी, मराठा, लिंगायत सर्व समाजांसाठी सांस्कृतिक भवन उभारणीची कामे सुरू असून ती लवकरच पूर्ण होतील असे सांगितले. मुस्लिम धर्मगुरू मौलाना इब्राहिम कासमी यांनी जाधव आणि गायकवाड यांच्या कार्याने मुस्लिम समाजात एकतेची ज्योत पेटल्याचे सांगितले. यावेळी नजीब मुल्ला यांनी वॉल कंपाऊंड, रस्ता तसेच अल्पसंख्यांकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा सत्कार किसन जाधव, नागेश गायकवाड आणि युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला.

# छत्रपती ब्रिगेडच्या वतीने शिवप्रताप दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

छत्रपती ब्रिगेडच्या वतीने १० नोव्हेंबर शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हद्दवाढ भागातील शिवप्रताप चौक येथील नामफलकास व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास छत्रपती ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष श्याम कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद शेळके विकास बचुटे, प्रवीण सोमवंशी, नितीन गायकवाड, ज्ञानेश्वर पवार, गणेश वर्डे, धर्मा माने,सीताराम बाबर, श्रीनिवास कोळी, तुळशीराम राठोड, आकाश चव्हाण, गौरीशंकर वरपे, श्रवण साळुंखे, धनराज गायकवाड, रावसाहेब प्रक्षाळे, महेश तेलूर उपस्थित होते.

# नाफेड योजनेतून ७ ठिकाणी होणार हमीभाव दराने शेतमालाची खरेदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

नाफेड योजनेतून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतीमाल खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात ७ ठिकाणी खरेदी केंद्र सुरु करण्यात येत असल्याची माहिती राज्य पणन विभागाचे विभागीय व्यवस्थापक मनोज वाजपेयी यांनी दिली.



बार्शी तालुक्यातील तुळजाभवानी कृषी साधन व पुरवठा सहकारी संस्था, उंबरगे, करमाळा तालुक्यातील विठ्ठल सर्वसाधारण सहकारी संस्था मांगी, माढा तालुक्यातील माढा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, माढा, पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर तालुका खरेदी विक्री संघ, मंगळवेढा तालुक्यातील मंगळवेढा तालुका खरेदी विक्री संघ, माळशिरस तालुक्यातील शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ, अकलूज व अक्कलकोट तालुक्यातील विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, किणी या संस्थेच्या वतीने हमीभावाने शेतमालाची खरेदी होणार आहे.

हमीभावाने खरेदी करण्यात येणारा शेतीमाल हा संबधित तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीत खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना पुर्वनोंदणी करणे आवश्यक आहे.

१५ नोव्हेबर पासून संबधित बाजार समितीत यासाठी नोंदणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना मालाची नोंदणी करण्यासाठी पिक नोंदणीचा सात बारा उतारा, बँक पासबुक, आधार कार्ड प्रतसह नोंदणी केंद्रात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

यंदा मुगासाठी ८ हजार ७६८, उडिदासाठी ७ हजार ८०० तर सोयाबीनसाठी ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल दर जाहीर करण्यात आला आहे. नाफेडच्या निकषानुसार हमीभावाने शेतमालाची खरेदी करण्यात येणार आहे.

# मनुष्य जन्माच्या सार्थकतेसाठी भगवंताचे नामस्मरण आवश्यक

## तिरुपती देवस्थानचे अध्यात्मिक सल्लागार डॉ. चागंटी कोटेश्वर राव

**श्री माता देवी वैभवम कथेवरील प्रवचनाचा भक्तिमय वातावरणात समारोप : भाविकांची प्रचंड गर्दी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

मनुष्याला दिलेली वाणी ही श्री माता देवीची कृपा आहे. मनुष्याच्या जन्माच्या सार्थकतेसाठी त्या वाणीने भगवंताचे स्मरण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन तिरुपती देवस्थानचे अध्यात्मिक सल्लागार डॉ. चागंटी कोटेश्वर राव यांनी केले. वि. दा. सावरकर चॅरिटेबल प्रतिष्ठान आणि संतोषी माता गोशाळा यांच्यातर्फे वल्याळ मैदानावर आयोजित डॉ. राव यांच्या श्री माता देवी वैभवम या विषयावरील तीन दिवसीय अध्यात्मिक प्रवचनाचा समारोप सोमवारी भक्तीमय वातावरणात झाला. याप्रसंगी





भाविकांनी प्रचंड मोठी गर्दी केली होती. यावेळी डॉ. राव म्हणाले की, गाईचा निवास तिथे असतो ती जागा अतिपवित्र असते. वेदांनीही गाईचे महत्त्व सांगितले आहे. गोसेवा करणाऱ्यांच्या घरात लक्ष्मीचा निवास असतो. गाईमध्ये लक्ष्मीचे शाश्वत निवासस्थान असते, असेही डॉ. राव यांनी सांगितले. धनाचा खर्च केला तर धन कमी होते. परंतु विद्या इतरांना दिली तर त्यात वृद्धी होते. विद्या गुरूंचीही गुरु असते. विद्येविना मनुष्य पशुसमान असतो. मनुष्याकडे असलेली विद्या प्रवाहासारखी असावी. आपल्याला अवगत असलेली विद्या सर्वांमध्ये वाटावी, असेही डॉ. चागंटी कोटेश्वर राव यांनी सांगितले.

भगवंताच्या केवळ नामाने मनुष्याची पापे जळून जातात. त्यामुळे शरीरात शक्ती असेपर्यंत ईश्वराचे नामस्मरण करावे. शरीर थकल्यानंतर नामस्मरण करून उपयोग नाही, असेही डॉ. चागंटी कोटेश्वर राव म्हणाले. याप्रसंगी डॉ. राव यांनी श्री शंकराचार्य विरचित सौंदर्य लहरी मध्ये असलेले देवी मातेचे वैभव अत्यंत रसाळ भाषेत विशद केले.

तसेच समुद्रमंथनानंतर शंभू महादेवांनी हलाहल विष प्राशन केलेल्या प्रसंगाची माहिती आणि महत्त्व ओघवत्या वाणीत सांगितले. डॉ. राजेंद्र गाजुल यांनी प्रास्ताविक केले. रेणुका बुधारम यांनी सूत्रसंचालन तर वासुदेव इप्पलपल्ली यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी डॉ. सूर्यप्रकाश कोठे, डॉ. राजेंद्र गाजुल, डॉ. श्रीकांत माकम, सुयश खानापुरे, अमोल जोशी, गणेश बुधारम, आरकाल, भूपती कमटम, नागनाथ पोरंडला, डॉ. प्रभाकर गुंडू, विजय उडता, रामकृष्ण सुंचू, पेंटप्पा गड्डम आदी उपस्थित होते.

# अमेरिकेत तीन दिवसांत सहा हजार उड्डाणे रद्द

## • न्यू यॉर्कसह चार विमानतळे प्रभावित • शटडाऊनचा परिणाम

**वॉशिंग्टन, १० नोव्हेंबर**

अमेरिकेतील सरकारी शटडाऊनचा परिणाम सामान्य लोकांवर पडत आहे. मोठ्या प्रमाणात उड्डाणे रद्द करण्यात आल्याने देशातील विमानतळावर प्रवाशांच्या अडचणी वाढल्या आहेत. एक तर उड्डाणे रद्द केली जात आहेत अथवा त्यांना विलंब होत आहे. शनिवारी अमेरिकी विमान कंपन्यांनी १५०० पेक्षा उड्डाणे रद्द केली. रविवारी ही संख्या वाढून २९०० झाली. तीन दिवसांत सहा हजार उड्डाणे रद्द झाली आहेत. हा निर्णय उड्डयन नियामक संस्था एफएएच्या आदेशानंतर घेण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे उड्डाणांची संख्या कमी करावी लागली आहे.




विमानांचे उड्डाण आणि ते धावपट्टीवर उतरवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडणारे विमान वाहतूक नियंत्रक (एटीसी) जवळपास एक महिन्यापासून बिनपगारी काम करीत आहेत. त्यामुळे कित्येकांनी कामावर येणे बंद केले. त्याचा फटका विमान उड्डाणांना बसत आहे. सोमवारी सकाळपर्यंत १६०० उड्डाणे रद्द करण्यात आली. मंगळवारी जवळपास हजार उड्डाणे रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले. मर्यादित कर्मचाऱ्यांसह सुरक्षितता निश्चित करण्यासाठी या आठवड्याच्या अखेरीपर्यंत उड्डाणांमध्ये१० टक्के कपात करावी लागणार आहे, असे एफएएने स्पष्ट केले. शनिवारी आणि रविवारी चार टक्के कपात करण्यात आली होती. मंगळवारी ती सहा टक्के होणार आहे.

### एटीसीकडे अपुरे कर्मचारी

परिस्थितीत सुधारणा न झाल्यास २० टक्क्यांपर्यंत उड्डाणे रद्द करावी लागू शकतात, असा इशारा परिवहन मंत्री शॉन डफी यांनी दिला. पगार मिळत नसल्याने नियंत्रकांनी कामावर येणे बंद केले. एटीसीच्या अपुऱ्या मनुष्यबळाबाबत सरकार अगोदरच झुंजत आहे. त्यातच शटडाऊनमुळे परिस्थिती गंभीर झाली असल्याचे डफी यांनी सांगितले. कित्येक वरिष्ठ नियंत्रक सेवानिवृत्ती स्वीकारत असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यू यॉर्क, ऑरलँडो आणि डेट्रॉईटसारख्या मोठ्या विमानतळांवर उड्डाणांमध्ये एक तास किंवा त्यापेक्षा जास्त उशीर होते असल्याने स्थिती अतिशय गंभीर झाली आहे. (वृत्तसंस्था)

### ‘थँक्सगिव्हिंग’पर्यंत परिस्थिती खराब

येत्या काही दिवसांत काँग्रेसमध्ये सहमत होईल. पण, परिस्थिती सामान्य होण्यास वेळ लागेल, असे तज्ज्ञांनी सांगितले. शटडाऊन संपुष्टात न आल्यास ‘थँक्सगिव्हिंग’ सुट्यांपर्यंत विमान प्रवास अधिक प्रमाणात मर्यादित होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने तोडगा काढला नाही, तर येत्या काही दिवसांत अमेरिकेची हवाई वाहतूक जवळपास ठप्प होऊ शकते.

# आता चांदीवरही मिळणार कर्ज

## आरबीआयचा निर्णय

**नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

भारतीय रिझर्व्ह बँकेने एक महत्त्वाचा निर्णय घेत नागरिकांना नवीन पर्याय उपलब्ध करून दिला आहे. आता फक्त सोन्यावरच नव्हे तर घरात ठेवलेल्या चांदीवर देखील कर्ज घेता येणार आहे.

आरबीआयने यासाठी अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून ही नवी नियमावली रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया डायरेक्शन्स २०२५ अंतर्गत लागू होणार आहे. हे नियम १ एप्रिल २०२६ पासून देशभरात लागू होतील.

याअंतर्गत खाजगी, व्यावसायिक बँका ज्यात स्मॉल फायनान्स आणि प्रादेशिक बँकांचाही समावेश असेल, अर्बन आणि रूरल को-ऑपरेटिव्ह बँका, एनबीएफसी आणि हाऊसिंग फायनान्स कंपन्या आदींना सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंवर कर्ज देण्याची परवानगी असेल.

फक्त दागिन्यांच्या किंवा नाण्यांच्या स्वरूपातील सोने आणि चांदी यावरच कर्ज दिले जाईल. मात्र, गोल्ड ईटीएफ, म्युच्युअल फंड युनिट्स यावर कर्ज मिळणार नाही, असेही आरबीआयने स्पष्ट केले आहे. यात सोन्याचे दागिने एक किलोपर्यंत, चांदीचे दागिने दहा किलोपर्यंत गहाण ठेवता येतील. (वृत्तसंस्था)



ईशान्य भारतात तिन्ही सेनादलांचा युद्धाभ्यास सुरू आहे. अत्याधुनिक विमाने आणि लढाऊ जहाजे यात सहभागी झाली आहेत. अरुणाचलच्या कठीण पर्वतांवर युद्धाभ्यास करताना लष्कराच्या स्पीअर कॉर्पस्‌चे जवान

# लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही : शिंदे

**ठाणे, १० नोव्हेंबर**

महायुती सरकारची लाडकी बहीण योजना सुरूच राहील, ही योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्यांनी ही योजना बंद पडल्याच्या अफवा फेटाळून लावल्या आहे. त्यांनी निवडणुकीतील महायुतीच्या यशाचे श्रेय या योजनेच्या लाभार्थींना दिले आहे.

कल्याण-डोंबिवलीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात १०० हून अधिक कार्यकर्ते, पदाधिकारी व माजी नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला, यात उबाठा गटाच्या सदस्यांचाही समावेश आहे. उपमुख्यमंत्र्यांनी त्यांना पक्षाचा भगवा दुपट्टा भेट दिला. पुढील महिन्यात राज्यात होणाऱ्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी ही घटना घडली आहे.



महाराष्ट्रात शिवसेनेचा वाढता पाठिंबा सेनेचे संस्थापक दिवंगत बाळासाहेब ठाकरे आणि शिंदे यांचे मार्गदर्शक आनंद दिघे यांच्या आदर्शांचे पालन करण्याला कारणीभूत असल्याचे सांगितले. शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना (२०२२ ते २०२४ पर्यंत) केलेल्या त्यांच्या कामावर प्रकाश टाकला व महिलांना मासिक आर्थिक मदत देणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सर्वात लोकप्रिय योजना आहे. ही योजना कधीही बंद होणार नाही, असे सांगितले.

गत वर्षी भाजपा, शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा समावेश असलेल्या महायुतीला राज्यात पुन्हा सत्तेत आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात मतदान केल्याबद्दल लाभार्थींना श्रेय दिले. संपूर्ण महाराष्ट्रात शिवसेनेत इतके प्रवेश का? कारण ही शिवसेना बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांनी पुढे जाते व शिवसेना आपला शब्द पाळते, हा आत्मविश्वास प्रत्येकाच्या मनात आहे. आणि म्हणूनच लोक आमच्यासोबत येतात, असे शिंदे म्हणाले.

स्थानिक विकासाबाबत बोलताना त्यांनी आपले पुत्र आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण-डोंबिवलीतील कामाचे कौतुक केले. हजारो कोटींच्या प्रकल्पांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, हा प्रदेश आमूलाग्र बदलला आहे. (वृत्तसंस्था)

# महिला आरक्षणाची प्रक्रिया नेमकी अडली कुठे?

## सुप्रीम कोर्टाने केंद्राला बजावली नोटीस

**नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या मुद्द्यावर बऱ्याच काळापासून मंथन सुरू आहे. ही मागणी न्यायालयातही प्रलंबित आहे. यासंदर्भातील प्रक्रिया नेमकी कुठे अडली आहे, अशी विचारणा करत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे.

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयात सांगितले की, सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले, परंतु त्याची अंमलबजावणी एका अशा प्रक्रियेशी जोडली गेली आहे जी अद्याप सुरू झालेलीच नाही. जनगणना सुरू झालेली नाही आणि मर्यादा निर्धारण त्यानंतरच होणार आहे. कायदा मंजूर झाला आहे, तर तो लागू करण्यासाठी अनिश्चित अट का घातली जातेय? त्यासाठी कोणताही तर्कसंगत आधार सांगितलेला नाही किंवा कायमर्यादाही दिलेली नाही.



यावर न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या, कोणता कायदा कधी लागू करायचा हे कार्यकारी (सरकार) विभागाचे काम आहे. न्यायालय एवढेच विचारू शकते की सरकार याबाबत काय प्रस्ताव ठेवत आहे. त्यांनी हेही नमूद केले की, सरकार कदाचित हे वैज्ञानिक आकडेवारीच्या आधारे लागू करू इच्छित असेल.

वकिलांनी प्रत्युत्तरात म्हटले की, जेव्हा सरकारने ३३ टक्के महिला आरक्षणाचा निर्णय घेतला आहे तेव्हा त्यांच्याकडे आधीपासूनच वैज्ञानिक डेटा असला पाहिजे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली असून पुढील सुनावणीत सरकारला महिला आरक्षण कायदा लागू करण्याची निश्चित वेळापत्रकाबाबतची भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### तमाशा साम्राज्ञीची भूमिका साकारणार श्रद्धा

**मुंबई :** ‘छावा’ सारखा तुफान यशस्वी चित्रपट देणारे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर सध्या नव्या प्रोजेक्टची तयारी करत आहेत. हा चित्रपट तमाशा साम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित असेल. विशेष म्हणजे, श्रद्धा कपूर यात विठाबाईच्या भूमिकेत दिसणार आहे. या प्रोजेक्टसाठी गेल्या काही दिवसांपासून श्रद्धा लावणीचेही प्रशिक्षण घेत आहे. आता यात मुख्य अभिनेत्याचेही नाव निश्चित झाले आहे. यात रणदीप हुड्डाची वर्णी लागली आहे. या निमित्ताने श्रद्धा आणि रणदीप हुड्डा ही जोडी पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. विठाबाई नारायणगावकर यांना लावणी आणि तमाशा कलाकारांप्रती असलेले अतुलनीय योगदान लक्षात घेता दोन वेळा राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. श्रद्धाचे वडील शक्ती कपूर पंजाबी असले तरी आई मराठी कुटुंबातील आहे. त्यामुळे श्रद्धाला मराठी बाज आत्मसात करणे फारसे कठीण जाणार नाही.



### आधी परीक्षा देणार मग चित्रपट करणार अनीत

**मुंबई :** काही महिन्यांपूर्वी युवा पिढीला वेड लावणाऱ्या ‘सैंयारा’ या चित्रपटातील अभिनेत्री अनीत पड्डा हिच्याकडे नव्या चित्रपटांची नुसती रांग लागली आहे. त्यातच तिला यशराज फिल्म्सचा नवा चित्रपटही मिळाला आहे. मात्र, सध्या तिने चित्रपटाशी संबंधित सर्व काम थांबवून अभ्यास पूर्ण करण्याचे ठरवले आहे. चित्रीकरणाला सुरुवात करण्यापूर्वी ती महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहे. सध्या ती अभ्यासात व्यस्त आहे. ती राज्यशास्त्रात बी.ए. करते आहे. अभ्यास आणि काम यात ताळमेळ साधण्याच्या प्रयत्नात तिने अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले आहे. डिसेंबर-जानेवारीमध्ये तिची अंतिम वर्षाची परीक्षा होणार आहे. त्यानंतर ती ‘शक्ती शालिनी’ या चित्रपटाचे चित्रीकरण करणार आहे.



### प्रथमच डॉक्टरच्या भूमिकेत उमेश कामत

**मुंबई :** न्यूरोस्पाईन शल्यचिकित्सक डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या जीवनावर आधारित ‘ताठ कणा’ हा चित्रपट येतो आहे. यात डॉ. रामाणी यांच्या भूमिकेत उमेश कामत दिसणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच समोर आला. या प्रसंगी उमेश म्हणाला की, डॉक्टरांची भूमिका करायला मिळणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. या चित्रपटात त्याच्या पत्नीच्या भूमिकेत अभिनेत्री दिप्ती दवे झळकणार आहे. या दोघांसह चित्रपटात सायली संजीव, सुयोग गोऱ्हे, अजित भुरे, शैलेश दातार, रवी गोसाई आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. येत्या २८ नोव्हेंबरला हा चित्रपट प्रदर्शित होत आहे.





जगात शांतता नांदावी म्हणून बौधगया येथील महाबोधी मंदिरात पारंपरिक वाद्ये वाजवीत प्रार्थना करताना तिबेटीयन लामा

# बंगळुरू विमानतळावर सामूहिक नमाज

## भाजपाची सिद्धरामय्या यांच्यावर टीका

**बंगळुरू, १० नोव्हेंबर**

बंगळुरू विमानतळावर सामूहिक नमाजावरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ वर काही लोक नमाज अदा करतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. भाजपाचे म्हणणे आहे की सिद्धरामय्या यांचे सरकार राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्याबद्दल बोलत असले तरी सार्वजनिक ठिकाणी अशा धार्मिक कार्यक्रमांना ते पाठिंबा देते. यातून सिद्धरामय्या यांचा दुटप्पीपणा स्पष्ट झाला आहे.

वृत्तानुसार, मक्का येथे जाणारे प्रवासी टर्मिनल २ वर नमाज अदा करत होते. नमाजासाठी टर्मिनलमध्ये एक स्वतंत्र हॉल तयार करण्यात आला आहे. व्हायरल व्हिडीओमध्ये नमाजाच्या वेळी सुरक्षा कर्मचारी आणि विमानतळ कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून येते. तथापि, कोणीही त्यांना आत जाण्यास सांगितले नाही.

सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करताना भाजपा नेते विजय प्रसाद यांनी विचारले, बंगळुरू विमानतळाच्या टर्मिनल २ वर हे कोणी घडू दिले? आदरणीय मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि मंत्री प्रियांक खडगे, तुम्ही याला मान्यता दिली का? या लोकांनी उच्च सुरक्षा विमानतळ झोनमध्ये नमाज अदा करण्यासाठी पूर्वपरवानगी घेतली होती का? त्यांनी विचारले, काँग्रेसला रा. स्व. संघाचे कार्यक्रम, पथसंचलन आणि शाखांबद्दल काय अडचण आहे? काँग्रेस सरकार अशा गोष्टींकडे डोळेझाक करते, जी एक गंभीर समस्या आहे. कर्नाटक सरकारने विमानतळांवर कोणत्याही धार्मिक किंवा राजकीय कार्यक्रमांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये संघाच्या उपक्रमांचा समावेश आहे. अलिकडेच, कर्नाटक सरकारमधील मंत्री प्रियांक खडगे यांनी सिद्धरामय्या यांना पत्र लिहून सार्वजनिक ठिकाणी संघाच्या कार्यक्रमांवर बंदी घालण्याची मागणी केली. (वृत्तसंस्था)



# बनावट पावत्यांद्वारे इस्कॉनची २ कोटींची फसवणूक

**कोलकाता, १० नोव्हेंबर**

येथील इस्कॉनला २ कोटी रुपयांच्या बनावट पावत्या सादर करून फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी एका पुस्तक पुरवठादाराला अटक केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. इस्कॉनने एका पुस्तक पुरवठादाराकडून धार्मिक पुस्तकांची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे आदेश दिले होते.

पुरवठादाराने ऑर्डरपेक्षा कमी पुस्तके वितरित केल्याचा आरोप आहे आणि २ कोटी रुपयांचे पूर्ण पैसे मागण्यासाठी बनावट पावत्या सादर केल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून देवराज भट्टाचार्य असे त्याचे नाव आहे. देवराजला न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला १८ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. काही वर्षांपूर्वी इस्कॉनने भट्टाचार्य यांना धार्मिक पुस्तकांसाठी मोठी ऑर्डर दिली होती असे प्रारंभिक चौकशीत असे दिसून आले आहे. इस्कॉनच्या अधिकाऱ्यांनी २०१९ मध्ये भट्टाचार्य आणि सहकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# आसाममध्ये मुस्लिम अधिक समृद्ध होताहेत्

**गुवाहाटी, १० नोव्हेंबर**

आसाममध्ये लोकसंख्याशास्त्रीय बदलाशिवाय ‘आर्थिक बदल’ सुद्धा होत आहेत, यात मुस्लिम अधिक समृद्ध होत आहेत, याचा अर्थ आसामी लोकांचे आत्मसमर्पण सुरू झाले आहे, असा दावा आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी केला आहे.

राज्यात हिंदूंची संख्या कमी होत आहे, तर मुस्लिमांची संख्या वाढत आहे. सरकारकडे २००१ ते २०११ दरम्यान हिंदू व मुस्लिम लोकसंख्येच्या वाढीचा डेटा आहे. लोकसंख्याशास्त्रीय बदल वेगाने झाला आहे. आसामी लोकांच्या आत्मसमर्पणाचा एक अध्याय सुरू झाला आहे, असे ते म्हणाले.



गत वर्षी जारी केलेल्या नवीन निर्देशानुसार, हिंदू व मुस्लिमांमधील जमीन विक्रीच्या परवानग्यांची सरकार छाननी करत आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परवानग्यांमध्ये आसामी व स्थानिक मुस्लिमांची संख्या जास्त आहे आणि भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारला त्यात कोणतीही अडचण नाही. हिंदूंकडून मुस्लिमांना जमिनीची विक्री खूप जास्त आहे, तर मुस्लिमांकडून हिंदूंना जमिनीची विक्री खूप कमी आहे असे आम्हाला दिसत आहे. लोकसंख्यात्मक बदलाशिवाय संपत्ती निर्मितीमध्येही बदल झाला आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# उत्तरप्रदेशात शाळांमध्ये ‘वंदे मातरम्’ अनिवार्य

## मुख्यमंत्री योगी यांची घोषणा

**गोरखपूर, १० नोव्हेंबर**

उत्तरप्रदेशातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ‘वंदे मातरम्’ गाणे अनिवार्य असेल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी गोरखपूर येथून याची घोषणा केली.

गोरखपूरमध्ये एकता यात्रेला सुरुवात होण्यापूर्वी एका सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री योगी म्हणाले, राष्ट्रीय गीत वंदे मातरम्‌बद्दल आदराची भावना असली पाहिजे. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सन्मानासोबतच, आम्ही उत्तरप्रदेशातील प्रत्येक शाळा आणि शैक्षणिक संस्थेत राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम्’ गाणे देखील अनिवार्य करू. त्यामुळे उत्तरप्रदेशातील प्रत्येक नागरिक आपली मातृभूमी भारतमातेबद्दल आदर आणि आदराची भावना निर्माण करू शकेल.

एकता यात्रेच्या प्रारंभी, मुख्यमंत्री योगी यांनी काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर जोरदार निशाणा साधला. त्यांनी देशाच्या फाळणीसाठी काँग्रेसच्या तुष्टीकरण धोरणाला जबाबदार धरले. मुख्यमंत्री योगी म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ हे स्वातंत्र्यलढ्यादरम्यान स्वातंत्र्याचे घोषवाक्य बनले. १८९६ ते १९२२ पर्यंतच्या सर्व काँग्रेस अधिवेशनांमध्ये ते गायले जात होते. तथापि, १९२३ मध्ये जेव्हा मोहम्मद अली जौहर काँग्रेस अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी त्याला विरोध केला आणि ‘वंदे मातरम्’ गाण्यास नकार दिला. जर काँग्रेसने त्यावेळी मोहम्मद अली जौहर यांना हटवले असते आणि ‘वंदे मातरम्’चा अपमान सहन केला नसता तर देशाचे विभाजन झाले नसते. ते म्हणाले की, एका सपा खासदाराने त्याला विरोध केला आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, जर आपण आपल्या महापुरुषांचा आदर केला नाही तर देश कुठे जाईल? देशातील राष्ट्रीय एकता आणि अखंडतेला आव्हान देणाऱ्यांना सहन केले जाऊ शकत नाही. (वृत्तसंस्था)



### तुष्टीकरणामुळेच देशाचे विभाजन

मुख्यमंत्री योगी म्हणाले की, ‘वंदे मातरम्’ला विरोध करणाऱ्या मोहम्मद अली जौहर यांना हटवण्याऐवजी काँग्रेसने ‘वंदे मातरम्’मध्ये सुधारणा करण्याबद्दल बोलले. अशा तुष्टीकरण धोरणांमुळेच १९४७ मध्ये देशाचे विभाजन झाले. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आता, जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले जात आहेत, तेव्हा ‘वंदे मातरम्’ला पुन्हा एकदा विरोध केला जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# सौहार्दासह सावधगिरीही हवीच

गुजरात एटीएसने रविवारी धडाकेबाज कामगिरी करीत तीन दहशतवाद्यांना अटक केली. दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाया भारताला नवीन नाहीत. भारतासोबत समोरासमोर युद्ध करून जिंकू शकत नाही, याची जाणीव असलेल्या पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाच्या स्वरूपात छद्मयुद्ध धगधगत ठेवण्याचा प्रयत्न चालविला हा इतिहास आहे. पाकिस्तानचा दिवंगत हुकूमशहा जनरल झिया उल हकने 'ऑपरेशन टोपॅक'च्या माध्यमातून दहशतवादी हल्ले करीत भारताला किती तरी वेळा रक्तबंबाळ केले. काँग्रेस काळात दहशतवादाच्या विरोधातले धोरण गुळमुळीत होते. २०१४ पासून दहशतवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यात आली. सुरक्षा यंत्रणांना कारवायांसाठी मुक्तहस्त देण्यात आला. त्यानंतर अलिकडेच पहलगाम येथील हल्ल्याला प्रत्युत्तर देताना 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला धडा शिकवला. मात्र, कट्टरवादी कधीही आणि कोणत्याही स्वरूपात दहशतवादी हल्ले घडवू शकतात आणि त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरूच असल्याचे गुजरात एटीएसने रविवारी केलेल्या कारवाईतून स्पष्ट झाले. दहशतवाद्यांनी अत्यंत जहाल अशा रिसिन विषाच्या माध्यमातून नरसंहार घडवण्याचा कट रचल्याचे या कारवाईत समोर आले. आतापर्यंत स्फोट घडवणे, गोळीबार करणे, लोन वुल्फ अटॅक, आत्मघाती हल्ले या स्वरूपातील दहशतवाद लोकांनी पाहिला आहे. मात्र, घातक स्वरूपाच्या विषाचा वापर सामूहिक नरसंहारासाठी करण्याचा कट शिजत असल्याचे देशाला प्रथमच कळले. देशासमोर या माध्यमातून जैविक आणि रासायनिक दहशतवादाचे नवीन विक्राळ स्वरूप समोर आले.

रिसिन हे अत्यंत विषारी नैसर्गिक प्रथिनजन्य विष आहे. ते एरंडीच्या बियांपासून तयार केले जाते. पेशीतील प्रथिने तयार करणाऱ्या घटकाला निष्क्रिय करणारे हे विष. ते पेशीतील प्रथिन संश्लेषण रोखते आणि विषाला पेशीत प्रवेश करण्यासाठी मदत करते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. रिसिन शरीरात गेल्यावर पेशींचा नाश होणे सुरू होते आणि अवयव निकामी होऊ लागतात. रिसिनचे काही मायक्रोग्रॅम प्रमाणही मानवासाठी घातक ठरू शकते. हे जहाल विष श्वसनाद्वारे गेल्यास फुफ्फुसांचा गंभीर दाह आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. ते आहाराद्वारे शरीरात गेल्यास उलटी, जुलाब, पोटदुखी आणि मूत्रपिंड निकामी होण्यासारख्या गुंतागुंती उद्भवू शकतात. महत्त्वाचे म्हणजे रिसिनसाठी कोणतेही प्रतिऔषध उपलब्ध नाही. त्यावर केवळ लक्षणांवर आधारित उपचार आहेत. रिसिन अल्प प्रमाणातही प्राणघातक ठरते. हत्यांसाठी रिसिनचा वापर झाल्याची उदाहरणे असली तरी, मोठ्या प्रमाणात प्राणहानी करण्यासाठी त्याचा आजवर वापर झालेला नाही. १९७८ मध्ये सर्वप्रथम रिसिनचा वापर हत्येसाठी करण्यात आला होता. हा प्रकार लंडनमध्ये घडला. तिथे जॉर्जी मार्कोव्ह नावाच्या राजकीय अभ्यासकाला धारदार पॅलेटद्वारे रिसिन टोचून त्याची हत्या करण्यात आली होती. शवविच्छेदन अहवालात त्याच्या शरीरात रिसिन आढळले होते. या घटनेनंतर रिसिनच्या घातकतेकडे जगाचे लक्ष वेधले गेले होते. अनेक देशांनी या घटकाच्या वापरावर आणि वाहतुकीवर नजर ठेवण्यास सुरू केली. २०१३ मध्ये अमेरिकी राष्ट्राध्यक्ष आणि काही सिनेटर्सना रिसिनचा वापर केलेली पत्रे पाठवण्यात आली होती. वेळेवर कारवाई होऊन ती पत्रे जप्त करण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. यातील अनेक प्रकरणे स्थानिक गुन्हेगारीशी संबंधित होती. त्याला दहशतवादाचा आयाम नव्हता. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून जागतिक पातळीवर रिसिनवर कडक नियंत्रण आहेत. यासंबंधीच्या संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाते. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानला धडा शिकवला. त्यानंतर जम्मू-काश्मिरात तुरळक प्रमाणात दहशतवादी कारवाया झाल्या. मात्र, अत्यंत घातक स्वरूपाचा दहशतवादी कट हा प्रथमच समोर आला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवादी संघटनांवर प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. अशा काळात दहशतवादी संघटना काही काळ शांत बसतात आणि नंतर दबाव झुगारण्यासाठी मोठा हल्ला घडवतात. त्यानुसारच हल्ल्याचा कट रचण्यात आल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांना आहे. यावेळेस हल्ल्याची पद्धत बदलण्याचा प्रयत्न दहशतवाद्यांनी केला. हा कट उधळून सुरक्षा यंत्रणांनी मोठा घातपात टाळला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून आजपर्यंत दहशतवादाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. हा बदल केवळ हल्ल्यांच्या तंत्रात नाही, तर त्यामागील विचारसरणी, तंत्रज्ञानातही दिसून येतो. पूर्वी दहशतवादी संघटना म्हणजे ठरावीक भूभागात केंद्रिकृत लष्करी शिस्तीत चालणारे गट असायचे. आयरिश लिबरेशन आर्मी, लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ ईलम किंवा अल-कायदा ही त्याची उदाहरणे आहेत. या गटांकडे स्पष्ट नेतृत्व, प्रशिक्षण केंद्र आणि निधीचे स्थिर स्रोत असत. आता मात्र विकेंद्रित पद्धतीने दहशतवादी संघटना काम करतात. त्या 'सेल' आधारित रचना निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्यांना शोधणे, नियंत्रणात ठेवणे किंवा पूर्णतः नष्ट करणे अधिक अवघड झाले आहे. इंटरनेट आणि समाज माध्यमांनी दहशतवादाला नवीन परिणाम दिले आहेत. दहशतवादी संघटना मोठ्या प्रमाणावर प्रचार, निधी संकलन, भरती आणि संवादासाठी इंटरनेटचा वापर करतात. सायबर दहशतवाद म्हणजे संगणक प्रणाली, सरकारी डेटाबेस, वीज, परिवहन, बँकिंग आदी संरचनांवर सायबर हल्ले करून भीती आणि गोंधळ निर्माण करतात. काही संघटनांनी 'डार्क वेब' आणि 'क्रिप्टोकरन्सी'द्वारे आपले आर्थिक व्यवहार गुप्त ठेवण्याचे तंत्र विकसित केले आहे. दहशतवाद नेहमी संघटित स्वरूपात असतोच असे नाही. अनेक वेळा समाज माध्यमांवरून कट्टर विचारांनी प्रभावित होऊन एखादी व्यक्ती स्वतःच दहशतवादी हल्ल्याची योजना आखते आणि अंमलबजावणी करते. या प्रकाराला लोन वुल्फ अटॅक म्हटले जाते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे 'बायोटेररिझम' आणि 'केमिकल टेररिझम' हे नवे धोके निर्माण झाले आहेत. अल्प साधनांतही विषारी घटक, जैविक संसर्गजन्य घटक किंवा रासायनिक शस्त्रे तयार करून नरसंहार घडवणे शक्य झाले आहे. अशा प्रकारचे प्रयत्न अनेक वेळा अपयशी ठरले असले, तरी मानसिक परिणाम आणि सार्वजनिक भय निर्माण करण्याची त्यांची क्षमता मोठी आहे. त्यामुळेच अशा प्रयोगांवर कठोर नियंत्रण ठेवले जाते. अशा प्रकारच्या हल्ल्याचा प्रयत्न देशात झाला आहे.

दहशतवादाच्या मुळाशी अनेकदा असमानता, धार्मिक द्वेष, आर्थिक अन्याय, राजकीय उपेक्षा आणि परस्पर अविश्वास देखील असतो. या सर्व गोष्टींचा मुकाबला करण्यासाठी सामाजिक सौहार्द म्हणजेच सामाजातील परस्पर प्रेम, सहिष्णुता आणि एकात्मता अत्यंत आवश्यक ठरते. सामाजिक सौहार्द हे फक्त एक नैतिक मूल्य नसून, ते दहशतवाद रोखण्याचे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. सामाजिक सौहार्द म्हणजे विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृती असलेल्या लोकांमध्ये परस्पर आदर, सहअस्तित्व आणि समतेची भावना वाढवणे. जिथे परस्परांच्या श्रद्धा, परंपरा आणि विचारांचा सन्मान करतात, तिथे समाजात एकोपा निर्माण होतो. भारतासारख्या बहुविविधतेने नटलेल्या देशात हे मूल्य अधिक महत्त्वाचे ठरते. समाजात सौहार्दता टिकते, तेव्हा लोक दहशतवाद्यांच्या प्रचाराला बळी पडत नाहीत. म्हणूनच सामाजिक सौहार्द हा दहशतवादाविरुद्धचा पहिला मुद्दा ठरतो. या लढाईत सामाजिक सौहार्द सर्वांत शक्तिशाली शस्त्र ठरते. जेव्हा प्रत्येक नागरिक समाजातील एकोपा टिकवण्याचे काम करतो, तेव्हा दहशतवादाला पाय रोवण्याची जागाच राहत नाही. सौहार्द म्हणजे केवळ शांततेचे प्रतीक नसते. तो राष्ट्रीय सुरक्षेचा पाया असतो. त्यामुळे समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन एकतेचा दीप कायम तेवत ठेवला पाहिजे. दुसरी आणि त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे सौहार्द राखतानाच सावधगिरी पण बाळगायला शिकले पाहिजे. अत्र-तत्र सर्वत्र सावध असले पाहिजे. प्रत्येक नागरिकाने सजग असले पाहिजे. भारतासारखा खंडप्राय देश दहशतवादमुक्त आणि सुरक्षित राहायचा असेल तर सौहार्दाच्या सुदृढीकरणासह सावधगिरीला पर्याय नाही.


## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# बगराम एअरबेससाठी आटापिटा

भारताने अद्याप तालिबानशासित अफगाणिस्तानला अधिकृतपणे मान्यता दिली नसली, तरी तो मानवतावादी आणि विकासात्मक मदत देत आहे. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वैदिक काळापासून आहेत. कारण गांधार हा एकेकाळी भारताचा भाग मानला जात होता. अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीत भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने तालिबानला मान्यता दिली नसली, तरी नेहमीच मानवतावादी मदत दिली आहे. भारताने तेथे रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन बांधले आहे. तालिबानची राजवट असूनही भारताने अन्नधान्य, औषधे, भूकंप मदत, कोविड लस आणि इतर आवश्यक साहित्य पाठवून अफगाणिस्तानशी चांगला शेजारधर्म निभावला आहे. तालिबानला हेदेखील समजले आहे की भारतापासून अंतर राखणे व्यावहारिक नाही आणि भारत आपल्या हितांचे रक्षण करण्यासाठी तालिबानशी संबंध राखण्यास उत्सुक आहे. विश्वासाचे संबंध असताना भारत आणि अफगाणिस्तानमध्ये जाणीवपूर्व गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न सध्या सुरू आहेत. भारताने तालिबान राजवटीकडे कधीही बगराम एअरबेसची मागणी केली नाही, ना अफगाणिस्तानने ते भारताच्या ताब्यात देण्याचे सूतोवाच केले; परंतु अफगाणिस्तान अमेरिकेला बगराम एअरबेस द्यायला विरोध करत असताना भारताला देण्यास मात्र तयार असल्याचे वातावरण तयार करण्यात आले. त्याचा अफगाणिस्तानने लगेच इन्कार केला. याबाबत तालिबान अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, भारताने अफगाणिस्तानमधील बगराम एअरबेसवर देण्याची विनंती केलेली नाही किंवा ऑफरही दिलेली नाही. अफगाण अधिकाऱ्यांनी असे दावे बनावट असल्याचे सांगत फेटाळून लावले.

वस्तुतः भारताच्या सध्याच्या अफगाण प्रशासनाशी असलेल्या भागीदारीवर काही विशिष्ट गटांकडून शंका उपस्थित करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचे सांगितले. बगराम एअरबेस अमेरिकेने विकसित केला होता आणि अफगाणिस्तानमधील वीस वर्षांच्या लष्करी मोहिमेदरम्यान एक प्रमुख एअरबेस म्हणून काम केले होते. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी उघडपणे तशी इच्छा व्यक्त केली आहे. तथापि, अफगाण तालिबानने ट्रम्पची मागणी स्पष्टपणे नाकारली आहे. अफगाण लोक धमक्यांना घाबरत नाहीत; उलट आम्ही आणखी २० वर्षे लढण्यास तयार आहोत, असे खणखणीत प्रत्युत्तर दिले आहे. जंग जंग पछाडूनही अमेरिकेला अफगाणिस्तान जिंकण्यात कधीही यश आले नाही. उलट, अमेरिकन सैन्याच्या नाराजीमुळे तर ज्यो बायडेन यांच्या काळात अमेरिकेला तिथून आपले सैन्य मागे घ्यावे लागले होते. अमेरिका, चीन आणि पाकिस्तान या सर्वांचे लक्ष बगराम एअरबेसवर आहे. अमेरिका या एअरबेसवर पुन्हा नियंत्रण मिळवू इच्छित आहे, मात्र ते चीनच्या अणु प्रयोगशाळेपासून अगदी जवळ



आहे. ते व्याप्त काश्मीर (पीओके) आणि बलुचिस्तानपासूनही जवळ आहे. शिवाय, ते संपूर्ण मध्य आशियामध्ये प्रवेश प्रदान करते. अलिकडेच अफगाण तालिबानने हा एअरबेस भारताला सोपवल्याची बातमी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसरली. तथापि, अफगाण सरकारी अधिकाऱ्यांनी हे वृत्त निराधार असल्याचे सांगत फेटाळून लावले.

चीनची सर्वांत जवळची अणु प्रयोगशाळा बगराम एअरबेसपासून २००० किलोमीटर अंतरावर, वायव्य चीनमधील लोप नूर नावाच्या परिसरात आहे. हे अंतर रस्त्याने किंवा इतर मार्गांनी अनेक तासांचे असू शकते. तथापि, लॉकहीड एसआर-७१ ब्लॅकबर्डसारखी आधुनिक लष्करी विमाने ते सुमारे एका तासात पार करू शकतात. पाकिस्तान, तुर्कस्तानसह अन्य काही देशांनी विरोध केल्यानंतर भारताला अलिकडेच आपला देशाबाहेरचा जगातला एकमेव असा ताजिकिस्तानमधील आयनी एअरबेस सोडावा लागला. ताजिकिस्तानमधील हवाई तळ भारतासाठी महत्त्वाचा होता; परंतु तो गमवावा लागल्यानंतर भारताला दुसऱ्या हवाई तळाची गरज आहे. असे असले, तरी भारत कोणावर दबाव आणून पदरात काही पाडून घेईल, असे नाही. दोन्ही राष्ट्रांना तशी गरज वाटली आणि त्यात दोघांचा फायदा आहे, याची खात्री पटली, तरच बगराम एअरबेसबाबत निर्णय होईल. बगराम एअरबेस भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारताने मध्य आशियातील आपला ताबा कायम ठेवला पाहिजे. मुख्यतः इराणच्या चाबहार बंदरात भारताने पन्नास अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. व्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानमध्ये अत्याचार करणाऱ्या पाकिस्तानच्या कोणत्याही नापाक कृतींना त्वरित प्रत्युत्तर देण्यात भारताला या तळाची मदत होणार आहे. तथापि, पाकिस्तानला नेहमीच भीती राहील की अफगाणिस्तानच्या माध्यमातून भारताकडून धोका होऊ शकतो. भारताने बगराम एअरबेस ताब्यात मिळण्यासाठी व्यूहात्मक पावले टाकताना मित्रराष्ट्र दुखावणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे.

येथे नमूद करण्याजोगी बाब म्हणजे बगराम एअरबेस दुसऱ्या देशाच्या ताब्यात जाता कामा नये. तसा तो गेला, तर भारतासाठी आणि संपूर्ण प्रदेशासाठी डोकेदुखी ठरेल. अफगाणिस्तानमधील पुनर्बांधणीच्या प्रयत्नांमध्ये भारत सहभागी आहे, म्हणून सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे बगराम ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. भारताने हा हवाई तळ तालिबानकडून मिळवावा. भारताचे अफगाण तालिबानशी उत्तम संबंध आहेत. अलिकडेच अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांनी भारताला भेट दिली आणि तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंधांना एक नवी झळाळी मिळाली आहे. अफगाणिस्तानने अलिकडेच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अफगाणिस्तानमधील तालिबान राजवट लवकरच भारतात एका राजदूताची नियुक्ती करणार आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी दृढ होतील, असे मानले जाते. गेल्या महिन्यात अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री आठ दिवस भारतात होते, तेव्हा पाकिस्तानने अफगाणिस्तानचे निर्णय दिल्लीतून होतात, अशी टीका केली होती. याचा अर्थ अफगाणिस्तान भारत सरकारच्या सांगण्यानुसार कारभार करते आहे, असा होतो. भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध सुधारत असताना तालिबान आणि भारतात कटुता निर्माण व्हावी, असा काहींचा प्रयत्न आहे.

गेल्या काही दिवसांपासून 'सोशल मीडिया' आणि काही आंतरराष्ट्रीय पोर्टलवर अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस भारताला सोपवल्याच्या बातम्या वेगाने पसरत होत्या. या बातमीने दक्षिण आशियातील राजकीय घडामोडींबद्दलच्या अटकळींना उधाण आले होते; पण आता अफगाण तालिबान प्रशासनाने या सर्व अटकळींना पूर्णविराम दिला आहे. अफगाणिस्तानचा बगराम एअरबेस हा देशातील सर्वांत मोठा आणि सर्वांत आधुनिक लष्करी हवाईतळ आहे. राजधानी काबुलच्या उत्तरेला सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेले हे शहर १९८० च्या दशकापासून अफगाण लष्करी कारवायांचे केंद्र आहे. ते मूळतः सोव्हिएत सैन्याने विकसित केले होते आणि नंतर २००१ मध्ये अमेरिकेने त्याचे नियंत्रण आपल्याकडे घेतले आणि ते आधुनिक हवाई तळात रूपांतरित केले. अमेरिकन सैन्याने सुमारे वीस वर्षे एक प्रमुख तळ म्हणून बगराम आपल्याकडे ठेवले. ते केवळ अफगाणिस्तानच नव्हे, तर पाकिस्तानच्या सीमेवरही लक्ष ठेवत होते. बगराम हा अमेरिकेचा सर्वांत मोठा हवाई तळ होता. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलिकडील ब्रिटन भेटीदरम्यान सांगितले होते की, बगराम जगातील सर्वांत मोठ्या हवाई तळांपैकी एक आहे आणि आम्ही ते परत दिले. आता आम्हाला हा तळ परत मिळवायचा आहे. कारण चीन जिथे आपली अण्वस्त्रे बनवतो, तिथून ते फक्त एक तासाच्या अंतरावर आहे. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर वाद निर्माण झाला. परिणामी बगराम आशियाच्याच नव्हे, तर अवघ्या जगाच्या नजरेमध्ये आला.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# आम्ही अस्तित्वही गहाण ठेवले

पाश्चिमात्य संस्कृतीच्या नादी लागून आम्ही आमची संस्कृती व परंपरांना तिलांजली दिली. पाश्चिमात्य भोगवादी संस्कृतीचे चटके आता समाजाला बसू लागले आहेत. त्यामध्ये कधी आम्ही स्वतः अडकलो, तर कधी पद्धतशीरपणे त्यांनी आमच्या डोक्याचा वापर करून घेतला. पाश्चिमात्य शक्तीने आमच्या परिवाराला तोडले आणि आम्ही आधुनिक बनण्याच्या नादामध्ये आमचे अस्तित्व त्यांच्याकडे गहाण ठेवले. या शक्तीने भारतामधील एकत्र कुटुंब पद्धतीवर घाला घालून त्यांनी भारताला बाजाराचे रूप दिले आहे. त्यांना आमच्या संस्कार, परंपरा आणि चालीरीतींशी काहीएक देणे घेणे नाही. त्यांचे दैवत म्हणजे निव्वळ पैसा. एकत्र परिवार तुटला की, बाजार फुलतो. हे त्यांच्या हिताचे असते. विदेशी कंपनीच्या मायाजालामध्ये आम्ही अलगद अडकलो. परिवाराचे विभाजन झाले की, वस्तूंची विक्री वाढते एवढे साधे त्यांचे गणित. कुटुंबाची संख्या वाढली की, बाजारामध्ये रेलचेल सहज वाढते आणि वस्तूंची विक्री सहज करता येते. त्यामुळे विदेशी कंपन्यांनी नेमका भारतीय संस्कृतीच्या मुळावर घाव घालून भारतीय कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. आजमितीस बहुतांश कुटुंबाचा आकार कमी होत गेला आहे. तीन चार पिढ्यांची एकत्र कुटुंबे आता दुर्मिळ होताना दिसत आहेत. शहरी भागामध्ये तर आता 'हम दो हमारे दो'ने 'हमारा एक'ची जागा घेतली आहे. हे अतिशय घातक विष पेरले जात आहे.

पूर्वी सिनेमा आणि नंतर दूरदर्शनने पद्धतशीरपणे या मोहिमेस हातभार लावला. नैतिकतेचे सर्व मापदंड बाजूला ठेवून या मालिका प्रत्येकाच्या डोक्याचा ताबा घेऊ लागल्या. सासू आणि सुनेचे भांडण दाखविणाऱ्या मालिकेने अक्षरशः धमाकूळ घालून आपल्या संस्कृतीवर घाला घातला. अशा मालिका आई-वडिलांसह मुलं बघत असतील तर त्या कोवळ्या मनावर काय परिणाम होतील याचा पालकांनी कधीच विचार केला नाही. मुलगा आणि सुनेला आपले सासू-सासरे नकोसे झालेत. नातू आणि पणतू निराश्रित झालेत. महागड्या शाळांमध्ये नाव टाकले की, पाल्यांची जबाबदारी संपली ही प्रथा आता रूढ झाली आहे. मुलांना सर्व प्रकारच्या सुखसोई दिल्या की, आपण मोकळे ही विदेशी भावना दिवसेंदिवस रुजताना दिसून येत आहे. आपल्या आई-वडिलांशी सहज संवाद व्हावा, आपल्या भावनांना त्यांनीही महत्त्व द्यावे, अशी त्यांची या वयामध्ये अपेक्षा असते. नेमकी येथेच आजी-आजोबांची गरज असते. परंतु, बदलत्या सामाजिक रचनेमुळे पूर्वीच्या संकल्पना आता धुळीस मिळू लागल्या आहेत. त्यामुळे संवाद कमी झाला अन् अनिर्बंधता वाढीस लागली. या अनिर्बंधतेला आज आवर घातला नाही तर भविष्यही आम्हाला कधीच माफ करणार नाही. भारतीय संस्कृतीचा आधारच कुटुंब राहिला आहे. आपल्या समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे प्रमुख केंद्र आहे. कुटुंब प्रत्येकाच्या आयुष्याला आकार देऊन समाजाला जोडते. राष्ट्र निर्माणाच्या कार्यामध्येही कुटुंबाचे एक आगळेवेगळे महत्त्व आहे. पिढ्यान्‌पिढ्या संस्काराचे संक्रमण करणारी कुटुंब नावाची ही संस्था आम्हीच मोडकळीस काढली आणि आधुनिकतेची कुऱ्हाड पायावर मारून घेतली. भौतिक सुखाच्या नादामध्ये आम्ही आमची भावी पिढी नैराश्याच्या गर्द काळोखामध्ये लोटली. त्यामुळे ती वेगवेगळ्या गॅझेट्समध्ये भविष्य शोधू लागली. आधुनिकता ही जरी काळाची गरज असली तरी ती कितपत आत्मसात करावी, यालाही काही मर्यादा असायला हव्यात. त्यासाठीच आपले परंपरागत संस्कार आणि परंपरांना तिलांजली देऊन वाटचाल करणे म्हणजे एक प्रकारे आत्मघात करणेच ठरेल. कुटुंब हे संस्काराची शाळा व घरातील प्रत्येकाला आकार देणारी संस्था आहे. कुटुंब ज्याप्रमाणे घरामधील प्रत्येक व्यक्तीचा आधार असते, त्याचप्रमाणे ते समाजाच्याही आधाराचं आणि आदराचं स्थान असते. 'हे विश्वची माझे घर' अशा संस्कृतीमध्ये आम्ही जन्म घेतला असला तरी आम्हीच आमच्या घराचे चार तुकडे करण्यात अग्रेसर आहोत. परंपरांना अव्हेरून असेच आम्ही मार्गक्रमण करीत राहलो तर येणारे भविष्य आम्हाला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# आठव्या वेतन आयोगाच्या निमित्ताने...

केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी, आठव्या वेतन आयोगांतर्गत त्रिस्तरीय समितीची घोषणा केली व अपेक्षेनुरूप त्यावर विविध प्रकारच्या प्रतिक्रियाही आल्या. यामध्ये निवडणुकीच्या राजकरणापासून, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना वाढीव पगाराची खरंच गरज आहे का? यांसारखे प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्याचबरोबर खाजगी-सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यांच्या कामातील जोखीम, कायमस्वरूपी नोकरीची शाश्वती, वेतनाव्यतिरिक्त मिळणारे विविध फायदे या साऱ्यांची तुलनात्मक चर्चा होणे अपरिहार्यच होते. यातूनच केंद्र सरकारने घोषित केलेल्या प्रस्तावित वेतन आयोगाच्या प्रस्तावावरही, स्वाभाविकपणेच साधकबाधक चर्चा सुरू झाली आहे.

वेतन-व्यवस्थापन क्षेत्रातील अभ्यासकांच्या मतानुसार, सद्यःस्थितीत खाजगी क्षेत्रातील सर्वोच्च वा संचालकसदृश पदांवरील व्यक्ती व कंपन्यांच्या मुख्याधिकाऱ्यांसारख्या मोठ्या व जबाबदारीच्या वरिष्ठ पदांवरील व्यक्तींना आणि शासकीय अधिकाऱ्यांना मिळणारे वेतन व मिळणारे फायदे यांमध्ये फारशी तफावत आढळणार नाही. तरीही खाजगी कंपन्यांमधील अधिकारी व त्यांच्यासारखे पद व जबाबदारीचे काम करणाऱ्यांच्या मिळकतीमध्ये मात्र सहजच मोठी तफावत आढळून येते. मुख्य म्हणजे, वर्षानुवर्षे असणारी ही वेतनविषयक तफावत, गेली काही वर्षे झपाट्याने वाढती आहे.

पगारदारांच्या वेतनमानाच्या संदर्भातील सध्याची सत्यस्थिती म्हणजे, आज सर्वसाधारण पात्रताधारक कर्मचाऱ्यांना सरकारी नोकरीत मिळणारे पगार हे सर्वांत मोठे आकर्षण ठरताना दिसते. त्यात जर अशी नोकरी ही कार्यालयीन कामकाजाशी संबंधित असेल, तर पाच दिवसांचा आठवडा स्वरूपातील या नोकरीसाठी विशेषतः सहायक वा कर्मचारी म्हणून, अशी नोकरी व त्यातील मर्यादित जोखीम-जबाबदारीसह मिळणारा पगार हे अशा बहुसंख्य कर्मचाऱ्यांसाठी जीवनाचे इतिकर्तव्यच ठरते. सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रस्थापित व वार्षिक एकत्रित पगार व इतर सोयी-फायदे यांचा विचार करून, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उदाहरण विचारात घेता येण्यासारखे आहे. सरकारी क्षेत्रातील बँक असणाऱ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांना बँकेतर्फे मिळणारे वेतन व त्याशिवाय प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्वरूपात मिळणारे फायदे व सवलती लक्षात घेता, त्या कर्मचाऱ्यांचे वार्षिक एकत्रित वेतन



व फायदे मिळून त्यांना दरवर्षी सुमारे सरासरी २६ लाख रुपये मिळतात. त्याचवेळी खाजगी क्षेत्रातील आयसीआयसीआय वा एचडीएफसी बँक येथील त्याच स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे वार्षिक एकत्रित वेतन व सर्व फायदे मिळून मिळणारी राशी, स्टेट बँक कर्मचाऱ्यांच्या तुलनेत निम्मी आहे. हीच बाब कॉर्पोरेट वा खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या आणि समान शैक्षणिक पात्रता, पद आणि जोखीम असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातपण लागू होते.

वर नमूद केल्याप्रमाणे केवळ नमुनेदाखल स्वरूपात कर्मचारी स्तरावरील व तुलनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा आकडेवारीचा परिणाम, व्यक्तिगत स्वरूपात कर्मचाऱ्यांपासून कंपनी-व्यवस्थापन स्तरापर्यंत नेहमीच होतात. यातून विशेषतः कर्मचारी-कामगारांच्या मानसिकतेवर व त्यातून त्यांचे कामकाज आणि कार्यक्षमतेवरही परिणाम दिसून येतो. यासंदर्भात उल्लेखनीय व नेहमीच चर्चेत राहणारा मुद्दा म्हणजे, परंपरागतरीत्या केंद्र सरकारच्या संपूर्ण अखत्यारीत असणाऱ्या टपाल खात्यांतर्गत ग्रामीण स्तरापर्यंत टपाल-बँकिंग विभागाचे काम करणारे कर्मचारी समान स्वरूपाचे काम करत असूनही, त्यांना भिन्न वेतनश्रेणी व फायदे का नाहीत?

या आणि अशाप्रकारे कामकाज, कामाची जबाबदारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन व त्यामधील वाढ हे मुद्दे नेहमीच चर्चेत येतात. मात्र, त्यावर गांभीर्याने विचार होऊन तोडगा काढण्याचे मात्र फारसे प्रयत्न होत नाहीत. सातव्या वेतन आयोगाची घोषणा, स्थापना, आयोगाचा अहवाल आणि त्याची अंमलबजावणी या विविध टप्प्यांवर हे मुद्दे चर्चिले गेल्याचे जाणकारांच्या स्मरणात असेलच. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संस्थात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, थेट केंद्र सरकारच्या सेवेत व रेल्वे-टपाल यांसारख्या मोठी कर्मचारी संख्या असणाऱ्या खात्यांना वगळून २०१४च्या कर्मचारी गणनेनुसार, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे १८ लाख होती. सातव्या वेतन आयोगाच्या वेळी तुलनात्मकदृष्ट्या असे नमूद केले होते की, त्यावेळी अमेरिकेतील सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या २१ लाख होती. आज हीच तुलना करताना लक्षात येते की, सद्यःस्थितीत भारतात एक लाख लोकसंख्येसाठी १३९ केंद्र सरकारी कर्मचारी आहेत, तर अमेरिकेत तुलनात्मकदृष्ट्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ६६८ आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि विदेश सेवा विभागात आहे. तर त्याचवेळी विविध दूतावासांमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या, जेमतेम एक हजाराच्या घरात होती; तर भारताशी तुलनात्मक महाशक्तीसदृश अशा चीन, अमेरिका व युरोपीय देशांच्या विदेश सेवा विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कैकपटींनी अधिक आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा पगार, पगारवाढ व त्यांना मिळणारे फायदे यांचा विचार करताना, देशातील केंद्र सरकारच्याच अखत्यारीत असणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन उद्योग व आर्थिक-सार्वजनिक सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतनमान व फायदे यांची तुलना होणेही अपरिहार्य आहे. या मुद्यावर देश-विदेश पातळीवरील शिक्षकांचे वेतन-फायदे व इतर सेवाशर्ती इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास संशोधन स्वरूपात कोलंबिया विद्यापीठाचे कार्तिक मुरलीधरन् यांनी केला आहे. या अभ्यासातून लक्षात आलेली प्रमुख व महत्त्वाची बाब म्हणजे, सरकारी अनुदान व समर्थनाच्या आधारे काही संख्यांमध्ये शिक्षक-अध्यापकांचे पगार दुपटीने वाढवूनही त्यांच्या शैक्षणिक संस्थेचे काम, कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत फारसा बदल झालेला नाही. या साऱ्या आर्थिक-व्यावहारिक पृष्ठभूमी, उपलब्ध संशोधन आणि अनुभवाला यावेळी जोड मिळाली आहे, ती भारताच्या सद्यःस्थितीतील आर्थिक प्रगतीची. त्यामुळे आर्थिक प्रगतीमध्ये आणखी वाढ साधण्यासाठी केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीशी त्याची सांगड कशी घालता येईल, हा यावेळी कळीचा मुद्दा ठरला नाही, तरच नवल!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### दिवाळीव्यतिरिक्त फटाके फोडण्यावर बंदी हवी

आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके फोडले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके फोडले जातात. मग तो सण, उत्सव असो की आनंदाचा प्रसंग. फटाके फोडूनच सण, उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतके फटाके फोडले जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके फोडले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके फोडतात. वाढदिवस साजरा करताना फटाके फोडण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आवाहन करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके फोडूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### भाजपाने सावध असावे

विद्यमान महाराष्ट्र सरकार भाजप नेतृत्वाखाली सोबत घेतलेल्या सवगंड्यांसोबत सत्तेवर आल्यापासून राजकीय आघाड्यांवर सतत काही ना काही घटना घडताना दिसतात. राजकारणात सत्तेसाठी समविचारी नसलेल्या पक्षांशीही काही तडजोड करावी लागणे यात काहीही गैर नाही. तरीही सध्या सोबत घेतलेल्या दोन पक्षांतील काही नेत्यांची बेताल वक्तव्ये, आर्थिक व्यवहारांतील भानगडी जनतेसमोर येतच आहेत. नुकतेच पार्थ पवार यांचे जमीन व्यवहार प्रकरण समोर आल्यानंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. राजकीय आघाडी सांभाळण्यास मुख्यमंत्री सक्षम असले तरीही जनमानसात भाजपावरही त्याचे शिंतोडे निश्चितच उडतात. त्यामुळे भाजप समर्थक सामान्य नागरिकांना अशा राजकीय युतीने काय साध्य झाले हा प्रश्न पडतोच. त्यामुळे भाजपने सावध असावे आणि पक्षाच्या प्रतिमेस जपावे ही सामान्यांची इच्छा असेल.

**राम राजे**/९४२१७७९९४५

●● ●●

### सर्व प्रकारचे खेळ व खेळाडूंकडे लक्ष द्यावे

शहरात व ग्रामीण भागात अनेक मैदानी खेळ शालेय जीवनापासून शिकवले जातात. परंतु आज क्रिकेट या खेळावर जितका पैसा खर्च केला जातो तेवढा खर्च इतर खेळांवर व स्पर्धांवर करताना कुठेही दिसत नाही.

त्यामुळे इतर मैदानी खेळ शालेय जीवनातून बाद होणार तर नाही ना अशी मनात शंका येते. तेव्हा क्रिकेटप्रमाणे इतर खेळ, खेळाडू व त्यांच्या बक्षिसाच्या रकमेत वाढ होणे आवश्यक आहे. तेव्हा याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

## आजचे संघगीत-३९

मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५

### तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली

तुतारी हिंदु ऐक्याची निनादे उंच या काली ।
उठा या हिंदुबंधूंनो स्वदेशाच्या ध्वजाखाली ॥धृ.॥

अभागी पारतंत्र्याची निशा संपे निराशेची ।
झळाळे प्राचिदिक्प्रांती प्रभा स्वातंत्र्यसूर्याची ॥१॥

दऱ्या खोऱ्यांतुनी साऱ्या, पुकारा घालुनी साद् ।
स्वराज्याचा महामंत्र घुमू दे अंबरी नाद ॥२॥

हराया दैन्य देशाचे करू या प्रबळ संघटना ।
नव्या मन्वन्तराची ही असे संजीवनी जाणा ॥३॥

युगी या संघशक्तीच्या स्वदेशा उद्धरायाला ।
नसे एकीविणा जाणा दुजा सन्मार्ग राष्ट्राला ॥४॥

प्रभावी संघशाखांनी बलाने घालवू दैन्य ।
उठू द्या हिंदुजातीचे पुन्हा ते सुप्त चैतन्य ॥५॥

घडाया भारतामाजी पुन्हा सामर्थ्य हिंदूंचे ।
विणा चोहिकडे जाळे प्रभावी संघशाखांचे ॥६॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री शंकरलिंग प्रशालेत वसंत हंकारे यांचे आज व्याख्यान

**वळसंग, दि. १० नोव्हेंबर-**

वळसंग येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेच्या मैदानावर मंगळवार दि. ११ नोव्हेंबर दुपारी ३.३० वाजता बाप समजून घेताना या विषयावर व्याख्यान होणार आहे कै. वि.गु.शिवदारे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वि.गु.शिवदारे प्रतिष्ठान सोलापूर यांच्या वतीने सुप्रसिद्ध व्याख्याते श्री वसंत हंकारे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. स्वामी समर्थ सूतगिरणीचे चेअरमन श्री राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली हा व्याख्यान कार्यक्रम होणार आहे. याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी समर्थ सूत गिरणीचे संचालक सतीश ईसापुरे, नरेंद्र गंभीरे, वळसंग पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राहुल डोंगरे, श्री शंकरलिंग देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, श्री शंकरलिंग स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे व सर्व संचालक गावकरी सरपंच जगदीश अंटद इत्यादींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानाचे लाभ सर्व माजी विद्यार्थी पालक व गावकऱ्यांनी घ्यावीत असे आव्हान वि.गु. शिवदारे प्रतिष्ठान मार्फत करण्यात येत आहे.

# सेवा हमी कायदा डॅशबोर्ड महापालिका वेबसाईटवर सुरु

- मनपा कर्मचाऱ्यांच्या कामावर ठेवता येणार लक्ष
- कर्मचारी निहाय प्रलंबित प्रकरणे पाहता येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**


सोलापूर महापालिकेच्या वेबसाईटवर आता सेवा हमी कायदा डॅशबोर्ड सुरू करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या कामावर लक्ष ठेवता येईल. महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडे नेमकी किती प्रकरणे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. एखाद्या प्रकरणातील अर्ज नामंजूर झाला, अपील करणे, अपिलांची सुनावणी, निर्णय हे वेबसाइटवर पाहता येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

राज्य सरकारने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार नागरिकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवांचा कालावधी निश्चित केला आहे. त्यानुसार महापालिका सध्या एकूण १४४ सेवा ऑनलाइन स्वरूपात देत आहे. यामध्ये जन्म-मृत्यू दाखला, विविध व्यवसायांचे परवाने, नळ जोडणीचा अर्ज, झाडाच्या फांद्या तोडणे, सेफ्टी टैंक स्वच्छता, अग्निशामक दलाकडील सेवा , नाहरकत प्रमाणपत्रे यासह एकूण १४४ ऑनलाइन सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या ऑनलाइन सेवांचा आढावा घेतला जातो. यात कर्मचारीनिहाय प्रलंबित प्रकरणे सर्व नागरिकांना दिसत आहेत. सर्व प्रकरणे विहित मुदतीत निकाली काढावीत. यासाठी हा डॅशबोर्ड उपयोगी पडणार आहे.

दरम्यान, या वेबसाईटवर सेवा हमी कायदा डॅशबोर्ड सुरू करण्यात आला आहे. महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी यांची नावे, कुणाकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती नागरिकांना पाहता येणार आहे. या कामावर आयुक्त कार्यालयाचे लक्ष आहे. सेवा कायद्यानुसार वेळेत प्रकरणे निकाली काढली नाहीत तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दर दिवसाला १०० रुपयांचा दंड केला जात आहे. त्यामुळे प्रकरणे वेळेवर निघतील. ज्यांच्याकडे सर्वाधिक प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांच्याबद्दल तक्रार करता येणार आहे.

### असा पाहता येणार ऑनलाईन सेवा डॅशबोर्ड

डॅशबोर्डच्या डाव्या बाजूला सेवांची मुख्य वर्गवारी व त्या वर्गवारीमधे येणाऱ्या सेवा नमूद केलेल्या आहेत. सेवांच्या मुख्य वर्गवारीवर क्लिक केल्यानंतर त्या मुख्य वर्गवारीमधे दिल्या जाणाऱ्या सेवांची यादी पहावयास मिळेल. या यादीमधील सारांश अहवालावर क्लिक केल्यानंतर उजव्या बाजूस त्या वर्गवारीतील सर्व सेवांची तपशीलवार आकडेवारी पहावयास मिळेल. जसे की एकूण किती अर्ज प्राप्त, किती प्रलंबित, किती पूर्ण झाले इत्यादी. प्रलंबित आकडेवारीवर क्लिक केलेस कर्मचारीनिहाय प्रलंबित अर्जाची संख्या पहावयास मिळेल या संख्येवर क्लिक केल्यास नेमके कोणते अर्ज प्रलंबित आहेत याची सविस्तर यादी पहावयास मिळेल. डाव्या बाजूला सेवांच्या मुख्य वर्गवारीवर क्लिक केल्यास त्या वर्गवारीमधे येणाऱ्या सर्व सेवांची यादी पहावयास मिळेल या सेवांच्या नांवावर क्लिक केल्यास व्युव (Grpahical View) मध्ये आकडेवारी पहावयास मिळेल, असे महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.






# छायाचित्रांतून साकारला निसर्गाचा सोहळा

## सिद्धेश्वर प्रशालेत पक्षी सप्ताह साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

सिद्धेश्वर प्रशालेत पद्मश्री अरण्यऋषी स्व. मारुती चित्तमपल्ली आणि ज्येष्ठ पक्षी तज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त सिद्धेश्वर प्रशाला आणि वाइल्डलाईफ कॉंझरवेशन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षी सप्ताहानिमित्त पक्षी छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रतीकात्मकरीत्या रोपाला पाणी घालून करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक राजकुमार उंबरजे, पर्यवेक्षक विनोद बिराजदार, तसेच अजित चौहान, संतोष धाकपाडे आणि प्रवीण गावडे यांची प्रमुख उपस्थित होती. मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रदर्शनात जिल्ह्यातील सुमारे १०० विविध प्रजातींची छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली होती.

> विद्यार्थ्यांना आवाहन केले की, पतंग उडवताना मांजाचा वापर टाळा. परिसरातील पक्ष्यांचे निरीक्षण करा आणि या निसर्गमित्र जीवांचे जतन करा, म्हणजे पर्यावरण निरोगी राहील.
>
> **- पर्यवेक्षक विनोद बिराजदार**

बहिरी ससाणा, लाल डोक्याचा ससाणा, फ्लेमिंगो, सातभाई, पिवळ्या गळ्याची चिमणी, हरियाल, माळढोक, तनमोर, पट्टकदंब, शृंगी घुबड, पिंगळा, खाटीक पक्षी, सुतार पक्षी, हुदहुद, चित्रबलाक, कोतवाल अशा अनेक देशी-विदेशी पक्ष्यांच्या वास्तव्य, खाद्य आणि वैशिष्ट्यांविषयी विद्यार्थ्यांनी उत्साहाने माहिती घेतली. कार्यक्रमाचे नियोजन निलेश दंतकाळे यांनी केले, सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक तथा पक्षीमित्र शिवानंद हिरेमठ यांनी तर आभार बसवराज चडचण यांनी मानले.

# शरद राष्ट्रवादीचे निरीक्षक शेखर माने पदमुक्त

**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोलापूर जिल्हा निरीक्षक शेखर माने यांनी निरीक्षकपदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची मागणी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकात शिंदे यांच्याकडे केल्याने सोलापूर शहर व जिल्ह्यातील राष्ट्रवादीत खळबळ उडाली आहे. माने यांनी अचानकच तडकाफडकी निर्णय घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. माने यांनी म्हटले आहे की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सांगली जिल्ह्यातील संघटनेची कामे करण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा पक्ष निरीक्षक पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात यावे. माने यांनी सोलापूर जिल्ह्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान निरीक्षक म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली होती. त्यांनी या काळात पक्षाला दोन्ही निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळवून दिले आहे. सोलापूर जिल्ह्यात मला दिलेल्या जबाबदाऱ्या मी प्रामाणिकपणे पार पाडल्या.


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः जिल्हा सोलापूर येथील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे कोंडी येथील गट नंबर. २७८/२/१ ब पैकी प्लॉट नं.९ यासी क्षेत्र १४८.७० चौ.मी. किंवा १६00 चौ. फुट आकार रु.२.00 पैसे इतके असून यांसी चतुः सिमा पुर्वेस गट नं.२८४ दक्षिणेस : गट नं. २७८/अ पश्चिमेस लेआऊट मधील अंतर्गत रस्ता उत्तरेस : प्लॉट नं. ८.

वर नमूद चतुः सिमेतील प्लॉटजागा **तानाजी रामचंद्र भोसले** यांचे मालकीची असून त्यांचे नांवाची नोंद आहे. सदर प्लॉटजागा **तानाजी रामचंद्र भोसले** यांनी आमचे अशिल यांना खुषखरेदी देण्याचे ठरवून व्यवहार करुन इसारा रक्कम स्विकारली आहे व सदरची प्लॉटजागा निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री आमचे अशिल यांना दिलेली आहे. तरी सदर प्लॉटजागेत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध करार, गहाण, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी पोटगी, टाच, जप्ती, मृत्युपत्र, कुळ वहिवाट, कब्जाकरार या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असलेला अथवा सदर प्लॉटजागे संबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे तसे न झाल्यास सदरची प्लॉटजागा ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीरनोटीस प्रसिध्द केली.

ही जाहीर नोटीस दिली ता. ११/११/२०२५.

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड सुनिल भ. कांबळे**
**ॲडव्होकेट**
पत्ता : २२, शिवाजी नगर, बाळे,
पुणे रोड, सोलापूर मो. ९७६४१०६३४२

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः जिल्हा सोलापूर येथील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे अंत्रोळी येथील गट नंबर ११७/२ यासी क्षेत्र १ हे.४ आर आकार रु.0.५६ पैसे इतके असून यांसी चतुःसिमा - पुर्वेसः मौजे कंदलगाव शिव, दक्षिणेस गट नं. ११८ पश्चिमेस : गट नं. १२२, उत्तरेस : अंत्रोळी कंदलगाव रस्ता.

वर नमूद चतुःसिमेतील शेतजमीन **गणपत महादेव कुंभार** यांचे मालकीची असून त्यांचे नांवाची नोंद आहे. सदर शेतजमीन **गणपत महादेव कुंभार** यांनी आमचे अशिल यांना खुषखरेदी देण्याचे ठरवून व्यवहार करुन इसारा रक्कम स्विकारली आहे व सदरची शेतजमीन निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री आमचे अशिल यांना दिलेला आहे. तरी सदर शेतजमीनीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध करार, गहाण, दान, लिज, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वाटणी पोटगी, टाच, जप्ती, मृत्युपत्र, कुळ वहिवाट, कब्जाकरार या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असलेला अथवा सदर शेतजमीनी संबंधी कोणाचीही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आत खालील पत्यावर कागदोपत्रानिशी लेखी कळवावे तसे न झाल्यास सदरची शेतजमीन ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार चालणार नाही व ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदरची खरेदीपूर्व जाहीरनोटीस प्रसिध्द केली.

ही जाहीर नोटीस दिली ता. ११/११/२०२५.

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. सुनिल भ. कांबळे**
**ॲडव्होकेट**
पत्ता : २२, शिवाजी नगर, बाळे,
पुणे रोड, सोलापूर मो. ९७६४१०६३४२

## जाहीर समन्स

**मा. उपबिंधक, सहाकरी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी वॅक्स को. ऑप असोसिएशन लि. सोलापूर**
१३३ (अ) सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**शरद नागरी सहकारी बँक लि., सोलापूर** -अर्जदार
२१८/२१९ ब, गोल्ड फिंच पेठ, लकी चौक सोलापूर
विरूद्ध
(खालील तपशिलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) -जाब देणार

| अ. क्र. | केस नं. | दावा रक्कम | नाव देणार क्र. | नाव देणार नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ७८८/२५-२६ | ३,४३,३९७ | १ | नवले अनिल मारूती रा. हांडे प्लॉट, जुना पुना नाका, मुरारजी पेठ, सोलापूर |
| ३ | ७९८/२५-२६ | १,९४,३४८ | २ | लक्ष्मी नागनाथ खंदारे रा. ९४/१८७ जोडभावी पेठ, सोलापूर |
| | | | ४ | रघुनाथ बापू सूर्यगण रा. मु.पो. चिंचोली, ता. सांगोला, जि. सोलापूर |
| ४ | ७८६/२५-२६ | २,१५,४५0 | ३ | राजकुमार प्रकाश अंकम रा.४३ व्यंकटेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| ५ | ७९३/२५-२६ | १,८७,२0६ | २ | अंकम राजकिरण प्रकाश रा. ४३ व्यंकटेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| ६ | ७९९/२५-२६ | १,६७,११३ | २ | सुभाष पुंडलिक रोडगे रा. मु. पो. कामती शिक्षण कॉलनी जवळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर |
| ७ | ७९४/२५-२६ | १.१५,१९४ | ४ | शशिकांत गोपीनाथ काकडे रा. ६0/९ तुकाई नगर, शरद कॉलनी, मंगळवेढा, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार दि. २५/११/२०२५ रोजी दुपारी १२.00 वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर राहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनवणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दिनांक 0७/११/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही-**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स
को. ऑ. असोसिएशन लि. सोलापूर

## जाहीर प्रगटन

**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**

**मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३७८/२०२४**

**दिपाली भ्र. तुकाराम कदम व ईतर विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**

या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. 0१. अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार दिपाली भ्र. तुकाराम कदम, वय २३, व्यवसाय-घरकाम रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी व ईतर यांनी त्यांचे पती नामे तुकाराम पिता बबनराव कदम यांचा झालेल्या मृत्यूची व त्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.

आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन आपणाविरुध्द योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ३१.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**आदेशान्वये**

**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**क. लिपीक** **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, परभणी.**

## जाहीर प्रगटन

**श्री.एन.पी. कापुरे, अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश परभणी यांचे न्यायालयात**

**मोटार अपघात दावा अर्ज क्र. २७/२०२५**

**अविनाश रावसाहेब कदम विरुध्द अरविंद शिवाजी बुरंगे व ईतर**

या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की गैरअर्जदार क्र. 0१ अरविंद पिता शिवाजी बुरांगे, वय ४५ वर्ष धंदा व्यापार रा. बोरंगवाडी जवळा ता. सांगोला जि. सोलापुर विरुध्द अर्जदार अविनाश पिता रावसाहेब कदम, वय २७ व्यवसाय-कुली रा. एरंडेश्वर ता. पुर्णा जि. परभणी यांनी त्यांचे स्वतःच्या झालेल्या अपघाताची नुकसान भरपाई मिळावी म्हणुन दावा अर्ज दाखल केलेला आहे.

आपणास या पुर्वी वारंवार समन्स नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु आपण मिळुन न आल्यामुळे सदरची समन्स नोटीस या न्यायालयास न बजावणीकरता बेलीफ रिपोर्ट सह बिनातामील परत आलेली आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अथवा वकीला मार्फत दिनांक २८.११.२०२५ पुर्वी पर्यंत या न्यायालयात हजर रहावे नसता आपले गैरहजेरीत आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहीत धरून आपणाविरूद्ध योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २७.१०.२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

**आदेशान्वये**

**स्वाक्षरित/-** **स्वाक्षरित/-**
**क. लिपीक** **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, परभणी.**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे रोपळे (खुर्द) ता. माढा. जि. सोलापूर व सोलापूर जिल्ह्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि/ सोलापूर सब डि/ व ता. माढा पैकी मौजे रोपळे (खुर्द) येथील जमीन गट नंबर ३३/२ यांसी क्षेत्र 0१ हे. ६४ आर, पो.ख 00 हे. १७ अशी एकुण 0१ हे. ८१ आर. आकार 0१ रू. ८0 पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस- जमीन गट नंबर ३३/३, पश्चिमेस- जमीन गट नंबर ३३/१, दक्षिणेस- जमीन गट नंबर २५, उत्तरेस- जमीन गट नंबर ३४ व ३५ येणेप्रमाणे चतुःसिमेतील जमीन आतील सर्व तदंगभुत वस्तुसह उपरोक्त नोटीसीमध्ये वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिलांचे एकत्र कुटुंबाची वाडवडिलार्जित अशी मिळकत असुन यामध्ये आमचे अशिलांचा अविभक्तात हक्क हिस्सा आहे. तसेच सदरचे मिळकतीवरच आमचे अशिलांचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो तथापि, वर नोटीसमध्ये नमुद गट नंबर ३३/२ या मिळकतीचे हक्कपत्रकी असलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन रंजना चंद्रकांत पवार, कांता मारूती कोळी, भारती शिवाजी माने, कलावती वाल्मिक पतंगे हे सर्वजण संगनमत करून सदरची मिळकत आमचे अशिल यांचे परस्पर त्यांचा वर नमुद मिळकतीमधील हक्क हिस्सा बुडविण्याचे वाईट हेतुने सदरची मिळकत विक्री करणार असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलयकरित्या समजलेले आहे. त्यामुळे आमचे अशिलांनी रंजना चंद्रकांत पवार, कांता मारूती कोळी, भारती शिवाजी माने, कलावती वाल्मिक पतंगे यांचे विरूद्ध माढा येथील मे, दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात दिवाणी दावा त्यासोबत तूर्तातूर्त ताकीदीचा अर्ज दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ठ आहे,

तरी या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद व्यक्ती रंजना चंद्रकांत पवार, कांता मारूती कोळी, भारती शिवाजी माने, कलावती वाल्मिक पतंगे यांचेसोबत कोणीही वर नोटीसमधील नमुद मिळकतीबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार खरेदीखत, साठेखत, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, वित्तीय संस्थांचे बोजे, नोटरी, तोंडी व्यवहार वगैरे मिळकत हस्तांतरणाबाबतचे व्यवहार करू नयेत ते आमचे अशिलांचे हक्क हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच कोणीही वर नमुद मिळकतीचे बाबतीत काही व्यवहार केल्यास अथवा झाल्यास सदरचे व्यवहार हे आमचे अशिलांचे हक्क हिश्यावर तसेच ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट कलम १५२ नुसार मुळीच बंधनकारक राहणार नाही व त्याबाबत आमचे अशिल त्यांविरूद्ध योग्य त्या न्यायालयात दाद मागतील व त्यानंतर होणारे खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. केवळ कोणाचीही फसगत होवु नये म्हणून ही सावधानातेची जाहीर नोटीस दिलेली आहे.

ही नोटीस दिली असे तारीख -१०/११/२०२५

**सही/-**
**ॲड. भिमराव अशोक लंकेश्वर**
L.L.B.
राजस्वनगर, माढा, ता. माढा, जि. सोलापूर
MAH/1049/2013
मो-९९७0८0७४३0/८३२९३६२१७२

**सोमनाथ अभिमान पतंगे**
**अशिल**

फेर जाहीर लिलाव-१

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

९४/२९ मंगल प्लाझा, जोडभावी पेठ, सोलापूर फोन नं. 0२१७-२७३५५३७

**परिशिष्ठ - २०**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६0 चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १0७ यास अनुसरून लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या पतसंस्थेचे थकबाकीदार श्री हणमंत रामचंद्र कुलकर्णी रा. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांची खालील नमुद केलेली पतसंस्थेस तारण असलेली स्थावर मालमत्ता त्यांचेकडील थकबाकी वसूलीसाठी विशेष वसूली अधिकारी यांनी दिनांक-0२.0३.२0२३ रोजीच्या आदेशाने जप्त केलेली आहे. सदर स्थावर मिळकत मा. उपविभागीय अधिकारी दक्षिण सोलापूर यांचे आदेशाने मंडळ अधिकारी निबर्गी यांनी ताब्यात दिलेली असून खाली नमूद केल्याप्रमाणे सदर मिळकतीचा जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. तरी इच्छुक खेरदीदारांनी सदर लिलावाच्या वेळी हजर राहून लिलाव विकीमध्ये सहभागी व्हावे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | थकबाकीदारांचे नाव व पत्ता | स्थावर मिळकतीचा तपशिल गट नंबर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर | श्री हणमंत रामचंद्र कुलकर्णी रा. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर | मौजे. माळकवठे ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर येथील गट नं २१२/१/अ/२, क्षेत्र २.४४ |

| लिलावाची तारीख | लिलावाची वेळ | लिलावाची ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ४ | ५ | ६ | ७ |
| वारः- सोमवार दिनांकः-२४.११.२०२५ | सकाळी ११.00 वाजता | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर प्रधान कार्यालय | |

टिप - १) लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येईल.
२) लिलाव तारखेपूर्वी कर्जदाराने संपूर्ण व्याजासह रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
३) सदर मालमत्ता 'जशी आहे जेथे आहे' या तत्त्वावर लिलाव करण्यात येईल.

**ठिकाण- सोलापूर**
**दिनांक-१०.११.२०२५**

(शिक्का)

**सही/-**
विशेष वसूली व विक्री अधिकारी
द्वारा लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या खरेदीपुर्व जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर हद्दीतील जुना सर्व्हे क्र.१८३/१/ब यांसी नवीन सर्व्हे क्र.१७४/१/ब यापैकी ''सिध्दारामेश्वर नगर'' मधील प्लॉट क्र.२३0 या प्लॉटचे हद्द पुर्व-पश्चिम ३0 फुट व दक्षिणोत्तर २५ फुट यांसी एकूण क्षेत्र ७५0 चौ. फुट अथवा ६९.७0 चौ.मी. अशी खुली जागा यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणेः पुर्वेसः रस्ता, पश्चिमेस प्लॉट क्र.२२३, दक्षिणेस : प्लॉट क्र.२२९, उत्तरेस : प्लॉट क्र.२३१.

वरील नमूद मिळकत ही **श्री. अर्जुन नारायण वाघमोडे व सौ. गिरीजा अर्जुन वाघमोडे** यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे असे हमी व खात्री दिलेली आहे. वर नमूद यांनी सदर मिळकत **आमचे अशिल-सिध्दलिंग सुर्यकांत रेड्डी** यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरविलेले आहे. वर नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी आमच्या अशिलांस हमी दिलेली आहे. त्यापोटी आमचे अशिलांकडून इसाराही स्विकारलेला आहे.

तरी परंतु वर वर्णन केलेल्या खुल्या जागेवर अन्य कोणत्याही बँकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार, टाच, दान, लिज, साठेखत, पोटगी, कोर्ट दावा, गहाणखत, तारण वा बोजा वगैरे असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी कागदोपत्री हरकत आणून द्यावी अथवा लेखी स्वरुपात नोंदवावी. कोणाचीही कसलीही हरकत वा तक्रार मुदतीत न आल्यास आमचे अशिल वरील प्लॉटजागेचे खरेदीचे व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी. तद्नंतर कोणाचीही तक्रार व हरकत वर नमूद मिळकतीवर वा आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता. १०/११/२०२५.

**सही/-**
अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲंड ज्ञानेश्वर अवधुत डिंगणे**
५८, चंद्रोदय नगर, कुंभारी, ता.द. सोलापूर,
जि.सोलापूर-४१३00६. मो.नं.८६0५४८९५२५
अशिल **श्री. सिध्दलिंग सुर्यकांत रेड्डी**
रा.मौजे कुंभारी, ता.द.सोलापूर,
जि सोलापुर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर येथील तालुका अक्कलकोट पैकी मौजे डोंबरजवळगे येथील हद्दीतील शेतजमीन गट नं. १३६/१ सामाईक क्षेत्राची असलेली शेतजमीन यांसी एकूण क्षेत्र २.१९ हे आर पो.ख.0.१२ आकारणी रुपये ५ असून, त्यापैकी 0.८१ आर हे असून, याची चतुःसिमा असून, पूर्वेस - तलाव, पश्चिमेस-गट नं. १३७ मुकीद भिमराव गायकवाड, दक्षिणेस-तलाव, उत्तरेस-गट नं. १५0 अल्ली जमादार यांसी चतुसिमा असून, सदरचे मिळकतीपैकी 0.८१ आर इतके क्षेत्राची जिरायत स्वरुपाची आहे.

येणेप्रमाणे वर नमुद शेतजमीन पैकी 0.८१ आर इतकी क्षेत्राची व त्यातील तद्ंगभूत वस्तुसह व पूर्वापार चाल आलेले मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कांसह ही मिळकत श्री. अतुल सत्यवान गायकवाड रा. डोंबरजवळगे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांना वारसाहक्कांने हिश्यास आलेली मालकी व कब्जेवहिवाटीची असून, त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिल यांना विक्री करण्याचे मान्य कबूल करुन इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्बंध व निजोखमी असल्याने खात्री व हमी आमचे अशिलासह दिलेली आहे.

सबब, खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, बक्षीस, साठेखत, टाच, जप्ती इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्ततची नोटीस प्रसिध्द झालेपासून तीन दिवसाच्या आत आम्हांस खालील नमूद पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावेत मुदतीत कोणाचेही कसलेही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपूर्ण निर्वेध निजोखमी व बिनबोजाचे आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने घ्यावे.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली, तारीख १०/११/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**सही/-**
**ॲड. चिस्ती यू.एस.**
बी.ए. एलएल.बी.
ऑफिस-जुना राजवाडाजवळ, फत्तेसिंग चौक,
ता. अक्कलकोट जि. सोलापूर
मो.नं. ७0२0५११४५६

## जाहीर नोटीस

मौजे बार्शी, ता. बार्शी व परिसरातील तमाम लोकांस खाली सही करणार आमचे अशिल यांनी सांगितले व दिलेल्या माहितीवरून जाहीर रित्या कळविण्यात येते की,

मौजे बार्शी, ता. बार्शी भवानी पेठ येथील सिटी सर्वे नं. ४0७९/१/ब चे क्षेत्र ११.१0 चौ. मीटर यापैकी निम्मे क्षेत्र 0५. ५५ चौ. मी. याची चतुःसीमा पुर्वेस :- देशी दारूचे दुकान, दक्षिणेस सोलंकी यांची जागा, पश्चिमेस व उत्तरेस :- शशिकांत दामोदर परदेशी यांची मिळकत सि. स. नं. ४0७९/१/अ, येणे प्रमाणे चतुःसीमा पुर्वक मिळकत आतील तद्ंगभूत वस्तुसंह आमचे अशिलाचे कायदेशीर वडिलोपार्जित मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून महसूल पदरी आमचे अशिलाचे कायदेशीर कागदोपत्री मालक सदरी नोंद आहे. असे असताना आमचे अशिलाचे चुलत आजोबा शशिकांत दामोदर परदेशी हे आमचे अशिलाचे वर नमूद मिळकतीशी त्यांचा काही एक संबंध नसताना तसेच आमचे अशीलास सदर नमूद मिळकतीमध्ये वहिवाट करणेचा हक्क व अधिकार असताना ही आमचे अशिलाची मिळकत आमचे अशिलाचे परस्पर विक्री करणे, तिचे हस्तांतरण करणे, त्याची विल्हेवाट लावणेच्या प्रयत्नात असलेचे समजले आहे. त्या बाबत आमच्या अशीलाने त्यांचे विरुद्ध बार्शी येथील दिवाणी न्यायालयात रे. मु. नं. ७७९/२0२५ अन्वये मनाईचा दावा दाखल केलेला आहे. त्याचे काम चालू आहे.

आमचे अशिल या जाहीर नोटीशीद्वारे मौजे बार्शी, ता. बार्शी भवानी पेठ येथील व परिसरातील तमाम लोकांस आमचे अशिलाचे जागेशी भवानी पेठ बार्शी, ता. बार्शी येथील रहिवाशी आमचे अशिलाचे चुलत आजोबा शशिकांत दामोदर परदेशी यांचा काहीएक संबंध नाही. त्यामुळे कोणाचीही फसगत होवू नये म्हणून कोणीही त्यांचे बरोबर वरील नमूद आमचे अशिलाचे जागे संबंधी आमच्या अशिलाच्या उपरोक्ष कसलाही, कोणताही व्यवहार करू नये. केल्यास तो आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटिस दिली असे. दि. १०/११/२०२५.

**सही/-**
आमचे अशिल
**विशाल रंजन परदेशी**
रा. भवानी पेठ बार्शी, ता. बार्शी.

**सही/-**
**ॲड. तुषार बी. तकभाटे**
बी.ए.एलएल.बी.
बार्शी
मो. नं. ९३0७१३३९४९

**जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर.**
**रंगभवन चौक, सोलापूर ४१२00३**
**ई-मेल आयडी -** mahshodc@mhstate.nic.in
**दुरध्वनी क्रमांक 0२१७ - २६२७0७७**

## जाहीर प्रसिध्दीकरण

याव्दारे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येते की, माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार, जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, करमाळा तसेच दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, माढा या न्यायालयीन आस्थापनांकरिता लिपीक टंकलेखक, शिपाई व सफाईगार अशा काही पदांची सेवा-बाहय यंत्रणेव्दारे दोन वर्षाच्या करारान्वये, उपलब्ध करुन देण्यासाठी, नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येणार आहेत.

सविस्तर ई-निविदा सूचना व त्यासंबंधीच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर - (http://www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर हे जाहीर प्रसिध्दीकरण केल्यानंतर ७ दिवसांनी म्हणजेच दिनांक १८/११/२०२५ रोजीपासून उपलब्ध असेल.

सबब, इच्छुक नोंदणीकृत कंत्राटदार यांनी वर नमुद करण्यात आलेल्या संगणकीय संकेतस्थळी उपलब्ध होणाऱ्या ई-निविदा सूचनेनुसार ऑनलाईन निविदा सादर करावयाच्या आहेत.

ऑनलाईन प्राप्त ई-निविदांची तपासणी आणि छाननी संपूर्णपणे (http://mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर अनुज्ञेय नियमांस अनुसरुन होईल याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन ई-निविदा सादर करण्यास काही अडचण असल्यास, मदतीकरिता २४ X ७ टोल फ्री क्रमांक १८00-३0७0-२२३२ वर संपर्क साधण्यात यावा.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमच्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे. दिनांक : ११/११/२०२५

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक : ११/११/२०२५**

**सही/-**
**(मनोज एस. शर्मा)**
प्रमुख जिल्हा व सत्र
न्यायाधीश, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डोपिंग चाचणीचे पालन करणे आवश्यक

**नवी दिल्ली** : ट्रॅक अँड फील्डच्या अँटी-डोपिंग वॉचडॉग अॅथ्लेटिक्स इंटिग्रिटी युनिटने (एआययू) सोमवारी भारतीय लांब पल्ल्याच्या धावपटू वर्षा टेकाम हिच्या तीन वर्षांच्या डोपिंग बंदी प्रकरणाचा आढावा घेतला आणि एकदा एखाद्या खेळाडूला डोपिंग चाचणीसाठी सूचित केले, तेव्हा त्याने किंवा तिने त्याचे पालन करणे आवश्यक आहे हा मुद्दा स्पष्ट केला. ५ जून रोजी, गत वर्षी पुणे अर्ध मॅराथॉनमध्ये दुसरे स्थान पटकावणाऱ्या वर्षा हिला एआययूने डोप चाचणी चुकवल्याबद्दल तीन वर्षांचे निलंबन सुनावले होते. २६ मे रोजी तिला तात्पुरते निलंबित करण्यात आले होते. गत वर्षी १५ डिसेंबर रोजी झालेल्या अर्ध मॅराथॉनमध्ये तिसरे स्थान पटकावल्यानंतर वर्षा हिला स्पर्धेत चाचणीसाठी संपर्क साधण्यात आला होता, पण ती गायब झाली आणि परत आली नाही, असे एआययूने म्हटले आहे.

## अजिंक्य नाईक यांचे एमसीए अध्यक्षपद कायम

**मुंबई** : निवडणूक रिंगणात असलेल्या इतर सात उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यानंतर अजिंक्य नाईक यांनी सोमवारी मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्षपद कायम ठेवले. गत वर्षी नाईक वयाच्या ३७ व्या वर्षी संजय नाईक यांना १०७ मतांनी हरवून एमसीएचे सर्वात तरुण अध्यक्ष बनले होते. कार्यकारिणी मंडळातील इतर पदांसाठी एमसीएच्या निवडणुका बुधवारी होणार आहेत. नामांकन मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. बीसीसीआय आणि त्याच्या सदस्य संघटनांसाठी सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या लोढा समितीने आणलेल्या सुधारणांनुसार एमसीए एपेक्स कौन्सिलमध्ये सलग सहा वर्षे पूर्ण केल्यानंतर नाईक यांनी तीन वर्षांचा अनिवार्य कूल-ऑफ कालावधी पूर्ण केला असला तरी त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. माघार घेतलेल्या उमेदवारांमध्ये भाजपाचे आमदार प्रसाद लाड, शिवसेना (उबाठा), आमदार मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचा समावेश होता. आव्हाड आणि नार्वेकर दोघेही एमसीएच्या माघारी जाणाऱ्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य होते आणि त्यांनी इतर पदांसाठीही अर्ज दाखल केले आहेत.

## यश बोरामणी महाराष्ट्र २३ वर्षांखाली क्रिकेट संघात

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**



येथील यश बोरामणी याची महाराष्ट्राच्या २३ वर्षाखालील क्रिकेट संघात निवड झाली आहे. येथे झालेल्या निवड चाचणी सामन्यांमध्ये यशने पहिल्या सामन्यांत ४० धावा व दुसऱ्या सामन्यामध्ये शतक केल्यामुळे त्याची निवड झाल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी सांगितले. रांची (झारखंड) येथे होणाऱ्या स्पर्धा खेळण्यासाठी तो रवाना झाला.

## 'आयएमएस'च्या मेघनाथन राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**



येरवडा, (जि.पुणे) येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत येथील इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलच्या प्रणव्या मेघनाथन हिने १४ वर्षा खालील मुलींच्या गटात तृतीय स्थान संपादिले. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक अजय चाबुकस्वार व प्रशिक्षक आशिष हुंडेकरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका मानसी जोशी, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

## गांधी नाथाच्या ईश्वरी हेंद्रेची राज्य तलवारबाजी स्पर्धेसाठी

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**



पुणे विभागीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत गांधी नाथा रंगजी कॉमर्स ऑर्डर सायन्स ज्युनियर कॉलेजच्या ईश्वरी अतुल हेंद्रे हिने १९ वयोगटात तलवारबाजी फॉईल प्रकारात द्वितीय क्रमांक संपादिला. या कामगिरीवर तिची गारखेडा छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, प्राचार्या स्मिता रणदिवे, अमोल कांबळे आदींनी अभिनंदन करुन राज्य स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

# ध्रुव शोरी, अमन मोखाडेचे शतक

### रणजी करंडक क्रिकेट

### विदर्भाचे ओडिशासमोर ३४५ धावांचे आव्हान

♦ **नागपूर, १० नोव्हेंबर**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत व्हीसीए जामठा स्टेडियमवर सुरु असलेल्या एलिट अ गटाच्या ओडिशाविरुद्धच्या साखळी सामन्यात तिसऱ्या दिवशी अमन मोखाडे व ध्रुव शोरीच्या दमदार शतकांच्या बळावर विदर्भाने ५९ षटकांत २ बाद २१८ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला आणि ओडिशासमोर विजयासाठी ३४५ धावांचे लक्ष्य ठेवले. दिवस अखेर ओडिशाने दुसऱ्या डावात १२ षटकांत बिनबाद ४४ धावा केल्या. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून विजयासाठी ओडिशाला आणखी ३०१ धावा काढण्याची गरज आहे, तर विदर्भाला लक्ष्य गाठण्याआधी ओडिशाच्या संपूर्ण संघाला बाद करणे आवश्यक आहे.



शतकवीर अमन मोखाडे



शतकवीर ध्रुव शोरीचे दुसरे शतक

विदर्भाने पहिल्या डावात २८६ धावा नोंदविल्यानंतर ओडिशाला १६० धावांत गुंडाळून १२६ धावांची आघाडी मिळविली. आज ५९ षटकांत २ बाद २१८ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला.

ओडिशाने ६ बाद १२२ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली आणि त्यांचा पहिला डाव ७३.३ षटकांत १६० धावांतच आटोपला. विदर्भाकडून गौरव फार्डेने २८ धावांत ४ बळी, तर पार्थ रेखडेने ३१ धावांत ३ बळी टिपले. नचिकेत भुते, प्रफुल्ल हिंगे व यश कदमने प्रत्येकी एक ब ळी टिपला. विदर्भाच्ला दुसऱ्या डावाच्या प्रारंभी पहिला धक्का ब सला. सलामीवीर अथर्व तायडेला (१२) बादल बिस्वालने पायचित केले. परंतु त्यानंतर अमन मोखाडे व ध्रुव शोरीने शतकी खेळी करत विदर्भाची स्थिती बळकट केली. मोखाडे व ध्रुवने दुसऱ्या गड्यासाठी १९९ धावांची भागीदारी केली. बादल बिस्वालच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी ध्रुव शोरीने १६१ चेंडूंत ८ चौकारांसह १०१ धावांची आकर्षक शतकी खेळी केली. ध्रुवचे हे सामन्यातील दुसरे शतक ठरले असून त्याने पहिल्या डावातही १४४ धावांची शतकी खेळी केली होती. पुढे अमन मोखाडे व नचिकेत भुतेने नाबाद खेळी करत विदर्भाला ५९ षटकांत २ बाद २१८ धावा उभारून दिल्या, त्याचवेळी विदर्भाने आपला दुसरा डाव घोषित केला. मोखाडेने १५२ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने नाबाद १०१ धावांची खेळी केली. नचिकेत शून्यावर नाबाद राहिला.

विजयासाठी ३४५ धावांचा पाठलाग करताना ओडिशाच्या स्वस्तिक सामल (नाबाद २५) व गौरव चौधरीने (नाबाद १७) दिवस अखेर आपल्या संघाला बिनबाद ४४ धावा काढून दिल्या.

◀(तभा वृत्तसेवा)

# बावुमा दक्षिण आफ्रिका संघात दाखल

♦ **कोलकाता, १० नोव्हेंबर**

बंगळुरू येथे अ संघाच्या अनधिकृत कसोटी मालिकेचा भाग असलेला दक्षिण आफ्रिका संघाचा कर्णधार टेम्बा बावुमा सोमवारी सकाळी आपल्या वरिष्ठ संघात दाखल होणारा शेवटचा खेळाडू ठरला. शुक्रवारी ईडन गार्डन्सवर सुरू होणाऱ्या भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पाहुणा संघ पूर्ण ताकदीने जमला.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाची पहिली तुकडी, ज्यामध्ये मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड, कॅगिसो रबाडा आणि मार्को जॅन्सेन हे वेगवान गोलंदाज आणि पाकिस्तानमधील मालिकेत सहभागी झालेले खेळाडू रविवारी सकाळी पोहोचले होते.

बावुमा, आणखी एक खेळाडू आणि काही अधिकाऱ्यांसह, सोमवारी सकाळी बंगळुरूहून पोहोचले. मुख्य प्रशिक्षकासह बहुतेक संघ रविवारीच दाखल झाला होता, असे दक्षिण आफ्रिका संघाच्या स्थानिक व्यवस्थापकाने वृत्तसंस्थेला सांगितले.

भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना, दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा कोलकात्यात पोहोचला आणि तो दक्षिण आफ्रिकेच्या संघातील इतर खेळाडूंसोबत सामील झाला.

कसोटी मालिकेची सुरुवात शुक्रवार, १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे सुरू होणाऱ्या कसोटी सामन्यांनी होईल.



कोलकात्यात दाखल होताना दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमा

मालिकेतील दुसरा कसोटी सामना शनिवार, २२ नोव्हेंबरपासून गुवाहाटी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. कसोटी मालिकेच्या समाप्तीनंतर, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळले जातील. ◀(वृत्तसंस्था)

# 'साई'मध्ये ३२० सहायक प्रशिक्षकांची नियुक्ती होणार

### भरती होणाऱ्यांमध्ये ५० टक्के महिला

♦ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) केंद्रात २५ क्रीडा प्रकारात ३२० सहायक प्रशिक्षकांची नियुक्ती होणार आहे.

ऑलिम्पिक व आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या 'पदक रणनीती' चा भाग म्हणून क्रीडा मंत्रालयाने साई केंद्रांमध्ये २५ क्रीडा प्रकारांमध्ये ३२० सहायक प्रशिक्षकांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे.

जलचर, सायकलिंग आणि टेनिस सारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या खेळात भारतीय खेळाडूंनी विशेष चांगली कामगिरी केलेली नाही, परंतु त्यांच्यात 'प्रचंड पदक क्षमता' आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी सोमवारी सांगितले.

यामध्ये साई केंद्रांमधील प्रमुख विषयांचा समावेश असेल. निवड प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित व पारदर्शक असेल आणि त्यात केवळ त्यांच्या संबंधित विषयांमध्ये प्रमाणित किंवा परवानाधारकांचा समावेश असेल, असे मांडविया यांनी सांगितले.




आम्ही अशा खेळांना महत्त्व देण्याचा प्रयत्न करत आहोत, जे देशातील एकूण क्रीडा संस्कृती सुधारतील. टेनिस, कायाकिंग आणि कॅनोइंग सारखे खेळ कधीकधी तितके लक्ष वेधून घेऊ शकत नाहीत, परंतु त्यांच्यात प्रचंड क्षमता आहे, असेही ते म्हणाले.

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्याने दिलेल्या वचनानुसार 'सुरक्षित क्रीडा वातावरण' निर्माण करण्यासाठी आणि 'लिंग गुणवत्तेला' प्रोत्साहन देण्यासाठी भरती होणाऱ्यांमध्ये ५० टक्के महिला असतील.

ही या भरती मोहिमेचा केवळ पहिला टप्पा आहे आणि हा उपक्रम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी ३२० जणांची भरती केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

◀(वृत्तसंस्था)

### महिला संघाला मिळणार विदेशी स्ट्रेंथ-कंडिशनिंग प्रशिक्षक

**नवी दिल्ली** : महिला एकदिवसीय विश्वचषकातील ऐतिहासिक विजयानंतर, भारतीय संघाच्या प्रशिक्षक चमूमध्ये पहिल्यांदाच परदेशी स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षक असण्याची शक्यता आहे. या वर्षी एप्रिलमध्ये, बीसीसीआयने मुख्य फिजिओथेरपिस्ट आणि स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग प्रशिक्षकासाठी अर्ज मागवले होते. ■




# सोलापूरच्या इक्बाल क्लबला विजेतेपद

### राज्य डायरेक्ट व्हॉलिबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १० नोव्हेंबर-**

राज्य डायरेक्ट व्हॉलिबॉल स्पर्धेत सोलापूरच्या इक्बाल क्लबने विजेतेपद पटकाविले. त्यांचा २५ हजार रुपये रोख व सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

वैराग क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व इंडिया स्पोर्ट वैरागच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेत राज्यातील ७० संघांनी भाग घेतला होता.

या स्पर्धांचे उद्घाटन मंत्रालयातील सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी जि. प. सदस्य संतोष निंबाळकर, जगदंबा परिवाराचे अध्यक्ष डॉ.कपिल कोरके, जिल्हा परिषदेचे म ाजी सभापती मकरंद निंबाळकर, वकील संघाचे अध्यक्ष रणजीत गुंड, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेतील विजेत्या संघांस २५ हजार, द्वितीय संघास २१ हजार तर तृतीय संघास १५ हजार आणि सन्म ानचिन्ह असे बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी इंडिया स्पोर्ट संघाचे अध्यक्ष अहेमद तय्यब शेख, सचिव प्रतापसिंह बाबासाहेब माने-रेड्डी यांनी परिश्रम घेतले

**स्पर्धेतील गुणानुक्रमे आठ संघ असे** : इक्बाल क्लब सोलापूर, जेजुरी, येडशी, सोलापूर पोलीस, बस्व सूर्या लातूर, चरोली पुणे, सोलापूर सिंघम, सदगुरू पानगाव

# लक्ष्य, प्रणॉयकडून जेतेपदाची अपेक्षा


### जपान ओपन बॅडमिंटन

♦ **कुमामोटो, १० नोव्हेंबर**

मंगळवारपासून येथे ४७५,००० अमेरिकन डॉलर्सच्या कुमामोटो मास्टर्स जपान सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. भारतीय खेळाडू लक्ष्य सेन आणि एच. एस. प्रणॉयकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा आहे, तर उदयोन्मुख खेळाडू आपल्या कामगिरीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करतील.

हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेतेपद मिळवून व त्यानंतर डेन्मार्क आणि हायलो ओपनमध्ये उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवून आपला प्रभाव पुन्हा मिळविणारा लक्ष्य त्या गतीचा फायदा घेण्यास उत्सुक असेल.

सातव्या मानांकित, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चौथ्या स्थानावर राहिलेल्या अल्मोराच्या २४ वर्षीय लक्ष्य सेनला सुरुवातीच्या फेरीत जपानच्या जागतिक क्रमवारीत २५ व्या क्रमांकावर असलेल्या कोकी वतानाबेशी सामना करावा लागेल.



लक्ष्य सेन



एच. एस. प्रणॉय

२०२३ च्या जागतिक कांस्यपदक विजेता प्रणॉयला ऑलिम्पिकपूर्वी चिकनगुनिया झाला होता. त्यामुळे पॅरिससाठी त्याच्या तयारीत अडथळा निर्माण झाला होता व संघर्ष करत आहे. पॅरिसमध्ये तो वेदना सहन करून खेळला पण लवकर बाहेर पडला. केरळचा ३३ वर्षीय प्रणॉय याने २०२३ मध्ये मलेशिया मास्टर्स जेतेपद व ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये उपविजेतेपद मिळविले होते.

अमेरिकन ओपन विजेता आयुष शेट्टीने हायलो ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंगापूरच्या माजी विश्वविजेत्या लोह कीन यूला पराभूत केले होते. आता या स्पर्धेत त्याचा पहिल्या फेरीचा सामना थायलंडच्या कुनलावुत विटिडसारनशी होईल.

मकाऊ ओपन सुपर ३०० मधील उपांत्य फेरीत पोहोचलेला थरुन मन्नेपल्ली कोरियाच्या जिओन ह्योक जिनशी लढेल, तर हायलो ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचताना फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हला हरवणारा किरण जॉर्ज पात्रता फेरीत दाखल होईल. मिश्र दुहेरीत, रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे हे प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई या अमेरिकन जोडीशी लढतील. ◀(वृत्तसंस्था)



# रुद्रशक्ती गुरुकुलची सात पदकांची कमाई

### राज्य दांडपट्टा स्पर्धेत ४ रौप्य व 3 कांस्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

वाई (जि. सातारा) येथे झालेल्या दुसऱ्या राज्यस्तरीय दांडपट्टा स्पर्धेत रुद्रशक्ती गुरुकुलच्या ७ विद्यार्थीनी ४ रौप्य व ३ कांस्य अशी सात पदकांची कमाई केली.

या कामगिरीवर सर्व सात विद्यार्थ्यांची ३१ जानेवारी ते व २ फेब्रुवारी दरम्यान तामिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे सोलापूर दांडपट्टा स्पोर्ट्सचे अध्यक्ष तुकाराम भुसारे, सचिव विवेक मिस्कीन, महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप लाड, सचिव बाळा साठे, दांडपट्टा इंटरनॅशनल कौन्सिलचे सुभाष मोहिते, इंडिया सचिव अजय शहा, दांडपट्टा इंडियाचे डायरेक्टर महंमदरफी शेख, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी व सचिव संगीता फुलारी यांनी विध्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**विद्यार्थ्यांची कामगिरी** : भविष्या सिदम (रौप्य, दिव्या मिस्कीन (रौप्य), मानत्या रोहिटे (रौप्य), ममता मंडल (रौप्य), दुर्वा रोहिटे (कांस्य), स्वप्नाली जमादार (कांस्य), अथर्व बुरबुरे (कांस्य).

### सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या रंगदळची राज्य तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

पुणे विभागीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अंकिता रंगदळ हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या कामगिरीवर तिची १४ नोव्हेंबर रोजी गारखेडा छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर यांचे मार्गदर्शन लाभले.



त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी साहेब, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ राजशेखर येळीकर, अॅड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

# प्रताप क्रीडा मंडळाच्या राज्य बाल क्रीडा स्पर्धा रविवारी

### समूह नृत्यासह बुद्धिबळ, आट्यापाट्या, कुस्ती या खेळांचा समावेश

▶▶ **अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांची माहिती**

**अकलूज, दि. १० नोव्हेंबर-**

कला, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शंकरनगर येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने रविवार १६ नोव्हेंबर रोजी बालक्रीडा स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी दिली.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रताप क्रीडा मंडळाने राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, आट्यापाट्या स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, भव्य कुस्ती स्पर्धा, तर गरजूंना दिवाळीचा सण साजरा करता यावा याकरिता रत्नाई मिठाई वाटप असे विवीध उपक्रम राबवले आहेत. विजयसिंह म ोहिते पाटील क्रीडा संकुल येथे या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत बालगटापासून इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. यामध्ये लहान गटासाठी डोक्यावर चेंडू घेऊन पळणे ४० मी, मोठ्या गटासाठी धावणे ६० मी, इयत्ता पहिलीसाठी कमरेवर हात ठेवून उड्या मारत जाणे ४० मी, इयत्ता दुसरी साठी लंगडी घालत जाणे ४० मी, इयत्ता तिसरी साठी तीन पायाची शर्यत ४० मी, व इयत्ता चौथीसाठी पोत्यात पाय घालून



उड्या मारत जाणे ४० मी अशा क्रीडा प्रकाराचा समावेश आहे. या स्पर्धेतील प्रत्येक गटासाठी स्वतंत्र अशी बक्षीस ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेसाठी सहा मैदाने व ४५ पंच काम पाहणार आहेत.

स्पर्धेतील नावनोंदणी करिता रमेश गायकवाड (९८६०८७६५३५) अथवा प्रशांत जगताप (९६३७१७४१६७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपाध्यक्ष पोपटराव भोसले पाटील यांनी केले आहे. यावेळी सचिव बिभीषण जाधव, स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...

# ते दोघे बांगलादेशी की कोलकात्ताचें ?

**पोस्ट ऑफीसमधून घेतले ताब्यात, कसून चौकशी सुरु**

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

येथील रेल्वे स्थानका समोरील पोस्ट कार्यालयात आधार कार्ड अपडेटसाठी आलेल्या दोघां संशयितांना सदर बझार पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. ते दोघे बांगलादेशी आहेत की पश्चिम बंगाल येथील पोलिसांकडून खात्री केली जात आहे. हे दोघे नेमके घुसखोर आहेत की आपल्याच देशातील याची खात्री करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांनी सांगितले. सोमवारी दुपारच्या सुमारास रेल्वे स्टेशनसमोरील पोस्ट कार्यालयातील आधार केंद्रात दोघे संशयित आधार अपडेटसाठी आले होते. त्यांच्याकडील आधार आणि त्यावरील पत्ता तसेच त्यांच्या हालचाली संशयित वाटल्याने ही बाब पोलिसांना कळविण्यात आली. त्यानंतर सदर बझार पोलिसांनी त्या दोघांना पोस्टातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडील आधार कार्डवरील माहिती तपासली असता, त्यावर ते पश्चिम बंगाल येथील पत्ता नमूद आहे. परंतु त्यामध्ये काही गडबड करून तो पत्ता बदलला आहे का? ही बाब तपासली जात आहे. दरम्यान, मोहोळ तालुक्यातील कामावर एका ठेकेदाराने बाहेरून २५ मजूर आणले आहेत. त्यातील हे दोन मजूर सोलापुरात आले, असल्याचेही सांगितले जात आहे. तो मक्तेदार कोण आहे, त्याच्याही माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. अलीकडील काही दिवसांपूर्वी सोलापुरातून दशहतवादी संघटनेशी संबंधित संशयितांना दहशतवाद विरोधी पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर इतर दोघां संशयितांना ताब्यात घेतले होते. आता ताब्यात घेतलेल्या संशयितांचा कोणत्या संघटनेशी संबंध आहे का, कि ते खरेच मजूर म्हणून सोलापुरात आणले गेलेतं, यातील सत्य चौकशीनंतर बाहेर पडणारं आहे.

## सासरच्या मंडळींकडून महिला, अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**बार्शी, दि. १० नोव्हेंबर-**

बार्शी पोलीस ठाण्यात पीडित विवाहित महिलेने आपल्या सासरच्या मंडळींविरुद्ध लैंगिक अत्याचार, विनयभंग, बालकावर अत्याचार आणि मारहाणीची गंभीर तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी पीडित महिलेच्या जबाबानुसार, ती आपल्या पती, सासू, दीर आणि चार वर्षीय मुलीसह बार्शी शहरात वास्तव्यास आहे. १५ ऑक्टोबर रोजी ती घरी एकटी असताना तिच्या दिराने तिचा विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या घटनेबाबत तिने पती आणि सासूला सांगितले असता, त्यांनी प्रकार गांभीर्याने न घेता तिला गप्प बसण्यास सांगितले व धमकी दिल्याचे सांगितले आहे. यानंतर ३ नोव्हेंबर रोजी पुन्हा एक धक्कादायक प्रकार घडला. फिर्यादीच्या मते, तिच्या अनुपस्थितीत तिच्या अल्पवयीन मुलीशी दिराने गैरवर्तन केले. हा प्रकार पाहिल्यानंतर तिने पुन्हा पती व सासूला सांगितले असता त्यांनी तिच्यावरच उलट शिवीगाळ आणि मारहाण केली. त्यानंतर पीडितेने आपल्या आई आणि भावांना फोनवरुन घटनेची माहिती दिली. ते विचारपूस करण्यासाठी बार्शीत आले असता सासरच्या मंडळींकडून त्यांनाही मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीने सांगितले. घटनेत पीडित महिला आणि तिच्या आईला जखमा झाल्या असून त्यांच्यावर प्रथम बार्शी ग्रामीण रुग्णालयात, नंतर धाराशिव सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तीन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी बालकांच्या संरक्षणासाठी कायद्यांतर्गत अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## सांगोला पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी

**सांगोला, दि.१० नोव्हेंबर-**

सांगोला पोलीस ठाणे येथे १५ ऑक्टोंबर रोजी फिर्यादीला मारहाण करून फिर्यादीच्या पत्नीच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र हे जबरदस्तीने चोरी केली असल्याची गुन्हा अनोळखी इसमा विरुद्ध दाखल करण्यात आला होता. या चोरीचा गुन्हा सांगोला पोलिसांनी उघडकीस आणुन उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलिसांनी गोपनीय तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हा उघडकीस आणुन आरोपी योगीराज संजय मोहोटकर (वय-२४, रा.ठी.बुध, ता.खटाव, जि.सातारा) यास ८ नोव्हेंबर रोजी अटक करून न्यायालयात हजर केले असता आरोपीस पोलिस कोठडी सुनावली. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, मंगळवेढा उपविभागीय पोलीस अधिकारी शिवपुजे, सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि.भारत वाघे, पोह. ढेरे, पोना.लेंगरे व सायबर सेलचे पोह.तांबोळी यांनी केली.

## निधन वृत्त...

### जयश्री येळदरी



**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

जयश्री अरविंद येळदरी (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता निधन झाले. सोलापूर येथील आर. एस. मोगले सारीज या फर्मचे संचालक कै. अरविंद येळदरी यांच्या त्या धर्मपत्नी होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सूना, एक मुलगी, जावई, नातवंडे, असा परिवार आहे.

### सरस्वती कन्ना



**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

साखर पेठेतील रहिवासी सरस्वती सदाशिव कन्ना (वय ७०) त्यांचे सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. भू.म. पुल्ली कन्या प्रशालेचे माजी उपप्राचार्य सदाशिव कन्ना यांच्या त्या पत्नी होत.

### भूदेवी चन्ना



**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

माधवनगर येथील भूदेवी दत्तात्रय चन्ना (वय ७९) यांचे सोमवार १० नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन स्व. दत्तात्रय चन्ना यांच्या त्या पत्नी होत.

# सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना एआय शिकण्याची संधी

**कॉप्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटिक्स मुंबई यांच्याशी कौशल्य विकास केंद्राचा सामंजस्य करार**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

शिक्षण आणि नोकरीच्या बदलत्या गरजा ओळखून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना भविष्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्र आणि कॉप्युक्स टेक्नॉलॉजी ॲनालिटिक्स मुंबई या अग्रगण्य संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या करारानुसार सोलापूर विद्यापीठातील आणि संलग्न महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता या उदयोन्मुख क्षेत्रातील अत्यंत मागणी असलेले सर्टिफिकेट कोर्सेस शिकण्याची अमूल्य संधी उपलब्ध झाली आहे. जगातील प्रत्येक उद्योग आता डेटा आणि तंत्रज्ञानावर आधारित झाला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे या नवीन युगाचे केंद्रस्थान आहे. ऑटोमेशन, डेटा ॲनालिसिस, निर्णय प्रक्रिया आणि अगदी कला-साहित्य निर्मितीपर्यंत एआयचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. या महत्त्वपूर्ण बदलाची गरज ओळखून, या सामंजस्य करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना एआय क्षेत्राती सर्टिफीकेट कोर्स इन मशिनलर्निंग, सर्टिफीकेट कोर्स इन जनेरेटिव्ह एआय, सर्टिफीकेट कोर्स इन डिपलर्निंग कोर्स शिकता येणार आहेत. यावेळी कौशल्य विकस केंद्रांचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर म्हणाले, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एआय सर्टिफिकेट कोर्सेसमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधीकारी श्रीमहादेव खराडे, विद्याधर कुलकर्णी, मयूर जव्हेरी, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप, कायदा अधिकारी ॲड. जावेद खैरादी अमोल खंडागळे उपस्थित होते.



## अन्य डे साजरे करण्यापेक्षा शिवप्रताप दिन साजरा करु : डांगे

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

छत्रपती शिवरायांना संपवण्याचा विडा घेऊन हिंदवी स्वराज्यावर चालून आलेल्या आदिलशाही सरदार अफजल खानाचा १० नोव्हेंबर १६५९ या दिवशी शिवरायांनी खात्मा केला होता. त्यानिमित्त शिवस्मारक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीस संभाजी आरमारच्या वतीने पुष्प अर्पण अभिवादन करत नाही ते डे साजरे करण्यापेक्षा शिवप्रताप दिन साजरा करू, असे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले.

यावेळी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, सागर ढगे, शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, मनिष काळे, अमित कदम, ज्ञानेश्वर डोंबळे, सागर दासी, सोमनाथ मस्के, प्रदिप मोरे, सुधाकर कारणकोट, अविनाश विटकर, सागर घाडगे, अर्जुन शिवसिंगवाले, बाळासाहेब वाघमोडे, व्दारकेश बबलादिकर, निहाल शिवसिंगवाले, प्रवीण मोरे, सुरेश मामड्याल, राज जगताप, सुरेश सुंदाळम, रोहन तपासे, पिंटू, सुमित औरंगे उपस्थित होते.




## श्री मार्कंडेय हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**तब्बल २५ वर्षांनंतर विद्यार्थी पुन्हा एकत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

तब्बल २५ वर्षांनंतर श्री मार्कंडेय हायस्कूलचे एसएससी बॅच २००० या वर्षाचे वद्यार्थी पुन्हा एकत्र येवून माजी विद्यार्थ्यांचा मेळावा होटगी रोड येथील हॉटेल बालाजी सरोवर येथे साजरा करण्यात आला.

या सोहळ्यात जवळपास ९३ विद्यार्थी उपस्थित होते. जुन्या आठवणी, मित्रमैत्रिणींची भेट, आणि गुरुजनांचा सहवास यांनी प्रत्येकाचे डोळे पाणावले.

फळ्यावरचे धडे, खडूची पांढरी रेघ, शिस्तीचे धडे, आणि निरागस मस्ती पुन्हा एकदा जिवंत झाल्यासारखी वाटली. या कार्यक्रमात सर्व शिक्षकांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाला उपस्थित राहून आपल्या सहवासाने सोहळ्याची शोभा वाढवणाऱ्या कुलकर्णी, पुराणिक, मोरे, महाबोले, येदुर, पाटील, खादिम, कोकळ, हल्लाळीकर, दिर्गुळे, कुलकर्णी, संगीता, सचिन तसेच शाळेतील शिपाई जमादार आणि वंगारी यांचे आभार मानण्यात आले. शिक्षकांनीही या सोहळ्यात मनमोकळेपणाने संवाद साधला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी माजी मुख्याध्यपकसह काही शिक्षक आणि ३ विद्यार्थ्यांना, जे आता आपल्यात नाहीत, त्यांना आदरांजली वाहिली.

## हॅक विथ उत्तर प्रदेश स्पर्धेत ‘वालचंद’ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

चंदीगड युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश कॅम्पस यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील हॅक विथ उत्तर प्रदेश २०२५ या स्पर्धेत डब्ल्यू.आय.टी.च्या विद्यार्थ्यांनी पहिला क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला ५० हजारांचे रोख पारितोषिक मिळाले.

टीमला विविध डोमेन्समध्ये (क्षेत्रांमध्ये) ऐनवेळी प्रॉब्लेम स्टेटमेंट (समस्या विधान) मिळाले, आमच्या टीमने ‘सायबर सिक्युरिटी’ ही थीम निवडली. टीम आधीपासूनच एका प्रोटोटाइपवर काम करत होती, त्यामुळे ही एक नैसर्गिक निवड होती. इतर टीम्स कानपूर, वाराणसी अशा विविध मधून आल्या होत्या, त्यामुळे स्पर्धा खूपच चुरशीची (कठीण) होती, आणि डब्ल्यू.आय.टी. टीमने सायबर सिक्युरिटी डोमेनमध्ये पहिले बक्षीस पटकावून (मिळवून) चांगली कामगिरी केली आहे. एजेण्टिक सास अप्लिकेशन डेव्हलपमेंट हॅकाथॉन या विषयावर आधारित या स्पर्धा होती. विजेत्या संघात तनमय पाटील, मायुरी गायकवाड, रोहन बेलसरे, अभिजीत मौर्य (सर्व तृतीय वर्ष ईसीएम विभाग) आणि मोनिका कोटे (तृतीय वर्ष आयटी) यांचा समावेश होता. ही स्पर्धा भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (डीएसटी), नॅशनल सायन्स अँड टेक्नॉलॉजी आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट बोर्ड (एनएसटीईडीबी), मेइटी स्टार्टअप हब आणि डीपीआयआयटी यांच्या स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे या यशाला राष्ट्रीय स्तरावर विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, डॉ. सचिन गेंगजे, मार्गदर्शक प्रा. अभिजीत मोंफरे तसेच सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.






## जि. प. अंत्रोळीचा अथर्व सुपेकर प्रथम

**तालुका टॅलेंट हंट कथाकथन स्पर्धा**

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या वतीने दक्षिण सोलापूर तालुका टॅलेंट हंट कथाकथन स्पर्धेत अथर्व नामदेव सुपेकर याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याला कीर्ती जाधव, श्रीरंग बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

मुख्याध्यापक युवराज राठोड, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे, नागनाथ म्हमाने आदी शिक्षक वृंद, गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार. विस्ताराधिकारी गुरुबाळ सनके, विस्तार अधिकारी कलबुर्गी, केंद्रप्रमुख आमसिद्ध म्हेत्रे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## अनय जोशीसह ५ विद्यार्थी मित्रांकडून पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

येथील इंडियन मॉडले स्कूल सीबीएसईच्या दहावीच्या पाच विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन पूरग्रस्त शाळेतील विद्यार्थ्याप्रती जी संवेदना दाखवून सहकार्य केले. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनय जोशी, समीहन जोशी, हुसेन कोतवाल, सावनी शहा व सम्राट माने या १० वीतील विद्यार्थ्यांनी सोलापूर जिल्ह्यात आलेला पूर ओसंडल्यानंतर तेलगाव, शिरापूर, देगांव, इ. गावातील शाळांना भेटी दिल्या व तेथील पुरामूळे झालेले शाळेचे नुकसान व विदारक परिस्थिती पाहून हे सर्व विद्यार्थी विचलीत झाले.

यातूनच या शाळांसाठी काहीतरी करावे या प्रेरणेने प्रवृत्त होऊन मदत करण्याचे ठरविले. त्यांनी सोलापूर शहरात फिरून जवळपास दोन लाखांची मदतनिधी गोळा करत असताना शहरातील लोकांनी विद्यार्थ्यांचे कौतूक करून भरभरून मदत निधी दिला. दरम्यान जि.प. शाळा तेलगावचे मुख्याध्यापक व उत्तर सोलापूर तहसीलदार यांच्याशी वेळोवेळी भेटी देवून व चर्चा करून शाळेसाठी लागणारे व विद्यार्थ्यांच्या गरजेचे साहित्य खरेदी करून सर्व साहित्य शाळा व विद्यार्थ्यांना सुपुर्द केले. या सोबत शिरापूर (मोहोळ) देगांव, समता हायस्कूल सावळेश्वर येथेही शालेय साहित्य सुपूर्द करण्यात येणार आहे.

यावेळी टेबल, एक लोखंडी कपाट, पुस्तके, स्वंयपाकाचे भांडे, जेवणाची ताटे, डस्टबीन, सिलिंग फॅन, सतरंज्या, खेळाचे साहित्य बास्केट बॉल, इत्यादी. क्रिकेट, फुटबॉल, बॅटमिंटन, स्किपिंग रोप, रिंग्स, आवश्यक सर्व चार्ट, फोटो, टेबल्स, इ.शैक्षणिक साहित्य वही, पेन, पेन्सील, वह्या, ड्राईंगबुक्स, वॉटर कलर, ब्रश इत्यादी साहित्य देण्यात आले.



# चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून सनीला दरमहा खुराकासाठी ५० हजार मानधन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १० नोव्हेंबर-**

मंत्री चंद्रकांतदादा पाटील हे मीडियाच्या बातम्यांच्या हेडलाईन्सवरून माझ्यासह अनेकांसाठी गैरसमजाचा विषय होता. पण नंदीबैलवाल्याच्या पोराने सुवर्णपदक जिंकलं तेव्हा हा माणूस त्या पैलवानाला स्वतःच्या घरी न बोलावता स्वतः त्याच्या पालावर जाऊन भेटला. त्याचबरोबर सनीला दरमहा ५० हजार देण्याची घोषणा केली असल्याचे रवीकुमार सुभाषराव यांनी सांगितले.

चंद्रकांत पाटील यांचे पुण्यात आणि मुंबईत अनेक उपक्रम चालू आहेत. मुंबईत कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांना महिनो महिने राहावे लागते. त्यांची राहण्याची खाण्याची गैरसोय होते. कॅन्सर रुग्णांचे नातेवाईक असल्याने भाड्याने खोली द्यायला लोक कचरतात. त्यामुळे चंद्रकांत पाटलांनी स्वतःच्या खर्चातून मुंबईतील मध्यवर्ती भागात एक हॉस्टेल चालवायला घेऊन कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांना एक हक्काचा ठिकाणा दिला. कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी सुरू केलेल्या मुंबईतील या प्रकल्पाचे नाव आहे ‘सावली’. आजपर्यंत देशभरातील सात हजार रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी लाभ घेतला आहे.



पुण्यात ओला उबर रिक्षाचालकांना लुटते हे बघून शहरात अनेक जागी प्रीपेड रिक्षा सेंटर उभारण्यात आले आहेत. पुणे रेल्वे स्थानकावर अशाच एका सेंटरचे भाडे लाखात आहे.चंद्रकांत दादा हे भाडे स्वतः भरतात. बाहेरून येणाऱ्या मजुरांसाठी आणि कामगारांसाठी चंद्रकांत दादा खानावळ चालवतात. ज्यातून दररोज हजारो गरीबांच्या पोटाची भूक भागवली जाते. कोथरूड मतदारसंघातील प्रत्येक बाळंतनीला दादांकडून एक किट आणि काही मदत पाठवली जाते. जेव्हा राहीबाई पोपे या बीजमातेला पद्मश्री मिळाला अन् चंद्रकांत दादा तिला भेटायला गेले तेव्हा राहीबाई म्हटल्या, दादा हा पद्मश्री ठेवू कुठं? मला घरच नाही.त्यानंतर दादांनी त्यांना भाऊबीजेची भेट म्हणून घर बांधून दिलं. त्या राहीबाई दादांना दर भाऊबीजेला ओवाळतात. गरीबांच्या गरजा या अन्न, वस्त्र, निवारा आणि दवाखाना या पलीकडे त्यांच्या अपेक्षा नसतात.किमान त्या गरजा पूर्ण करणे हे मोठ्या नेत्यांसाठी क्षुल्लक असताना अनेक नेते हे करू शकत नाहीत.

पण चंद्रकांत दादा ह्या गोष्टी करतात हे उठून दिसतं. चंद्रकांत दादांची ही बाजू बऱ्याच लोकांना माहिती नाही.हा माणूस व्यक्तिगत स्तरावर दुर्बल लोकांसाठी इतक्या गोष्टी करतो त्यामुळेच पहिल्यांदा कोथरूडमधून पक्षाच्या जोरावर निवडून आला असेल पण दुसऱ्यांदा मात्र स्वतःच्या कामाच्या बळावर हा माणूस पुण्यातून सर्वाधिक लीडने निवडून आला आहे. प्रत्येक नेत्याने दुर्बलांसाठी काम केल्यास ते लोकनेते होऊ शकतात नाहीतर आमदार,खासदार आणि मंत्री या गोष्टी फक्त नावालाच असतात. लोकनेता होण्यासाठी लोकांच्या प्रश्नांची जाण महत्वाची असते.

महाराष्ट्राच्या राजकारणातून हि जाणीव कमी होत असताना चंद्रकांत दादांनी मात्र ती शाबूत ठेवली आहे हेही नसे थोडके.




## सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पालक सभा

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकतीच पालक सभा पार पडली.

सभेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू आणि सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले उपस्थित होते. सभेचे उद्घाटन डॉ. पवार यांनी केले.

प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनीही पालकांना मार्गदर्शन करत म्हणाले, ‘‘विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांचा सृजनशील विकास आणि नैतिक मूल्यांची जोपासना ही आपल्या जबाबदारी आहे. पालक आणि शिक्षक यांच्यातील संयुक्त सहकार्य हेच यशाची गुरुकिल्ली आहे. पालक सभेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच संपलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या युवा महोत्सवात विविध ११ प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत, जनरल चॅम्पियनशिप पटकावल्याचा गौरव साजरा केला गेला. प्रा. के. एस. पाटील (विभाग प्रमुख) यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता उपाययोजना आणि महाविद्यालयात चालणाऱ्या आधुनिक शिक्षण पद्धतींची माहिती दिली. तसेच पी. जी. गार्डीयन संकल्पनेविषयी माहिती दिली.

# जिल्ह्यातील २० साखर कारखान्यांना मिळाले परवाने

- एफआरपी न भरल्याने ३ साखर कारखान्यांचे परवाना अर्ज फेटाळले
- साखर कारखान्यांचा गाळपाचा धडाका



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

एक नोव्हेंबरपासून जिल्ह्यातील यंदाच्या ऊस गाळप हंगामाला सुरुवात झाली आहे. बहुसंख्य कारखाने सुरु झाले असले तरी अनेक कारखान्यांना साखर आयुक्तांकडून अद्याप गाळप परवाना मिळालेला नाही.

यापैकी काही कारखान्यांनी याबाबत अर्जही केलेला नाही, आतापर्यंत सोलापुरातील प्रादेशिक कार्यालयाकडे जवळपास ३५ कारखान्यांनी अर्ज केलेला आहे. त्यापैकी सर्वच कारखान्यांचे अर्ज साखर आयुक्तालयाकडे पाठविण्यात आले आहेत. यातील २० कारखान्यांना परवाना मिळाला असून, इतर साखर कारखाने परवाना प्रोसेसमध्ये आहेत. दरम्यान, सिध्देश्वर, गोकुळ आणि जयहिंद साखर कारखान्याने मागील वर्षीची एफआरपी अद्याप दिलेली नाही; त्यामुळे त्यांचे गाळप परवान्याचे अर्ज प्रादेशिक कार्यालयाने फेटाळले आहेत. शासनाने आदेशीत केल्याप्रमाणे पूरग्रस्तांना प्रति टन ५ रुपये तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीला ५ रुपये आणि स्व. गोपीनाथ मुंडे महामंडळाला प्रति टन ३ रुपये भरणा केल्याशिवाय गाळप परवाना दिला जाणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले आहे, त्यानुसार आता अनेक कारखान्यांनी सदर रक्कम भरायला सुरुवात केलेली आहे. जस जसे प्रस्ताव येतील तसतसे गाळप परवानगीसाठीचे प्रस्ताव साखर आयुक्त कार्यालयाला पाठविण्यात येतील, अशी माहिती सोलापूर येथील प्रादेशिक कार्यालयाने दिली. आजतागायत सोलापूर विभागातील २० साखर कारखान्यांना परवानगी देण्यात आली असून, १५ कारखान्यांचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, या पंधरवड्यात इतरही साखर कारखान्याचे प्रस्ताव पूर्ण होवून सर्व साखर कारखाने चालू होण्याची शक्यता प्रादेशिक कार्यालयाकडून व्यक्त करण्यात आली.

# दक्षिणचे माजी उपसभापती करणार भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर :**



दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती भाजपाच्या संपर्कात असल्याने लवकरच ते काँग्रेसचा हात सोडून कमळ हाती धरणार असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे काँग्रेस पक्षाला खिंडार पडणार आहे. यामुळे कुंभारी जिल्हा परिषद गटात भाजपाची ताकद वाढणार असून काँग्रेसला धक्का बसणार आहे.

दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती कुंभारीचे आप्पासाहेब बिराजदार यांचा मागील महिन्यापासून भाजपाशी संपर्क वाढला असून अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भेट घेतली असून त्यांच्या प्रवेशाची चर्चा सुरू झाल्याची खात्रीलायक माहिती आहे.

> **१६ नोव्हेंबरला भाजप प्रवेश**
>
> आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची नुकतीच भेट घेतली आहे. १६ नोव्हेंबरला कुंभारी येथे पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश करणार आहे. त्यामुळे कुंभारी गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे.
>
> **- आप्पासाहेब बिराजदार,** माजी उपसभापती

# अब की बार पन्नास पार; स्वबळाचा नारा कायम : संतोष पवार

**सोलापूर : शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणाऱ्या सुधीर खरटमल, विष्णू निकंबे, चंद्रकांत दायमा यांसह अनेकांचा झाला सत्कार**



> शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी प्रवेश झाला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षातील छोट्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न असणार आहे. या निवडणुकीत सर्वात जास्त तरुणांना उमेदवारी देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.
>
> **- सुधीर खरटमल**

> आरक्षण सोडत प्रभाग निहाय आहे. महापालिकेच्या निवडणुकीत या अनुषंगाने महत्वाचा दिवस असून, आज राजकारणाची दिशा ठरणार आहे. त्यामध्ये राष्ट्रवादी सरस ठरणार आहे.
>
> **- आनंद चंदनशिवे**

> चर्चेनंतर युतीचा निर्णय घेण्यात येईल. स्वबळासाठी सज्ज आहे. आरक्षण सोडतीनंतर चित्र कळेल. लोकसभा विधानसभा निवडणुकीचे काम केले. तिन्ही मतदार संघात काम केले. नेते विचार करतील.
>
> **- किसन जाधव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर**

आगामी महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोलापूर शहरातील सर्व १०२ प्रभागांमध्ये पक्षाचे उमेदवार देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यामुळे यंदाच्या वर्षी अबकी बार पन्नास पार हा नारा आमचा असणार आहे. महायुती किंवा स्वबळावर निवडणूक लढवण्यासाठी आम्ही सर्वजण सज्ज आहोत, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केले.

पुढे ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत आम्ही महायुती धर्म पाळून भाजपचे कार्य केले. आता भाजपने युती धर्म पाळून महापालिका निवडणुकीत घटक पक्षाला सहकार्य करावे, अन्यथा आम्ही स्वबळावर लढण्याची तयारी केली आहे. आज आमच्या पक्षात प्रवेश केलेले ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, विष्णू निकंबे, चंद्रकांत दायमा यांसह अनेकांचा पक्षाच्या विकासाला हातभार लागणार आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा आमच्या पक्षाला होणार असल्याचेही पवार यांनी सांगितले. तत्पूर्वी शरद पवार राष्ट्रवादीतून बाहेर पडलेल्या सुधीर खरटमल, चंद्रकांत दायमा, विष्णू निकंबे, महेश गाडेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश तसेच स्वागत समारंभ संपन्न झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंढरपूर नगरपालिकेसाठी भाजपाकडून इच्छुकांची भाऊगर्दी

- नगरसेवकसाठी २२४ तर नगराध्यक्षपदासाठी ८ महिला इच्छुक.
- पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत मुलाखती संपन्न




> **नगराध्यक्षपदासाठी या महिलांनी दिल्या मुलाखती**
>
> वैशाली सुनील वाळुजकर, साधना नागेश भोसले, सीमा गणेश अधटराव, शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर), प्रतिक्षा विक्रम शिरसट (पापरकर), जयश्री अमोल डोके आणि ज्योती राजीव कटेकर, सौ.मलपे या नगराध्यक्ष पदासाठीच्या इच्छुक असलेल्या महिलांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या मुलाखतीस उपस्थिती लावली.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणूकीसाठी आता वातावरण तापू लागलेले आहे. भाजपाकडून नगरसेवक आणि नगराध्यक्षपदाची निवडणूक लढऊ इच्छिणाऱ्या मंडळींच्या मुलाखती स्वतः जिल्हाचे पालकमंत्री तथा ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थिती मध्ये पार पडल्या. दरम्यान भाजपा कडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांची भाऊगर्दी दिसून आली.

पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक येत्या २ डिसेंबर रोजी होणार आहे. यंदा शहरातील १८ प्रभागातून ३६ नगरसेवक निवडून द्यावयाचे आहेत. नगराध्यक्षपदाची निवडणूक ही जनतेतून होणार आहे. यावर्षी नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण महिलेसाठी राखीव झालेले आहे. नगरसेवकांच्या एकुण संख्येत ५० टक्के महिलांना संधी (राखीव जागा) आहे. नगरपालिका निवडणूकीसाठी सोमवारी (ता.१०) पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झालेली आहे. यंदाची निवडणूक भाजपा कडून अधिकृत कमळ चिन्हावरच लढविली जाणार आहे. त्यामुळे भाजपाकडून नगरसेवक आणि नगराध्यक्षपदाची निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांच्या मुलाखती सोमवारी पालकमंत्र्यांच्या उपस्थिती मध्ये घेण्यात आल्या. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा भाजपा (उत्तर) चे अध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतनसिंह केदार सावंत (सांगोला), पंढरपूर नगरपालिका निवडणूक प्रभारी तथा जिल्हाउपाध्यक्ष प्रणव परिचारक, तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, शहराध्यक्ष लाला पानकर आदी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक पदासाठी सुमारे २२४ इच्छुकांनी तर नगराध्यक्षपदासाठी ८ इच्छुक महिलांनी मुलाखती दिल्या.

# अकलूजचे प्रथम नगराध्यक्षपद कोणास मिळणार याची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१० नोव्हेंबर-**




आशिया खंडातील एक नंबरची ग्राम पंचायत म्हणून सर्वत्र ओळखल्या जाणाऱ्या अकलूज ग्रामपंचायत व माळेवाडी ग्राम पंचायतचे रूपांतर सलग ४३ दिवसाचे साखळी उपोषण करून एकत्रितपणे ३ ऑगस्ट २०२१ रोजी नगरपरिषदमध्ये झाले. २०११च्या जनगणनेनुसार अकलूजची लोकसंख्या ३९ हजार ९१९ होती. २०२५ मध्ये अंदाजे ४५ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असू शकते. तर ४५ हजार १२४ मतदार आहेत. तेव्हापासून अद्याप नगरपरिषदेची निवडणूक झाली नाही. परंतु, नुकतीच प्रारूप रचना तयार करण्यात आली आहे. अकलूज नगरपरिषदेची निवडणूक जाहीर झाली आहे.

नगराध्यक्ष पदाच्या झालेल्या सोडतीमध्ये अकलूज नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद हे अनुसूचित जाती महिलेसाठी आरक्षित आहे. गेली चार वर्षे नगरपरिषदेवर प्रशासक आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधीविना नगरपरिषदेचा कारभार सुरू आहे. आता १३ प्रभागातून २६ नगरसेवक निवडले जाणार आहेत.

**प्रभाग क्र. १ :** लोकसंख्या ३६६६ - प्रभाग - गिरमेवस्ती, बोरावकेवस्ती, संत नरहरी नगर, आंबेडकर नगर, दत्त नगर, राऊतनगर, शिवकृपा कॉलनी, जयशंकर नगर, निरामईनगर, के. एल. गिरमे प्लॉट, भोरी वसाहत.

**प्रभाग क्रमांक २:**लोकसंख्या ३५५३, प्रभाग - ठवरे प्लॉट, माने वस्ती पंचवटी, देशपांडे घाट, अकलाई मंदिर कमान, अकलाई नगर, स्मशान भूमी, पंचशील नगर, शिवाजी चौक, रामायण चौक, गुरूनगर, होनमाने प्लॉट, ढोर गल्ली.

**प्रभाग क्र. ३ :** लोकसंख्या ३६४४, प्रभाग - उद्यम नगर, रामबाग वसाहत, समतानगर रणजितनगर शाळा, जगताप वस्ती, पांढरे वस्ती, समतानगर, कर्मवीर चौक, महादेव नगर, कृष्णप्रिया नगर, बाराभाई गट.

**प्रभाग क्र. ४:** लोकसंख्या - ३३६४ - प्रभाग - शनी मंदिर, देशमुख घाट, देशपांडे घाट, शिवाजी चौक, रामायण चौक, रमामाता चौक, कुर्डुवाडी-माळशिरस रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, काझी गल्ली.

**प्रभाग क्र. ५:** लोकसंख्या ३६६२ - प्रभाग - नामदेव मंगल कार्यालय, आव्हाड बोळ, लोणार गल्ली, शिवापूर पेठ, नगर परिषद कार्यालय, काझी गल्ली, शनी मंदिर घाट.

**प्रभाग क्र. ६ :** लोकसंख्या ३१९८- प्रभाग - विजय चौक, जयशंकर उद्यान, नौशाद बोळ, ईदगाह मैदान, कॅम्टन शेती, जोशी गल्ली, वडर गल्ली, लोणार गल्ली, खडके प्रेस.

**प्रभाग क्र. ७ :**लोकसंख्या ३५५१- प्रभाग - सोनाज पंप, गांधी चौक, पवार वस्ती, नायर झोपडपट्टी, स्वीमिंग टँक, नागोबा कट्टा, विकास नगर.

**प्रभाग क्र. ८:** लोकसंख्या- ३१४६- प्रभाग - जयसिंह चौक, गांधी चौक, महावीर स्तंभ, सदूभाऊ चौक, महर्षी चौक, लक्ष्मी नारायण नगर, गिरझनी चौक.

**प्रभाग क्र. ९ :** लोकसंख्या ३७५८- प्रभाग- गांधी चौक, जुने बस स्थानक, डॉ. आंबेडकर चौक, महर्षी कॉलनी, इंदिरानगर, बॅकवर्ड हौसिंग सोसायटी, उपजिल्हा रुग्णालय.

**प्रभाग क्र. १० :** लोकसंख्या ३२७८- प्रभाग- अमरदीप हॉटेल, सदूभाऊ चौक, राजइंदिरा कॉम्प्लेक्स, गणेशनगर कमान, व्यंकट नगर, डॉ. आंबेडकर चौक.

**प्रभाग क्र. ११ :** लोकसंख्या ३५२१ - प्रभाग - शिवरत्न मोटर्स, सदूभाऊ चौक, महर्षी चौक, प्रतापसिंह चौक, गणेशनगर.

**प्रभाग क्र. १२:** लोकसंख्या ३६४३ - प्रभाग - सुजयनगर सर्व भाग, पोलीस कॉलनी, क्रीडा संकुल, फुले नगर, स्टार इमॅजिन सेंटर, सह्याद्री आय टी आय, शिवाजीनगर, पटेल टिम्बर, शंकरराव मोहिते महाविद्यालय, साई पार्क, सावता माळी मंदिर, गिरमे हॉटेल, भारत फुले वस्ती, नगर परिषद विभागीय कार्यालय, सयाजीराजे नगर निम्मा भाग.

**प्रभाग क्र. १३:** लोकसंख्या ३१४० - प्रभाग- शांतीनगर, बनकर वस्ती, दत्तनगर, केंगार प्लॉट, विद्यानगर, अहिल्यानगर, अर्जुननगर, संजयनगर, बोडकेवस्ती, मोरेवस्ती, तोरसकरवस्ती, मुलाणीवस्ती.

# सोलापूर दातृत्वाची खाण

**काशी जगद्गुरु श्री डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-**

सोलापूर ही संतांची भूमी आहे या या भूमीनेच जगाला अनेक थोर संत दिले. सोलापूर सारख्या संतांच्या भूमीमध्ये अशा दातृत्वाची खाण आहे. त्यामुळेच सोलापुरात आजही संस्काराच्या रूपातून श्रम आणि निष्ठा ही जपली जाते. त्यामुळेच जगातील पहिले संत साहित्याचे संशोधन केंद्र सोलापूरमध्ये होत आहे. हे सोलापूरकरांचे भूषण आहे. या संशोधनाचे कार्य साध्य करण्याचं काम काशीपीठ करते आहे. याचा आम्हाला गौरव आहे. असे गौरोद्गार काशी जगद्गुरु श्री डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी श्री जगद्गुरु विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान जंगमवाडी मठ वाराणसीद्वारा संचलित श्री काशी विश्वराध्य संत साहित्य संशोधन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी काढले.

पुढे ते म्हणाले, नेतृत्व, दातृत्व, कर्तृत्व हे पाटील घराण्याला गुरुकृपेने प्राप्त झालेले आहे. आताच्या पिढीनेही ते जपलेले आहे. त्यांच्या दातृत्वाचा गौरव कायम राहणार आहे. यावेळी काशीपीठ जगद्गुरु श्री डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आणि श्रीउज्जैन पीठ जगद्गुरु सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामीजी यादव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या अध्यासन केंद्राचे उद्घाटन मोठ्या धार्मिक वातावरणात संपन्न झाले.

याप्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीभरत जंगम जंगमवाडी मठ नेपाळ, जगदीश मल्लिकार्जुन पाटील (मल्लिकार्जुन देवस्थान शेळगी अध्यक्ष) तसेच संशोधन केंद्रासाठी वास्तूचे दातृत्व करणारे दानशूर व्यक्ती सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. शैलेश पाटील तसेच ॲड. पाटील यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. बिल.सी. स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. संशोधन केंद्राच्या माध्यमातून होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती डॉ.अनिल सर्जे यांनी दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवनसिद्ध वाडकर यांनी केले. तर प्रास्ताविक डॉ. शैलेश पाटील यांनी केले. याप्रसंगी नागणसूर महाराज, जळकोटकर शिवाचार्य, शरणय्या स्वामी सिद्धय्या स्वामी, बसवराज शास्त्री, शिवयोगी शास्त्री होळीमठ, डॉ.लवंगे, डॉ.नागेश येवले, चिदानंद मुस्तारे, विद्यानंद स्वामी, गुरुशांत रामपुरे आदींची उपस्थिती होती.

# नगरपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेसकडून इच्छुकांच्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, मैदर्गी, दुधनी, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला, अकलूज, पंढरपूर, करमाळा, कुर्डूवाडी, बार्शी या नगरपरिषद निवडणुकीसाठी जिल्ह्याचे प्रभारी, माजी आमदार व प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांच्या उपस्थितीत काँग्रेस भवन येथे मुलाखती घेण्यात आल्या.

यावेळी जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, प्रदेश सचिव सुरेश हावळे, शाहिनताई शेख, रविकिरण कोळेकर, जावेद काझी, राजेंद्र शेरखाने, ॲड अर्जुनराव पाटील, राजकुमार पवार, विजयकुमार हत्तुरे, अशपाक बळोरगी, मोतीराम चव्हाण, सिद्राम पवार, अरुण जाधव, अशोक देवकते उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष शटगार म्हणाले की, मतदार काँग्रेस पक्षाच्या पाठीशी आहेत.म्हणून कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन प्रत्येक मतदाराशी संपर्क साधावा. महागाई, बेरोजगारी, महिला वरील अत्याचार या सर्व गोष्टी गोष्टींना लोक वैतागले आहेत. काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना निवडून दिल्यास पुन्हा पूर्वीचे दिवस चांगले दिवस येतील. सर्वांनी खंबीरपणे काँग्रेसच्या पाठीशी उभे राहावे असे आवहान शटगार यांनी केले. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या नियोजनावर संघटनात्मक रणनीतीवर तसेच स्थानिक विकासावर सविस्तर चर्चा करून संघटना मजबूत करून निवडणुकीत उतरावे, असे आवाहन पक्षाचे प्रभारी मोहन जोशी यांनी केले.

यावेळी मोहोळ नगरपरिषद ३५, अक्कलकोट नगरपरिषद २५, मैदर्गी नगरपरिषद १०, दुधनी नगरपरिषद २६,मंगळवेढा नगरपरिषद २३,सांगोला नगरपरिषद २६,अकलूज नगर परिषद २६, पंढरपूर नगरपरिषद ४०, करमाळा नगर परिषद २२, कुर्डूवाडी नगरपरिषद २५, बार्शी नगरपरिषद ३९ इच्छुकांनी मुलाखती दिल्या. यावेळी तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी, किशोर पवार ,मल्लिकार्जुन पाटील, प्रशांत साळे, राहुल घुले, गिरीश शेटे, प्रतापराव जगताप, भीमाशंकर जमादार, अजयसिंह इंगोले, संजय पाटील, आदित्य फत्तेपूरकर, विजय साळुंखे, तोहिद मुल्ला, फिरोज खान, वरिष्ठ उपाध्यक्ष राजेश पवार, अर्जुनराव पाटील, राजकुमार पवार, मोतीराम चव्हाण, सिद्राम पवार, अमोल म्हमाने, गजेंद्र खरात, रमेश हसापुरे, दत्तात्रय सावंत, अमजद शेख, संतोष शिंदे, सुनीता आवगडे, नाथा ऐवळे, बाळासाहेब मगर, अशोक देवकते, हणमंत मोरे, धर्मराज पुजारी, सिद्राम सलवदे, सुदर्शन आवताडे, सिकंदरताज पाटील,जाहिर मनेर,बाळासाहेब दळवी, जहांगीर शेख, राहुल पाटील, सुहास भाळवणकर, समीर कोळी, अमर सूर्यवंशी,संदिप शिंदे, बाळासाहेब आसबे ,भाग्यवंत नायकुडे, सोमनाथ आरे, शिवाजी धोत्रे,ॲड रणजित पाटील,हमिद शिकलगार आदी उपस्थित होते.

कै. चंद्रहार (तात्या) सखाराम नारायणकर (गुरूजी)



यांच्या पावन स्मृतीस
विनम्र आदरांजली
प्रथम वर्षश्राद्ध

वार मंगळवार
दि. ११/११/२०२५
रोजी आरळी बुद्रुक, ता. तुळजापूर

सहवास जरी सुटला,
तरी स्मृति सुगंध देत राहिल...
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुमची येत राहील...!

शोकाकूल
समस्त उकरंडे परिवार
आरळी बुद्रुक, ता. तुळजापूर, जि. धाराशिव

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापूर ॲडव्हेंचर पार्क दुरुस्तीसह नव्याने सुरू

### आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नाला यश




तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत सिद्धेश्वर मंदिर लगत विकसित झालेले ॲडव्हेंचर पार्क नव्याने सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आल्यानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी त्याचा पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार आमदार देवेंद्र दादा कोठे यांच्या पाठपुराव्याने महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे आणि त्यांच्या टीमने पार्कची दुरुस्ती करून घेत नागरिकांच्या आणि बच्चे कंपनीच्या मनोरंजनासाठी सुरू केले आहे. यामुळे शहरातील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. तरी सर्व सोलापूर बांधवांनी या ॲडव्हेंचर पार्कला भेट द्यावी तसेच आपल्या मित्र परिवारास भेट देण्यास प्रेरित करावे, असेही आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले आहे.



# जुन्या-नव्यांच्या मदतीने पालिका निवडणूक ताकदीने लढू

### शरद पवार राष्ट्रवादी नूतन शहराध्यक्ष महेश गादेकर यांचा विश्वास



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१० नोव्हेंबर-
शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षपदी पुन्हा एकदा महेश गादेकर हे विराजमान झाले आहेत. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षाचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांच्या आदेशानंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी महेश गादेकर यांच्या नियुक्तीचे पत्र सुपूर्द केल्यानंतर अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना श्री. गादेकर म्हणाले, ज्यांची विचारसरणी पक्षाच्या विचारसरणीशी सुसंगत राहत नाही. महत्त्वकांक्षी आणि सत्तेचा लाभ असणारे अनेक कार्यकर्ते पक्ष आदलाबदली करतात. त्यामुळे आयाराम आणि गयाराम यांच्यावर पक्ष चालत नाही. पक्षाची स्वतःची अशी विचारसरणी आयडालॉजी असते. त्याच विचाराच्या आधारे पक्ष चालवला जातो. शरद पवार यांची विचारसरणी शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारावर पक्ष चालतो. आम्ही पहिल्यापासूनच हे विचार अंगी बांधलेले आहेत. पुरोगामी विचारसरणीचे आम्ही शरद पवार यांचे निष्ठावंत कार्यकर्ते आहोत. कोणाच्या जाण्याने किंवा येण्याने पक्ष संपत नाही. काही प्रमाणात फरक पडतो परंतु, नव्या दमाने आणि नव्या जुन्या कार्यकर्त्यांचा मेळ घालून आगामी निवडणूक सर्व ताकदीनिशी लढण्याचा विश्वास यावेळी महेश गादेकर यांनी व्यक्त केला.

जुन्या कार्यकर्त्यांचा तसेच नव्या इच्छुकांचा आदर करत सर्वांचे विचार एक संघ करून त्यातून मार्ग काढावा लागतो. त्यासाठी चातुर्य लागते. परंतु काहीजणांमध्ये हे चातुर्य नसते. त्यामुळे पक्षांतर्गत कुरघोड्या आणि राजकारण सुरू होते. असा टोलाही श्री. गादेकर यांनी पक्ष सोडून गेलेल्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना लगावला.

आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जुन्या मातब्बर मंडळींचा विश्वास संपादन करून तसेच नव्या दमाच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन निवडणुकीची व्यूव्हरचना आखू वेळ कमी आहे, मात्र काम जास्त आहे. त्यासाठी झोकून देऊन निवडणूक लढवू. ज्या प्रभागात शरद पवार यांच्या विचारसरणीचे प्रभुत्व आहे. त्या ठिकाणी निश्चितच विजय होईलच, परंतु ज्या प्रभागात पक्षाची ताकद कमी आहे. त्या ठिकाणी उभारी देण्याचे काम करू, मात्र महापालिकेत राष्ट्रवादीची सत्ता आणण्याचे आव्हान आमच्यासमोर असणार आहे. राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून सोलापूर शहर जिल्हा ओळखला जातो. परंतु आता पुन्हा ते गतवैभव परत आणण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करू. असेही श्री. गादेकर यांनी यावेळी सांगितले. गादेकर यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ढोल ताशांचा गजर आणि फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी माजी महापौर जनार्दन कारमपुरी, प्रदेश उपाध्यक्ष भरत जाधव, शंकर पाटील, माजी महापौर यू एन बेरिया, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, युवक प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, शहर युवक अध्यक्ष सर्फराज शेख आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

#### शरद पवार रविवारी सोलापूर दौऱ्यावर



नूतन शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या मुलाचे लग्न १६ नोव्हेंबर रोजी जुनी मिल कंपाऊंड येथील मैदानावर होणार आहे. या लग्नाचे आमंत्रण शरद पवार यांनी स्वीकारले आहे. त्यामुळे शरद पवार हे दि. १६ नोव्हेंबर रोजी लग्नासाठी सोलापूर दौऱ्यावर येणार असल्याचे गादेकर यांनी सांगितले.

#### आगामी महापालिका निवडणुका आघाडी किंवा स्वबळावर लढण्याची तयारी

सध्या नगरपालिका नगरपरिषद यांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. महानगरपालिका निवडणुकीचे आरक्षण सोडत आज जाहीर होईल. त्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतरच आघाडी किंवा स्वबळावाची तयारी याबाबत निर्णय घेतला जाईल. काँग्रेस तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांच्यासोबत आघाडी करायची असेल तर वरिष्ठ स्तरावरून सूचना आल्यानंतर तशी बोलणी सुरू होईल.

#### पक्ष सोडून गेलेल्यांचे होणार इनकमिंग

शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोडून इतर पक्षात गेलेले काही जुने कार्यकर्ते पुन्हा एकदा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत येण्यास इच्छुक आहेत. श्री. गादेकर अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. तसे चित्र हॉटेल सिटीपार्क येथे दिसले. शिंदे सेनेत गेलेल्या सुनंदा साळुंखे, मनीषा नलावडे आदी महिला कार्यकर्त्या पुन्हा एकदा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत येण्यास इच्छुक असल्याचे दिसून येत आहे. यासंबंधी गादेकर यांना विचारल्यास, काही कार्यकर्ते तसेच पदाधिकारी पुन्हा एकदा राष्ट्रवादी देण्यास तयार असल्याचे सांगताना घराची वाट विसरलेला व्यक्ती पुन्हा एकदा घरी आला. तर तो बाहेरचा होणार नाही. असे देखील गादेकर यांनी उद्देशून सांगितले. त्यामुळे आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर इन्कमिंगचे खरे चित्र समोर येणार आहे.

## ▶▶ महत्वाचे...



### सासरवाडीत जावयाला श्वास घेण्याचा त्रास

सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
सासूच्या घरी आलेल्या जावयाला अचानक श्वास घेण्याचा त्रास होऊ लागला. हा प्रकार जुना देगाव नाका परिसरातील हब्बु वस्ती येथे रविवारी दहाच्या सुमारास घडला. सुनील यलप्पा काटे (वय ३६, रा. वाघोली ता मोहोळ) असे जावयाचे नाव आहे. सुनील हा सोलापूर हब्बु वस्ती येथील सासरवाडीच्या घरी रविवारी रात्री १० वाजता आला होता. साधारण रात्री एकच्या सुमारास त्यास अचानक श्वास घेण्याचा त्रास होऊन हात पाय वाकडे होऊ लागले. रात्री १.३० च्या सुमारास त्यास शासकीय रुगणालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### झोपेतील व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू

सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
राहत्या घरी झोपलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. हा प्रकार डोणगाव रस्त्यावरील साठे वस्तीत रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. विजय आनंद चव्हाण (वय ४७, रा. साठे वस्ती डोणगाव रोउ, सोलापूर) असे मयत व्यकतीचे नाव आहे. विजय हे रविवारी सायंकाळच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरात झोपी गेले होते. नातेवाईकांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते कोणताच प्रतिसाद देत नसल्याने त्यांना बेशुध्दावस्थेत रात्री ८.४० वाजता शासकीय रुगणालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली.

### मासे पकडणाऱ्या तरुणाला सापाचा दंश

सोलापूर, दि. १० नोव्हेंबर -
बक्षी हिप्परगा तलावात मासे पकडताना तरुणाला सापाने दंश केला. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगा येथे रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला. आकाश बाबू पवार (वय २५ , रा. बक्षी हिप्परगा) असे तरुणाचे नाव आहे. आकाश हा रविवारी सायंकाळच्या सुमारास मासे पकडण्यासाठी बक्षी हिप्परगा तलाव येथे गेला होता. तेथे तलावातील पाण्यात मासे पकडताना त्याच्या डाव्या पायाला सापाने दंश केला. पत्नी अश्विनी हिने रात्री ८.१० वाजता शासकीय रुगणालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## जुना बोरामणी नाका चौकातील अपघातप्रकरणी बल्करचालकावर गुन्हा




तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
रस्ता क्रॉस करीत असताना एका पादचाऱ्याच्या दोन्ही पायावरून सिमेंट वाहतुकीचा बल्कर ट्रक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. हा पादचारी ६० वर्षीय असून त्याची ओळख पटली नाही. ही घटना रविवारी दुपारी दोनच्या सुमारास सोलापूर हैद्राबाद रोडवर, बोरामणी नाका जवळील गांगजी शोरुम समोर घडली. याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात बल्कर चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत पोलिस हवालदार दगडू राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बल्कर क्र. एमएच १२ एनएक्स ३४७३ चा चालक अशोकराव तुकारामराव गवळी (वय ५६, रा. लोहार गल्ली, गुलबर्गा, कर्नाटक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६० वर्षीय व्यक्ती रविवार दुपारी दोनच्या सुमारास जुना बोरामणी नाका, गांगजी शोरुम समोर दुभाजकाजवळ रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या सिमेंट वाहतुकीचा ट्रक (एमएच १२ एनएक्स ३४७३) ने समोरून धडक दिली. धडक दिल्यावर पादचारी ट्रकच्या समोरील चाकाखाली आला. ट्रकची चाके त्या व्यक्तीच्या दोन्ही पायावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याचा जागीचा मृत्यू झाला होता. रक्ताच्या थारोळ्यात बेशुध्द आवस्थेत पडला होता. या घटनेची माहिती जेलरोड पोलिसांना देण्यात आली. पोलिस हवालदार दगडू राठोड यांनी सदर व्यक्तीस दुपारी सव्वा दोनच्या सुमारास सिव्हिल रुग्णालयात दाखल केले, तो उपचारापूर्वीच मयत झाला होता. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक काझी पुढील तपास करण्यात आला आहे.

### जिल्ह्यातील १२ नगरपालिकेची निवडणुक प्रक्रिया सुरू

## पहिल्या दिवशी पंढरपुरात फक्त १ अर्ज दाखल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठींच्या मतदानाच्या तारखा नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. त्याममध्ये सोलापूर जिल्ह्यातील १२ नगरपालिकांचा समावेश असून, यासाठी अर्ज भरण्याचा आज पहिला दिवस होता. या दिवशी पंढरपूर नगरपालिकेसाठीच फक्त १ अर्ज दाखल झाला असून; इतर ११ नगरपालिकेत एकही अर्ज दाखल झाला नसल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाकडून मिळाली.

या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून, त्याचा निकाल ३ डिसेंबर रोजी होणार आहे. ही निवडणूक ईव्हीएमवर घेण्यात येणार आहे. त्यासाठी ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील १२ नगरपालिकांमध्येही या निवडणुकांचा धुराळा उडणार असून, अनेक इच्छुकांनी नगरसेवक होण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ३१ ऑक्टोबरला प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मतदान होणार आहे. दिव्यांग मतदार, तान्या बाळासह स्त्रिया, ज्येष्ठांना पहिल्यांदा मतदान करु दिले जाईल. तसेच काही मतदार केंद्र गुलाबी केंद्र असणार असून, त्यात सर्व अधिकारी या महिला असतील. यंदा नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढवण्यात आली आहे. त्यानुसार, अ वर्ग अध्यक्षपद - १५ लाख, नगरसेवक - ५ लाख, ब वर्ग अध्यक्षपद - ११ लाख २५ हजार, नगरसेवक - ३ लाख ५० हजार, क वर्ग अध्यक्षपद - ७ लाख ५० हजार, नगरसेवक - २ लाख ५० हजार तर नगरपंचायत उमेदवारांसाठी अध्यक्षपद - ६ लाख, नगरसेवक - २ लाख २५ हजार अशी खर्च मर्यादा निवडणूक आयोगाने दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनगर, अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, मोहोळ, बार्शी, पंढरपूर, अकलूज, सांगोला, मंगळवेढा, कुर्डुवाडी, करमाळा या बारा नगरपालिकांमध्ये या निवडणुका पार पडणार आहेत.



| | |
|---|---|
| नामनिर्देशन पत्र | १० नोव्हेंबर |
| अंतिम मुदत | १७ नोव्हेंबर |
| छाननी | १८ नोव्हेंबर |
| अर्ज माघारी घेण्याची तारीख | २१ नोव्हेंबर |
| निवडणूक चिन्ह वाटप | २६ नोव्हेंबर |
| मतदान | २ डिसेंबर |
| निकाल | ३ डिसेंबर |



# कोळा येथील जुगार अड्ड्यावर ग्रामीण पोलिसांचा छापा

### ४५ जुगारींना अटक; १ कोटी २० लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर -
पंढरपूर उपविभागीय कार्यालयाचे सहायक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या पथकाने कोळा (ता. सांगोला) येथे दुर्गम डोंगराळ भागामध्ये शेतातील शेडनेटमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून ४५ जुगारींना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी १ कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास करण्यात आली. गेल्या दोन महिन्यापूर्वी सांगोला तालुक्यातील एका हॉटेलच्या आडून सुरु असलेल्या कॅसिनोसारख्या जुगार अड्डयावर पोलिसांनी कारवाई करून सुमारे पावणे तीन कोटी रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. पुन्हा सांगोला तालुक्यातच जुगार अड्ड्यावर कारवाई होऊन कोट्यावधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

कोळा (ता. सांगोला) येथील शेती गट नं. १७५९ मधील शेडनेटमध्ये अंकुश आनंदा अलदर हा विनापरवाना जुगार अड्ड्डा चालवित असल्याची माहिती सहायक पोलिस अधिक्षक डगळे यांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी रविवारी रात्रीच्या सुमारास अलदर याच्या जुगार अड्ड्यावर छापा मारला. त्यावेळी शेडनेटमध्ये असलेल्या जुगार अड्ड्यात ६ गोलाकार लाकडी टेबलावर जुगारी जुगार खेळत असताना मिळून आले. यावेळी पोलिसांनी ४५ जुगारींना ताब्यात घेऊन कारवाई केली. तसेच दुचाकी वाहने, चारचाकी वाहने, रोख रक्कम, जुगार खेळण्यासाठी आणलेली रक्कम, मोबाईल, जुगार साहित्य, ५२ पानी पत्त्याचे डाव, पत्राशेड/शेडनेट मध्ये असलेल्या खुर्च्या, टेबल, फ्रिज, गॅस सिलिंडर, शेगडी असे साहित्य जप्त केले. या कारवाईत पोलिसांनी रोख ४ लाख १७ हजार ५७७ रुपये, ९ लाख ३८ हजार २०० रुपये किंमतीचे साहित्य व मोबाईल, ९६ लाख रुपये किंमतीच्या ११ चारचाकी वाहने, ९ लाख ६० हजार रुपये किंमतीची १४ दुचाकी वाहने असा एकूण १ कोटी १९ लाख १५ हजार ७७७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दालख करण्यात आला आहे. सदरची कामगीरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, सहायक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनिल पाटील, अब्दुलहमीद शेख, नितीन जगताप, महादेव पिसाळ, सहायक फौजदार ढवळे, हवालदार निलेश रोंगे, कामतकर, कांबळे, विनोद शिंदे, माने, देशमुख, पोहेकॉ/१२५ साळुंखे, शिंदे, गरड, शेख, आटपाडकर, जाधव, घोडके, पाटील, देवकते, भोसले, काकडे,, नरळे, सागर गवळी, चौगुले, टिंगरे, वैभव घायाळ, सुर्यवंशी व गोडसे यांनी केली.

## बांधकामाचे स्टील देतो म्हणून ५ लाखांची फसवणूक

### डुंगरपूर येथील मोरीवाला यास पोलिस कोठडी





तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
बांधकाम व्यापाऱ्याची ५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी जेलरोड पोलिसांनी डुंगरपूर (राजस्थान) येथून एकास अटक केली असून न्यायालयाने त्यास पाच दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

मोरीवाला मुस्ताफाभाई याकुबभाई (रा. डुंगरपूर, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत मोहम्मद शोएब म.इसाक शेख (वय ४०, रा. दारूल सलाम अपार्टमेंट, बेगम कमरूनिस्सा शाळेजवळ, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील राजू शहा (रा. अहमदाबाद, गुजरात) आणि रहिमभाई गफुरभाई भायला (रा. मोडसा, गुजरात) हे दोघे फरार आहेत.


मोहम्मद शेख यांचे सिद्धेश्वर पेठ या ठिकाणी युनायटेड स्टील केंद्र नावाच दुकान आहे. दुकानातून बांधकामासाठी स्टिल पुरवठा केला जातो. राजू शहा यांनी मोहम्मद शेख यांच्या संपर्क करून करून स्वस्तात स्टिलचा पुरवठा करण्याची ग्वाही दिली, तरी मोरीवाला याकुबभाई याच्या खात्यावर साडे चार लाख रुपये पाठवा म्हणून साडेचार लाख रुपये घेतले तर ट्रक चालक रहिमभाई भायला याच्या खात्यावर ५० हजार रुपये असे एकुण ५ लाख रुपये घेतले. या तिघांनी संगनमत करून बांधकामाचे स्टील चा माल घेवून देतो असे म्हणून पाच लाख रुपये घेतले, प्रत्यक्षात स्टीलचा माल दिला नाही. फिर्यादीने वारंवार पैशाची मागणी केली असता प्रतिसाद दिला नाही, फिर्यादीचा विश्वासघात करून अर्थिक फसवणूक केली आहे. याबाबत जेलरोड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यात जेलरोड पोलिसांनी मोरीवाला यास अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यास ५ दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक चानकोटी हे करीत आहेत.



## वाहतूक नियमनासाठी दोन पोलिसांची नियुक्ती करा

### सोलापूर रेल्वे स्टेशन रिक्षा स्टॉप संघटनेने पुकारला संप



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-
रेल्वे स्टेशन येथे अनधिकृत रिक्षावाले येतात, त्यांच्याकडे लायसन, बॅच बिल्ला नसतो. अरे रावीची भाषा करतात, भांडण करतात, मारण्याची धमकी देतात. त्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होतात. कित्येक दिवसांपूर्वी लोह मार्ग पोलिसांनी वाहतूक नियमनासाठी दोन पोलिसांची नियुक्ती करावी अशी मागणी केली होती आणि यापुढे देखील आम्ही लोहमार्ग पोलिसांकडे ही मागणी करणार आहे.

सोमवारी सकाळी काही तासांपुरता रिक्षा संघटनेच्या वतीने संप पुकारला होता व त्यानंतर वाहतूक सेवा हे सुरळीत केले असल्याची माहिती रिक्षा स्टॉप संघटनेचे उपाध्यक्ष मधुसूदन गायकवाड यांनी दिली. १४० रिक्षा संघटनेत रजिस्ट्रेशन आहेत. या संघटनेच्या रिक्षामध्ये काही राहिल्यास ते मिळण्यास वेळ लागत नाही व ते दिलेही जाते परंतु इतर बाहेरून आलेले रिक्षा याची जबाबदारी तेही घेत नाहीत आणि आम्हीही घेत नसतो. यावेळी अध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, उत्तम गवळी, रवी गुंड, वसंत माने, रमेश चौगुले, चंद्रकांत गुंड, पंकज गायकवाड आदी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२६३

**जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरे ।**
**तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ।।**

जो विषयात अडकत नाही, इंद्रियाधीन होत नाही. कर्म करुनही कर्मात आसक्ती ठेवत नाही. कर्मात मीपणाचा दुर्गंध निर्माण होऊ देत नाही. तो देहधारी असूनही व्यवहार दृष्टीने जागा असतो. असा व्यक्ति परमार्थत: वृत्तीशुन्य अवस्थेत पोहोचल्यामुळे आत्मभावात दंग असतो, तोच उत्कृष्ट योगरुढ असतो, असे भगवंतानी अर्जुनाला सांगीतले. भगवंताच्या या सांगण्याप्मागचा हेतु असा आहे की, अर्जुनाने मोहग्रस्त होऊन, या देहाला मी समजून, त्याचबरोबर हे युध्दकर्म माझ्या हातून घडणार असे समजून अहंकारात अडकू नये. तर हे युध्द निष्काम कर्म समजून पार पाडावे असे त्यांना वाटते. योगी सोडले तर बाकी सर्व शरीराच्या सौंदर्याला भुलुन देहाच्या ठिकाणी आत्मबुध्दी ठेवतात, तसेच स्वत:भोवती मी पणाचे कोश करुन घेतात आणि त्या कोशात किडयाप्रमाणे अडकुन आपणच आपला शत्रू बनतात. मी पणामुळे माणूस मीच्या जाळयात स्वत:ला स्वत:होऊनच अडकुन घेत असतो. बाहेर निघावे म्हटले तरी त्याला त्याचा मीपणा बाहेर निघु देत नाही. स्वत:च्या कल्पनेनेच माणूस मीच्या घरटयात कसा अडकतो हे सांगतांना भगवंत म्हणाले, जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरे । तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ।। अर्थात पारधी पोपटाला पकडण्यासाठी एका नळीत दोरी ओवून त्याची दोन्ही टोके बाजुला बांधतो. पोपट त्या नळीवर बसला की, त्याच्या स्वत:च्या ओझ्याने ती पोकळ नळी गरकन एका बाजुला फिरते. अशा वेळी पोपटाने पटकन उडुन जायला हवे. परंतु पोपट उडत नाही. त्याला वाटते की आपण नळी सोडली तर खाली पडतो, आणि खाली पडलो तर आपण मरु शकतो. अशी विचित्र शंका मनात आणून तो त्या नळीला घट्ट धरुन बसतो. त्याच्या नळीला घट्ट धरण्याने, म्हणजेच उडून न जाण्याने तो नळी लावणा-याच्या हाती येतो.



माणूसही कारण नसतांना खोटया मीपणात स्वत:ला या संसारात अडकुन घेतो आणि आपले सर्वस्व दु:ख, स्वार्थ, मोहाच्या अधिन करतो. म्हणून अर्जुना तू मी देह आहे असा भ्रम वाढवू नकोस. कारण यामुळे तुच तुझा शत्रू होशील. मी आत्मा आहे. असे तु वागायला हवेस. या देहाला मी मानलास तर तुला तुझे शत्रू सोडणार नाहीत. मीपणाचा अहंकार माणसाला पावला-पावलाला जाळत असतो. सुख,समाधान हे मी च्या जवळ येतच नसतात. मी ज्याच्याजवळ आहे, त्याच्याजवळ परमात्मा, आत्मसुख येण्याचे कारणच नाही. संत कबीर म्हणतात, जब मै था तब हरी नही, अब हरी है मै नही. अर्थात, जोपर्यन्त आपण या देहाला मी-मी म्हणतो, तोपर्यन्त परमात्मा, आत्मसुख आपल्या जवळ येत नाही. जेव्हा मी निघून जातो तेव्हा परमात्मा, आत्मसुख प्राप्त होत असते. मी हा आपणच निर्माण केलेला असतो. त्यामुळे त्याला आपल्यातुन घालवणे आपणाला शक्य असते. एखादी गोष्ट मी केली म्हणण्यापेक्षा आम्ही केली म्हटली तरी बराच फरक पडतो. तेव्हा आपल्यातील मी काढुन टाकला तर किती फरक पडेल याचाही विचार आपण करायला हवा. ज्ञानदेवांनी मी गीता मराठीतून स्वबळावर सांगत असल्याचे कुठेच म्हटले नाही. यावरुन आपणही हे मी केले, ते मी केले असे म्हणू नये. आपल्यातला मी आपण काढुन तरी पाहू या की आपणाला नेमके कोणते व किती सुख मिळते ते. जय जय राम कृष्ण हरी।.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार**
**दि. ११ नोव्हेंबर २०२५**
**विक्रम संवत् २०८२**
**शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - कार्तिक**
**कृ. सप्तमी (१३.५६)**
**ऋतु - वर्षा**
**नक्षत्र- पू. फाल्गुनी (२७.५४)**
**योग - प्रीती (११.११)**
**करण - तौतील (२७.४२)**
**....राहू काल....**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष - १९४२: दुसरे महायुद्ध - नाझी जर्मनीने फ्रान्सचा कब्जा घेतला.**
**१९४७: पंढरपूरचे विठ्ठल मंदिर सर्वांना खुले करण्यात आले.**
**१९६२: कुवेत देशाने नवीन संविधान अंगीकारले.**
**१९७५: अंगोला देशाला स्वातंत्र्य मिळाले.**
*** १९८१: अँटिगा आणि बार्बुडा या देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.**

# समाजकल्याण विभागाला मिळेना पूर्णवेळ अधिकारी

## महिला बालकल्याणच्या प्रसाद मिरकले यांच्याकडे अतिरिक्त पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

समाजकल्याण अधिकारी सुनिल खमितकर यांच्यानंतर सोलापूरच्या समाजकल्याण विभागाला पूर्ण वेळ अधिकारीच मिळाला नाही. दलित वस्ती सुधारणा योजना, शिष्यवृत्ती योजना, मागासवर्गीयांचे वस्तीगृह शाळा, वैयक्तिक लाभाच्या योजना, मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह अशा अनेक योजना समाजकल्याण विभागाकडून राबविल्या जातात. या योजनांसाठी कोट्यावधी रूपयांचा निधी शासनाकडून येतो. परंतु पूर्णवेळ अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाकडून नसल्याने प्रभारी अधिकाऱ्यांना काम करणे मुश्किल बनले आहे. जिल्ह्यातील वसतीगृहांसह इतर अनेक योजनांबद्दल तक्रारी असताना प्रभारी अधिकार्यांना वेळ मिळत नसल्याने लाभार्थ्यांना हेलपाटे मारावे लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे. शिवाय चौकशी व कारवाई करताना प्रभारी अधिकाऱ्यांवर बंधने येतात.

कार्यालयात कर्मचारी संख्याही अपुरे आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्येही योजनांची अंमलबजावणी व लाभ देण्यासाठी हलगर्जीपणा वाढत आहे . त्यामुळे जिल्ह्यातून आलेल्या लाभार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. लाभार्थ्यांनी आपल्या व्यथा कुणाला सांगावे ? अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे समाजकल्याण विभागाला पूर्णवेळ अधिकारी देण्याची मागणी करण्यात येत आहे.


**अतिरिक्त पदभार प्रसाद मिरकले यांच्याकडे**

सुलोचना सोनवणे यांनी समाजकल्याण विभागाचा पदभार सोडल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे. प्रभारी अधिकाऱ्यांवर हा विभाग किती दिवस चालविणार असा प्रश्न सर्वांना पडला आहे .

**पूर्णवेळ अधिकाऱ्यांची गरज**

समाजकल्याण विभागाकडून शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना राबविले जातात. यासाठी समाजकल्याण विभागाला पूर्णवेळ अधिकाऱ्याची गरज आहे. मात्र शासनाच्या उदासीनतेमुळे प्रभारी अधिकाऱ्यावर कामकाज करावे लागत आहे. शासनाच्या योजना प्रत्यक्ष अमलबजावणीसाठी पूर्णवेळ समाजकल्याण अधिकारी नेमणूक करावे.

**- नितीन रणखांबे,** तालुका अध्यक्ष, भाजपा, अनूसूचित जाती मोर्चा, दक्षिण सोलापूर



# राज्य युवा महोत्सवास सोलापूर विद्यापीठास सहा पारितोषिके

## ललित विभागास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

राजभवन आयोजित २१ वा आंतरविद्यापीठ राज्यस्तरीय युवा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने सहा पारितोषिके पटकाविली. ललित विभागाने प्रथम क्रमाकांचे पारितोषिक संपादिले. विद्यापीठाने गुणानुक्रमे सर्वसाधारण तिसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव येथे झालेल्या युवा महोत्सवात विद्यापीठाने ही कामगिरी केली. या वर्षी विद्यापीठाने इंद्रधनुष्य महोत्सवात सर्वच कलाप्रकारात गुणवत्तापूर्ण सादरीकरण करून आपल्या कलेचे प्रदर्शन केले. या महोत्सवात निसर्ग लोहार आणि जैद शेख या विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी संघाची उत्तम बांधणी करून एक चांगला संघ तयार केल्याने हे यश प्राप्त झाले आहे. गेल्या चार वर्षापासून त्यांच्या नेतृत्वात सातत्याने ऐतिहासिक यश मिळत आहे. कलेच्या क्षेत्रात विद्यार्थी चमकदार कामगिरी कपत आहे. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी अभिनंदन केले आहे.

**कामगिरी :** ललित गट सर्वसाधारण विजेतेपद, व्यंगचित्र(प्रथम), स्थळ छायाचित्रण (प्रथम), रांगोळी (द्वितीय), पोस्टर (व्दितीय), मिमिक्री (द्वितीय), प्रहसन -तृतीय (सामुहिक).

## आई रागावल्याने मुलाने प्राशन केले गोचिड मारण्याचे औषध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

शाळेला जात नसल्याने आईने मुलाला रागावले. यातून मुलाने गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले.

हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ या गावी सोमवारी सकाळी ७.३० वाजता घडला.स्वराज राजेंद्र पाटील (वय १५) असे मुलाचे नाव आहे. स्वराज हा शाळेला जाण्याचे टाळत होता.

यामुळे आई स्वराजला रागावली. यातून स्वराजने सकाळी ७.३० च्या सुमारास घरात गोचिड मारण्याचे औषध प्राशन केले. यात त्याला त्रास होऊ लागल्याने वडील राजेंद्र यांनी सकाळी ९.२० वाजता शासकीय रुगणालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# शिक्षकांनी अकारण नम्र असू नये : प्रा पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० नोव्हेंबर-**

इतर कोणत्याही व्यवसाय पेक्षा अजून बऱ्यापैकी शिक्षण क्षेत्रात नैतिकता उरली आहे शिक्षकानी अकारण नम्र असू नये शिक्षक थोडासा आक्रमक असला पाहिजे त्याच्या ज्ञानाचा चरित्र्याचा दरारा पाहिजे शिक्षकाला पाहिले की व्यवस्थेच्या मनात धडकी भरली पाहिजे. कोण माणूस किती शिकला हे महत्त्वाचे नसून तो काय करतो हे महत्त्वाचे आहे. फारसे न शिकलेल्या लोकांनीही फार मोठ्या जबाबदाऱ्या महाराष्ट्रात पार पाडल्या आहेत आपल्यामध्ये आत्मविश्वास किती आहे हे फार महत्त्वाचे.असे प्रतिपादन प्रा प्रदीप पाटील यानी केले.

ते प्रेरणा प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या कृतिशील शिक्षक व वाचक पुरस्कार वितरण समारंभात अध्यक्षपदावरुन बोलत होते.

या वेळी पुरस्कार वितरण करताना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी म्हणाले आजचा हा सोहळा म्हणजे केवळ शिक्षक दिनाचे आणि वाचन प्रेरणा दिनाचे मंगल मिलन नाही, तर प्रेरणा प्रतिष्ठानने शिक्षणाच्या ज्ञानगंगेत आपले सर्वस्व अर्पण केलेल्या कृतिशील शिक्षकांचा केलेला कृतज्ञ सन्मान आहे. आज येथे उपस्थित असलेले प्रत्येक शिक्षणप्रेमी आणि वाचनप्रेमी पुस्तकांचा सागर आणि ज्ञानाचा किनारा यांचा साक्षीदार आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे विभागीय सचिव कल्याणराव शिंदे, कवी मारुती कटकधोंड यानीही आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्राथमिक शिक्षक जनार्दन वाघमारे (सोलापुर) अनिता क्षिरसागर (मंगळवेढा) माध्यमिक शिक्षक मनिषा पाटील (हवेली देशिंग) सचिन धनवट (पुणे) उच्च माध्यमिक शिक्षक प्रा.डॉ. मच्छिंद्रनाथ नागरे (केम)आणि महाविद्यालयीन शिक्षक प्रा.डॉ. अरुण कोळेकर (सासवड) याना कृतिशील शिक्षक पुरस्काराने तर वाचकदिनाच्या औचित्याने दिला जाणारा ज्ञानेश्वर षडानन् जडे स्मृती बहुश्रुत वाचक पुरस्कार प्रा.संतोष मनोहर फटे (श्री.संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा) याना तर स्व. इंदुमती ज्ञानेश्वर जडे स्मृती वाचन प्रेरणा पुरस्कार प्रा. सविता दुधभाते ( उमा शिक्षण शास्त्र महाविद्यालय,पंढरपुर) याना देण्यात आला.पुरस्कार्थींच्यावतीने मनिषा पाटील, प्रा.डॉ.मच्छिंद्र नागरे व प्रा.डॉ. अरुण कोळेकर यानी सत्कारास उत्तर दिले.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रेरणा प्रतिष्ठानचे प्रेरणास्थान माजी शिक्षणाधिकारी ना.भि. पाटील याना श्रध्दांजली वाहण्यात आली.

दिपप्रज्वलन व्यासपिठावरील मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्षा अरुणा माळी व बळीराजा पतसंस्थेचे चेयरमन दामोदर देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक भारती धनवे, सूत्रसंचालन व आभार दया वाकडे यानी केले. समारंभास प्रेरणाचे अध्यक्ष प्रकाश जडे, उपाध्यक्ष ए.बी. शेख, संभाजी सलगर दामाजी एक्सप्रेसचे संपादक दिगंबर भगरे,रेखा जडे, अर्चना सलगर, अॅड.रमेश जोशी. लहु ढगे,पोपट महामुरे, वैभव मोडक ,डॉ.अतुल निकम, अमोल मिरजकर, प्राचार्य बाळासाहेब भोरकडे उपस्थित होता.

# लोकवर्गणीसाठी 'माझ गाव माझ तीर्थ' मोहीम राबविणार : डेप्युटी सीईओ भुजबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

कामानिमित्त बाहेरगावी असणारे, वेगेवेगळया गावात राहून गावाच्या कल्याणासाठी काम करणारे, विविध क्षेत्रात नावलैकीक मिळवलेले व गावाच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांकडून गावातील शाळा, अंगणवाडया व ग्रामपंचायती यासह इतर शासकीय कार्यालयांच्या विकासासाठी 'माझं गाव माझं तीर्थ' मोहीम राबविणार असल्याची माहीती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी दिली.

मुख्यमंत्री पंचायतराज समृध्द अभियानांतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेकडून पहिल्या टप्प्यात ग्राम पंचायत कर वसूल करण्यासाठी मिशन कर संकलन मोहीम राबविण्यात आली आहे. या मोहीमेला नागरीक व ग्रामपंचायतीकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री पंचायतराज समृध्द अभियानांतर्गत दुसऱ्या टप्प्यात गावांच्या विकासावर भर देण्यात येणार असून लोकवर्गणी जमा करण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे. या माध्यमातून गावांच्या विकासाबरोबर त्या लोकांचा नागरीकांशीही नाळ जोडून राहणार आहे. तसेच विकासाला नवी दिशा मिळणार आहे.

# दिव्यांगाच्या कार्यालयाला संवेदनशील अधिकाऱ्याची गरज

जिल्हा माजी आमदार बच्चू कडू यांनी मोठया कष्टाने व प्रयत्नाने दिव्यांग कार्यालयाला मंजूरी मिळवून राज्यातील अंध, अपंग, मतिमंद व दिव्यांगांना न्याय मिळवून दिला आहे. दिव्यांगाना वाली नसल्याने अनेक वर्षांपासून त्यांच्या समस्यांकडे सरकार व समाजाचेही दुर्लक्ष होत हेते. मात्र माजी आमदार कडू यांनी राज्यातील लाखो दिव्यांगाच्या कल्याणासाठी स्वतंत्र दिव्यांग खाते निर्माण केले. यामुळे दिव्यांगाना समस्या सांगण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी योजना तयार करण्यासाठी स्वतंत्र विभाग अस्तिवात आला. मात्र सरकारच्या उदासीनतेमुळे या विभागांना स्वतंत्र अधिकारी मिळत नसल्याने दिव्यांगाच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे दिव्यांग कार्यालयांना स्वतंत्र अधिकारी देण्याची गरज आहे.





**जिल्हा परिषदेतून**
**अमोगसिध्द मुंजे**
**मो. 9423535294**

दिव्यांग बांधवांचे पालन पोषण करताना पालकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. शिवाय त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. म्हणून सरकार दिव्यांगांना प्रमाणपत्र मिळवून देण्यापासून ते शासनाच्या योजनांच्या लाभ देण्यापर्यंत सर्व शासकीय कामे दिव्यांग कार्यालयाकडून करून घेतली जातात. या कार्यालयाला स्वतंत्र व संवेदनशील अधिकारी मिळाल्यास दिव्यांगांच्या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. मात्र, दिव्यांग कार्यालय निर्माण होऊन दोन वर्षे होत आले तरी अनेक जिल्हा परिषद कार्यालयात या विभागासाठी स्वतंत्र अधिकारी नसल्याने प्रभारी अधिकाऱ्यांवर कारभार चालविला जात आहे. त्यामुळे दिव्यांगांच्या पदरी निराशा येत आहे.

दोन महिन्यांपूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेकडून पहिल्या मजल्यावर दिव्यांग कार्यालय सुरू करण्यात आले. त्यावेळी समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आले. कार्यालय सुरू झाल्यानंतर या कार्यालयात अधिकाऱ्यांचे दर्शन दुर्मिळ बनले आहे. त्यांच्याकडे समाज कल्याण विभागाचाही अतिरिक्त पदभार असल्याने त्यांच्याकडून दिव्यांग विभागाला न्याय मिळालाच नाही. त्यामुळे त्यांनी आठवडयापूर्वी दोन्ही विभागाचा पदभार सोडल्याने दिव्यांग विभाग पुन्हा अधिकाऱ्यांच्या प्रतिक्षेत आहे. या विभागाला अधिकारीच मिळत नसतील तर दिव्यांगांचे कल्याण केंव्हा होणार? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. शासनाकडून दिव्यांगांच्या कल्याणासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी दिव्यांगांविषयी आपुलकी व संवेदना असणारा अधिकारी असणे गरजेचे आहे. मात्र जिल्हा परिषदेकडून या विभागाला प्रभारी अधिकारी देऊन दिव्यांगांची चेष्टा करण्यात येत आहे.

सरकारकडून स्वतंत्र विभाग निर्माण करताना अधिकाऱ्यांसह सर्व यंत्रणा तयार असणे गरजेचे आहे. मात्र, दिव्यांग विभाग सुरू होऊन दोन वर्षे होत आले तरी या विभागाला स्वतंत्र अधिकारी मिळत नसेल तर दिव्यांगांच्या विकासाचे काय? शासनाच्या योजना दिव्यांगांपर्यंत केव्हा पोहोचणार? याविषयी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. त्यामुळे दिव्यांग बांधवांच्या पालकांचे हाल कधी संपणार? यासारखे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेत दिव्यांग कल्याण विभाग सुरू झाला असला तरी या विभागाला अधिकाऱ्याचे दर्शन दुर्मिळच आहे. सध्या दिव्यांग कल्याण कार्यालय अधिकाऱ्यांच्या प्रतीक्षेत असून संवेदनशील अधिकारी मिळाल्यास दिव्यांगांच्या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिव्यांगांना न्याय देण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्याची गरज आहे.

# रेलवन सुपर अॅप प्रवाशांसाठी वन-स्टॉप डिजिटल कंपॅनियन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

भारतीय रेल्वेने नवीन पिढीचे डिजिटल प्लॅटफॉर्म ''रेलवन'' सुपर अॅप सादर करून प्रवाशांचा अनुभव वाढवण्याच्या दिशेने आणखी एक मोठे पाऊल उचलले आहे. अनेक प्रवाशांना अखंड सेवा प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करून, हे अॅप १ जुलै २०२५ रोजी सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टम्स () च्या ४० व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे लाँच केले गेले.

रेल्वेने प्रवाशांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सातत्याने काम केले आहे - आधुनिक गाड्या, स्टेशन पुनर्विकास आणि जुन्या डब्यांचे अत्याधुनिक कोचमध्ये रूपांतर करणे. या प्रवासात, रेलवन एक एकीकृत प्लॅटफॉर्म म्हणून उदयास आले आहे जे रेल्वे सेवांमध्ये प्रवेश सुलभ आणि आधुनिक करते.

ऑल-इन-वन डिजिटल प्लॅटफॉर्म : हे वापरकर्ता-अनुकूल, सुरक्षित आणि एकात्मिक सुपर अॅप म्हणून डिझाइन केलेले आहे, जे अँड्रॉइड प्ले स्टोअर आणि अॅप स्टोअर दोन्हीवर उपलब्ध आहे, जे वेगवेगळे अॅप्लिकेशन स्थापित न करता अनेक प्रवासी सेवांमध्ये प्रवेश देते.

रेलवन अॅप हे प्रवाशांसाठी तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि वेळ वाचवणारे प्लॅटफॉर्म आहे. या अॅपद्वारे, तिकीट बुकिंगपासून ते थेट ट्रेनच्या स्थितीपर्यंतची सर्व माहिती फक्त एका क्लिकवर उपलब्ध आहे, ज्यामुळे




रेल्वे सेवा जलद, स्मार्ट आणि अधिक विश्वासार्ह बनतात.'' अशी माहिती सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक (सिनिअर डीसीएम) योगेश पाटील यांनी दिली.

**एकात्मिक वैशिष्ट्यांमध्ये हे समाविष्ट आहे:**

- आरक्षित तिकीट बुकिंग
- आर-वॉलेट वापरून ३% सवलतीसह अनारक्षित यूटीएस तिकिटे
- लाईव्ह ट्रेन ट्रॅकिंग आणि रिअल-टाइम चौकशी
- ई-केटरिंगद्वारे फुड ऑर्डर
- तक्रार निवारण प्रणाली
- प्लॅटफॉर्म तिकिटे
- तिकीट रद्द करणे
- पीएनआर सेवा

**सोपे लॉगिन आणि सुरक्षित प्लॅटफॉर्म -**

- एमपीआयएन किंवा बायोमेट्रिक लॉगिनसह सिंगल-साइन-ऑनला समर्थन देते
- विद्यमान रेलकनेक्ट किंवा यूटीएस अॅप वापरकर्ते थेट लॉग इन करू शकतात
- नवीन वापरकर्ते किमान डेटा एंट्रीसह नोंदणी करू शकतात
- जागा वाचवणारे उपाय - अनेक स्वतंत्र अॅप्सची आवश्यकता नाही

**कसे वापरावे -**

- प्ले स्टोअर किंवा अॅप स्टोअरवरून रेलवन डाउनलोड करा
- विद्यमान रेलकनेक्ट/यूटीएस क्रेडेन्शियल्स वापरून लॉगिन करा किंवा नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा
- तिकिटे बुक करणे, ट्रेन ट्रॅक करणे, अन्न ऑर्डर करणे किंवा तक्रारी सबमिट करणे सुरू करा

**प्रवाशांना फायदे -**

- एका अॅपद्वारे अनेक सेवांमध्ये प्रवेश
- वेळ, प्रयत्न आणि कागदपत्रे वाचवते
- पारदर्शक, आधुनिक आणि प्रतिसाद देणारी प्रणाली
- तक्रारी आणि सेवा विनंत्यांचे जलद निराकरण

## महत्वाचे...



## एकत्व फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबीर ; २५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

बालदिनाचे औचित्य साधून एकत्व सोशल फाउंडेशन च्या वतीने शहरातील बाळीवेस परिसरातल्या श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित,श्री सिद्धेश्वर कन्नड पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सोलापूर येथे विद्यार्थ्यांच्या मोफत आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी आहार तज्ञ डॉ. ललिता पेठकर यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करत महत्वाच्या टिप्स त्यांनी विद्यार्थ्यांना दिल्या. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्रीशैल हत्तुरे यांचा संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा व कवयित्री सौ प्रांजली मोहीकर यांच्या हस्ते डॉ. ललिता पेठकर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रांजली मोहीकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सूत्रसंचालन राजेश केकडे यांनी प्रास्ताविक चेतन झाडे तर आभार प्रशालेच्या शिक्षिका सरस्वती आळगी यांनी मानले. याप्रसंगी फाउंडेशनचे प्रमुख दीपक करकी, किरण सरवळे, चेतन झाडे, ऋषिकेश हरसुरे, शहाबाज मकानदार, अमर बसवंते, आणि सविता बळोळी, सुमित्रा इचगे, मल्लम्मा खेराटे, सविता बिराजदार, मल्लम्मा सालीमठ, रोहिणी स्वामी, भुवनेश्वर मुद्देबिहाळ, देविका बुरुड उपस्थित होते.



## मुलींनी उपजिल्हाधिकारी जाधव यांचा आदर्श घ्यावा : सुरेश हसापूरे

**सोलापूर, दि. १० ऑक्टोबर-**

हिपळे (ता. दक्षिण सोलापूर) येथील गवळी व्यवसाय करणाऱ्या कष्टाने व जिद्दीने उपजिल्हाधिकारी पदापर्यंत आरती जाधव यांनी मजल मारली आहे. हे यश खरोखरच समाजासाठी व मुलींसाठी प्रेरणादायक आहे. आरती जाधव हिने स्पर्धा परीक्षेत यश मिळवून पालकांच्या कष्टाचे चीज केली आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देताना समाज व पालकांचे नावलौकिक करण्यासाठी जाधव यांचे आदर्श घेऊन स्पर्धा परीक्षा दिल्यास निश्चितच यश मिळेल, असे प्रतिपादन श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे यांनी केले. होटगी स्टेशन येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून उपजिल्हाधिकारी बनलेल्या हिपळे येथील आरती जाधव हिचा सत्कार करताना हसापूरे बोलत होते. यावेळी सरपंच निलम भोसले, उपसरपंच व कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सुभाष पाटोळे, ग्रामपंचायत सदस्य मिना पोरे, गायत्री ठक्के, मोहब्बवी शेख, फातिमा नदाफ, जिजाबाई धायगोडे, जाफर पटेल, अविनाश दोडतले, संतोष भोसले, अनिल रजपूत, श्रीशैल बंडगर, सचिन पडोळकर, नंदा कोकरे उपस्थित होते. यावेळी हसापूरे यांच्या हस्ते अल्ट्राटेक कंपनीमार्फत निधी मिळालेल्या कॉक्रीट रस्ता भमिपूजन करून आरओ फिल्टर प्लांटचे उदघाटन करण्यात आले. तसेच खेळाडू गणवेश व स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलांसाठी पाच हजार रूपयांची पुस्तके देण्यात आली.

## हजरत ख्वाजा सैफुल मुलुख चिस्ती दर्ग्याच्या ऊर्स निमित्त विविध कार्यक्रम

**अक्कलकोट, दि. १० नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले हजरत ख्वाजा सैफुल मुलुख चिस्ती रहमत दर्ग्याच्या ऊर्स निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती हजरत ख्वाजा सैफुल मुलुख चिस्ती दर्गा कमिटीचे चेअरमन एमडी रफिक सिराजोदीन मुजावर यांनी दिली आहे. हजरत ख्वाजा सैफुल मुलुख चिस्ती रहमत दर्ग्याच्या उरूस निमित्त दिनांक १६ नोव्हेंबर रोजी संदल गंध मिरवणूक ही कर्नाटकातील करजगी गावातून पाटील घरापासून काढण्यात येणार असून या संदल मिरवणुकीचा हैद्रा येथे समारोप होणार आहे. दिनांक १७ नोव्हेंबर रोजी चिराग दीपोत्सव संपन्न होणार आहे. रात्री नऊ वाजता दिल्ली येथील कवालान इरम चिस्ती व राजस्थान अजमेर येथील कव्वाल नौशाद शोहला यांचा कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक १८ नोव्हेंबर रोजी जियारत प्रसाद वाटप कार्यक्रम होणार आहे. तरी हिंदू मुस्लिम व सर्व धर्मीय भाविकांनी ऊर्स निमित्त दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन हजरत ख्वाजा सैफुल मुलुख चिस्ती दर्गा कमिटीचे चेअरमन एमडी रफिक सिराजोदीन मुजावर यांनी केले आहे. या उरूस निमित्त आयोजित कार्यक्रमांसाठी व्हाईस चेअरमन बंदेनवाज मुजावर, सेक्रेटरी वकील मुजावर , ट्रस्टी याकूबसाब मुजावर, जैनुद्दीन मुजावर, आयुब मुजावर, बंदेनवाज दस्तगीर बाशा मुजावर, अहमद मुजावर, अ. रऊफ मुजावर, बंदेनवाज सिराजोदीन मुजावर आदी परिश्रम घेत आहेत.

## कत्तल करण्याच्या उद्देशाने जनावरे घेवून जाणारे वाहन पकडले

**मंगळवेढा, दि. १० नोव्हेंबर-**

येड्राव ते हुलजंती जाणाऱ्या मार्गावर कत्तल करण्याच्या उद्देशाने जनावरे घेवून जाणारे वाहन पोलीसांनी ताब्यात घेवून रामचंद्र वाघमारे (वय २०),इब्राहिम सौदागर (रा.चडचण),बाबूराव केंगार (रा.येड्राव),कामू भोसले (रा. खुपसंगी) या चौघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

**चौघां विरुध्द गुन्हा**

दि. ६ रोजी १२.३० च्या दरम्यान येड्राव ते हुलजंती जाणार्या रोडवर जावीर वस्ती जवळ वरील आरोपी यांनी संगनमत करुन पिकअप क्रमांक के.ए.२८ सी. ३२६९ यामध्ये काळ्या व पांढर्या रंगाच्या जर्शी गायी त्यांना दाटीवाटीने बांधून त्यांना क्रूरपणाची वागणूक देवून कत्तल करण्याच्या उद्देशाने तसेच उपाशीपोटी ठेवून घेवून जात असताना पोलीसांना मिळून आले. पोलीसांनी ५६ हजाराच्या गायी २ लाखाचे पिकअप, ४० हजारांची मोटर सायकल असा २ लाख ९६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. दरम्यान याची फिर्याद पोलीस अंमलदार विनायक जाधव यांनी दिल्यावर वरील चौघाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माळशिरसमध्ये पशुवैद्यकीय सेवा कोलमडली

### पशुसंवर्धन विभागात रिक्त जागा; खासगी डॉक्टरांची चलती

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पशुसंवर्धन विभागात ९१ पदे मंजूर असुन त्यापैकी सध्या ४० पदे रिक्त आहेत यामुळे खरेतर तालुक्यातील शासकीय पशुवैद्यकीय सेवा पूर्ण पणे कोलमडली आहे.

माळशिरस तालुक्यात खरेतर शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून मोठ्या प्रमाणावर दुग्ध व्यवसाय सुरू आहे. ऊस, डाळिंब व इतर पिकांचे जसे मोठ्या प्रमाणात उत्पन्न आहे. तसेच या माळशिरस तालुक्यात दररोज सात ते आठ लाख लिटर दूध उत्पादन होत आहे. याठिकाणी तालुक्यात शिवामृत हा सहकारी दुध संघाबरोबर अनेक खाजगी दुध संघ तालुक्यात सध्या कार्यरत आहेत. यापैकी बोटावर मोजण्याइतकेच खासगी दुध संघ पशुवैद्यकीय सेवा देतात. यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन हा रिक्त जागांचा प्रश्न तावडतोब सोडवावा अशी मागणी तालुक्यातील पशुपालकाम धुन होत आहे.माळशिरस तालुक्यातील पिलीव, बोरगाव, वाघोली, निमगाव, संगम येथील पशुधन विकास अधिकारी ही पदे रिक्त आहेत. तर माळशिरस, नातेपुते, वेळापूर, फोंडशिरस, गुरसाळे, एकशिव याठिकाणची पशुधन पर्यवेक्षक ही पदे रिक्त आहेत.

माळशिरस तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांची सध्याची स्थिती - पशुधन विकास अधिकारी मंजुर पदे १९ पैकी १७ पदे भरली आहेत २ पदे रिक्त आहेत, पशुधन पर्यवेक्षक मंजुर पदे १९ त्यापैकी १२ पदे भरली आहेत तर ७ पदे रिक्त आहेत, व्रणोपचारक मंजूर पदे ७ पैकी ५ भरली आहेत. २ पदे रिक्त, परिचर मंजूर पदे ३६ पैकी ७ पदे भरली असून २९ पदे रिक्त आहेत. तालुक्यात एकूण ९१ पदे मंजूर असून त्यापैकी ५१ पदे भरली असून ४० पदे तालुक्यात रिक्त आहेत. यामुळे संपूर्ण तालुक्याच्या मोठ्या कार्यक्षेत्राचा विचार करता रिक्त पदांमुळे चांगली पशुवैद्यकीय सेवा देणे खूपच अवघड जात असल्याचे माळशिरस तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे यांनी सांगितले. माळशिरस तालुक्यातील रिक्त जागांबाबत आपण वारंवार शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. पण अद्यापपर्यंत शासनस्तरावरून रिक्त पदाबाबत निर्णय झाला नसल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. माळशिरस तालुक्यात खरेतर शासकीय पशुसंवर्धन विभागात तब्बल ४० पदे रिक्त आहेत. याचा खासगी डिप्लोमाधारक डॉक्टर पुरेपुर फायदा उठवित असून अनुभव नसतानाही ते डॉक्टर मोठी ऑपरेशन तसेच इतर महागड्या उपचाराने सर्व सामान्य पशुपालकांची मोठी आर्थिक लूट करीत आहेत. खरेतर शासनाने माफक दरात चांगली पशुवैद्यकीय सेवा देणे आवश्यक असताना तालुक्यातील रिक्त जागांमुळे सर्व सामान्य पशुपालकांची मोठी आर्थिक लुट होत आहे .तर अनभुवहीन डॉक्टरांची मात्र यामुळे चांगलीच चलती सुरू आहे. प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रिक्त जागा भरून सर्व सामान्य पशुपालकांना चांगली पशुवैद्यकीय सेवा कधी देणार? अशी मागणी पशुपालकांमधून होत आहे.

> सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी माळशिरस तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त जागांचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी माळशिरस तालुक्यातील पशुपालकांमधून होत आहे.

## कॉंग्रेसतर्फे बार्शी निवडणूक निरीक्षकपदी ॲड. गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १० नोव्हेंबर-**



स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी बार्शी शहर पालिका निरीक्षकपदी वळसंगचे माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. संजय गायकवाड यांना नेमणूक करण्यात आली आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार प्रणिती शिंदे, प्रभारी मोहन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक लढणार आहेत. निवडणुकीच्या दृष्टीने विधानसभा प्रमुख, तालुका, ब्लॉक अध्यक्ष, शहराध्यक्ष व प्रमुख नेते यांच्याशी समन्वय साधून निवडणुकीच्या प्रचार यंत्रणा समिती सोबत ठेवून सर्व कार्य राबवण्याची दृष्टीने निरीक्षकावर जबाबदारी टाकण्यात आली आहे.

त्याप्रमाणे बार्शी शहराच्या कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवार निवडणुकीच्या संपूर्ण जबाबदारी वळसंगचे माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. संजय गायकवाड यांना देण्यात आली आहे.

# मंगळवेढा ते दामाजी कारखाना रस्त्यावर जागोजागी खड्डे

### ऊसाची वाहने पलटी होण्याची शक्यता; रस्ता दुरुस्तीची होतेय मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १० नोव्हेंबर-**

मंगळवेढा ते दामाजी कारखाना व ब्रह्मपुरी हायवे ते दामाजी कारखाना रस्ता गेल्या तीन वर्षापासून अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे, तुटलेली डांबरी पृष्ठभाग आणि पावसाळ्यात चिखलमय झालेले मार्ग यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना ऊसाने भरलेली वाहने रोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो आहे.

दरम्यान हा रस्ता राज्य मुख्यमंत्री महामार्ग विभागाकडे आसुन याकडे त्यांचे आक्षम्य दुर्लक्ष आहे.

या रस्त्यावरून बठाण, उचेठाण, मुढवी, ब्रह्मपुरी आदी गावांतील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, दामाजी कारखाना काम गार या रस्त्यावरून नेहमीच ये-जा करतात . उसाची वाहने, ट्रॅक्टर, ट्रक आणि बैलगाड्या दररोज ये-जा करतात. रस्त्यावर पावसाने मोठ मोठे खड्डे पडले असून खड्डे चुकवण्याच्या नादात अनेकदा वाहनाचे अपघाताच्या घटना वाढल्या आहेत. माघील महिन्यात खड्डाचुकवन्याच्या नादात मोठा ट्रक रस्त्यावर पलटी झाल्याची घटना घडली होती. तद्नंतरही हा रस्ता आद्याप दूरुस्त केला नाही.शाळेच्या शिक्षकेलाही याच रस्त्यावरून जावे लागते खड्ड्याच्या त्रासाला कंटाळून त्यांनी चक्क ब्रह्पुरी मार्गे ऊचेठाण शाळेवर येने पसंत केले आहे. दामाजी कारखाना हा मंगळवेढा हे १० किलोमीटर अंतर पार करण्यासाठी पाऊण तासाचा वेळ लागत आहे. खड्ड्याच्या सम्राज्यामुळे मणक्याचे, पाठीचे आजार उदत आसल्याच्या तक्रारी आहेत.तसेच वाहनाचे नुकसान ही होत आहे. खराब रस्त्यामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, अनेकांचे प्राण धोक्यात आले आहेत. तरीही सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र डागडुजीच्या नावाखाली केवळ थातूर-मातूर काम करत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. दरवर्षी पावसाळा आला की रस्ता आणखी चिखलात आणि खड्ड्यांत गडप होतो. पण तीन वर्षांपासून प्रशासनाने डोळेझाक केली आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास शेतकरी नागरिक आंदोलनाच्या तयारीत आहेत.

## ओवी बुरांडे या विद्यार्थ्यांनीची इस्त्रो सहलीसाठी निवड

### बार्शीच्या शिरपेचात मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० नोव्हेंबर-**



सेंट जोसेफ बार्शी या शाळेमध्ये शिकणारी ओवी नागनाथ बुरांडे इयत्ता ८ वी या विद्यार्थ्यांनीची इस्त्रो सहलीसाठी निवड झाली. तिने नोबेल फाऊंडेशन जळगाव आयोजित एनएसटीएस परिक्षेच्या तिन्ही आव्हानात्मक पातळ्यांवर यशस्वीरित्या उत्तीर्ण होत इस्त्रोच्या सहलीसाठी झेप घेतली.

जिद, चिकाटी आणि अथक परिश्रमाने तिने या यशाला गवसणी घातली आहे. तिच्या या यशामध्ये जयदिप पाटील, अध्यक्ष नोबेल फाऊंडेशन व सेंट जोसेफ शाळा बार्शीचे मुख्याध्यापक तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक आणि पालकांचे मार्गदर्शन लाभले.



## तेलगू भाषिकांनी आधुनिक काळातही परंपरा जपल्या

### उपशिक्षणाधिकारी स्मिता नडीमेटला; बोम्मारिल्लू स्पर्धेत सौंदर्या कोटा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

तेलुगु भाषिक महिलांनी 'बोम्मारिल्लू'द्वारे संस्कृतीचा वारसा व परंपरा जपले आहे, याचा अभिमान वाटतो. असे मनोगत सोलापूर जिल्हापरिषदेच्या उपशिक्षणाधिकारी स्मिता नडीमेटला यांनी व्यक्त केल्या.

स्पर्धकांनी आकर्षक रांगोळी काढून, विविध कलाकुसरीतून 'बोम्मारिल्लू' साकारले होते. विजेत्यांची नावे याच कार्यक्रमात स्मिता बंडी यांनी घोषित केल्या. प्रथम क्रमांकासाठी विजेत्या ठरल्या सौंदर्या गोविंद कोटा, द्वितीय क्रमांकासाठी निर्मला वासुदेव बुरा, तृतीय क्रमांक म्हणून सरस्वती माणिक मुटकिरी यांची निवड केले. उत्तेजनार्थ म्हणून १-अमला श्रीकांत कोक्कूल, २ - खुशी श्रीनिवास कैरमकोंडा तर ३ - कल्याणी विनायक उप्पला यांनी पारितोषिक पटकावल्या. व्यासपीठावर माजी नगरसेविका राधिका दसू पोसा, रोजा मनोज पिस्के, परिक्षक स्मिता हरिप्रसाद बंडी, पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा कल्याणी अंबादास पेनगोंडा यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेसाठी इतर भाषिक समाजाच्या सपना गणेश शालगर आणि वैष्णवी आनंद शिंदे यांनी सहभाग घेतल्याबद्दल प्रा. अंबादास पेनगोंडा यांनी त्यांच्यातर्फे बक्षीस देण्याची घोषणा केले. प्रथम क्रमांकासाठी श्रीधर सुरा यांच्याकडून लेडीज वॉच, द्वितीय शामला अड्डे यांच्या तर्फे 'प्रवासी बॅग', तृतीय राधिका पोसा तर्फे इस्त्री तर मनोज पिस्के सखी फॅशन कॉर्नर तर्फे बक्षीस देण्यात आले. गौरीशंकर कोंडा यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन केले होते. हेमा मैलारी यांनी सूत्रसंचालन, गीता भूदत्त स्वागत, प्रास्ताविक सविता येदूर यांनी केले. आभार वनिता सुरम यांनी मानले. यावेळी पल्लवी संगा, मनोज पिस्के, वैकुंठम् जडल, ओमसी पल्ली उपस्थित होते.

## राजीव गांधी मेमोरियल शाळेच्या कलावंतांना सांस्कृतिक मंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक

### डॉ. सतीश साळुंके लिखित झाले मोकळे आभाळ बालनाट्याचा राज्यात तृतीय क्रमांक




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग बालराज्य नाट्य स्पर्धेत सोलापूरच्या राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड या शाळेने बालनाट्य स्पर्धेत संपूर्ण राज्यातून सांघिक तृतीय क्रमांकासह दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक आणि नेपथ्याचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविला होता. त्या पारितोषिकांचे वितरण राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न झाले.

मुंबईच्या स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी अश्विनी तडवळकर यांना झाले मोकळ्या आभाळा या बालनाट्यकरिता दिग्दर्शनाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले तर समर्थ आगाशे कलावंताला नेपथ्याचे सर्वोत्कृष्ट तिथे क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले तर सांघिक पारितोषिक प्रदान करताना सुप्रसिद्ध अभिनेते अरुण नलावडे राज्याचे सांस्कृतिक विभागाचे संचालक बिभीषण चवरे, नाट्य लेखक डॉ. दीपक रसाळ बालनाट्याच्या सूत्रधार अन्नपूर्णा साखरे हे उपस्थित होते.

याप्रसंगी आशिष शेलार यांनी संघाचे वैयक्तिक अभिनंदन करत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलाकृतींना वाफ देत आहात याचे अभिनंदन करत काम करत राहा आपण नक्कीच प्रोत्साहन देऊ असे आश्वासन दिले. संस्थेचे प्रमुख माजी आमदार प्रकाश यलगुलवार, मुख्याध्यापक शशीभूषण यलगुलवार, सौरभ शिंगाडे, आणि सूत्रधार अन्नपूर्णा साखरे यांनी या स्पर्धेसाठी विशेष सहकार्य करत विद्यार्थ्यांचे आणि कलावंतांचे अभिनंदन केले.

# प्रत्येक भाषिकांनी आपल्या भाषेचे जतन केले पाहिजे

### मौलाना कासमी; उर्दू घरात उर्दू दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० नोव्हेंबर-**

भाषा प्रत्येक धर्माची संस्कृती दर्शविते म्हणून प्रत्येक भाषिकानी आपली भाषा जतन केले पाहिजे उर्दू भाषा ही गंगा जमुनी संस्कृती आहे. उर्दू भाषा हे फक्त मुस्लीमांची भाषा नाही हे गैर समज दूर करून घ्या आणि आपण आपली भाषा जतन करा कारण ही भाषा तुमच्या आईची भाषा आहे ही मिठा कामा नये, असे मत जमियत उलमाए हिंदचे सचिव मौलाना इब्राहीम कासमी यांनी व्यक्त केले.

जागतिक किर्तीचे कवी डॉ. अल्लामा इक्बाल यांच्या जन्म दिनानिमित्त म्हणजे उर्दू दिवसा निमित्त बे-नजीर तौसीफी कमेटी व नूर ट्रस्ट्च्या वतीने आयोजि कार्यक्रमात अध्यक्षस्थानी आपले मत व्यक्त केले.

यावेळी तहरीके मुतालेआ-वाचन चळवळ पत्रिकेचा प्रकाशन मौलाना इब्राहीम कासमी , महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. हसीन अख्तर (बीड), प्रांत अधिकारी सदाशिव पडदुणे, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख , नूर ट्रस्टचे नज़ीर मुन्शी, तौसिफी कमेटीचे अध्यक्ष अय्यूब अहमद नल्लामंदू , सचिव डॉ. म. शफी चोबदार, डॉ. इस्माईल शेख, डॉ. फेरोज सय्यद, शिक्षण तज्ञ तौसीफ परवेज (पुणे), रोटरी क्लबचे शब्बीर शेख, सरिता पडदुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे हसीन अख्तर व नजीर मुन्शी यांना सन्मान-पत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सूत्रसंचालन फहीम बाटगर, सुहेल नाईक, नवाज, इमरान जमादार यांनी केले तर आभार अख्तर शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सोहेल नाईक, अमीर पठाण, अख्तर शेख, कलीम बाटघर, अली नल्लामंदू, इमरान जमादार, शोएब नाईक, माजीद वळसंगकर, माजीद बडेघर, अश्रफ पटेल, अबरार नल्लामंदू, आरीफ कर्नूल, अल्लाबक्ष चौधरी, आसीया परवीन शेख, सरय्यदा जवेरीया इनामदार, तरन्नुम जहां शेख, शाहीन सुलताना शेख, आएशा खातून शेख यांनी परिश्रम घेतले. यावेळी बीडचे डॉ सिराज आरजू, इकबाल अन्सारी, रफीक खान, मुनाफ शेख, प्राचार्य मन्नान शेख, इकबाल बागवान, मजहर अल्लोळी, शमाचे अबुबकर नल्लामंदू, हसीब नदाफ , अखलाक शेख, याकूब मंगलगीरी, मुज्म्मील बागवान, इकबाल थोटेकर उपस्थित होते.



### या मान्यवरांचा झाला गौरव

मुहिब्बे-उर्दू पुरस्कार : सदाशिव पडदुणे, (उपविभागीय अधिकारी). जीवन गौरव पुरस्कार : अब्दुल मलिक निजामी नांदेड, एम. शफी कॅटन आणि मुस्ताक अहमद लाला शेख (सोलापूर) शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य पुरस्कार : डॉ. मन्सूर ए. काझी पुणे. आदर्श अधिकारी पुरस्कार : निलोफर सय्यद (पर्यवेक्षक, शिक्षण मंडळ सोलापूर) दौलत बेगम शेख ( विस्तार अधिकारी. जिपसो ) आदर्श समाज सेवक पुरस्कार : खलीक मन्सूर, अध्यक्ष - यशवंत कामगार सेनासर्वोत्कृष्ट डिजिटल प्लॅटफॉर्म पुरस्कार बदलाव ज़रुरी है या सामाजिक उपक्रमशील संस्थेस आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार : मुबीन मडकी (नवजीवन इंग्लिश स्कूल) मज़हर इस्माईल शाहपुरे (सिटिझन उर्दू शाळा सोलापूर). आदर्श शिक्षक पुरस्कार : प्रा डॉ. ज़ैनब नायब (महिला महाविद्यालय), प्रा.डॉ. आस्मां खान ( सोशल महाविद्यालय ) साबीहा मुजावर (नॅशनल उर्दू शाळा ), मेराज मजहर अल्लोळी .(शमा उर्दू प्राथमिक शाळा), तबस्सुम परवीन शेख ( मनपा कॅम्प उर्दू शाळा ), आफरीन शेख (यू.ई.एस. उर्दू प्राथमिक शाळा), इलियास अहमद शेख (बीबी दारफळ उर्दू प्राथमिक शाळा), ख्वाजा युसुफ बेपारी (जि.प. उर्दू शाळा, दुधणी), अलमास इलियास शेख (यू.ई.एस. उर्दू हायस्कूल), बख्तियारी कौसर बानो अहमदुला ( मनपा मुले ), परवीन बेगम शेख (आयडियल उर्दू शाळा) आस्मां बांगी (ए.डी. शेख उर्दू शाळा). रीडर लीडर पुरस्कार : आयडियल उर्दू प्राथमिक शाळा, जि प उर्दू प्राथमिक शाळा, बुरहानपूर व बोरमणी यांना देण्यात आले.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वेळापुरात मराठा बांधवांच्यावतीने धनंजय मुंडे यांच्याविरोधात निवेदन

**वेळापूर, दि. १० नोव्हेंबर-**

वेळापूर येथील सकल मराठा समाज बांधव यांच्यावतीने संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे-पाटील यांना जिवे मारण्याचा कट व हत्या कट रचणारा धनंजय मुंडे यांच्यावर कडक कारवाई वेळापूर पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्या फोटोला जोडे मारून आंदोलन श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक वेळापूर चौक येथे करण्यात आले. यावेळी मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महत्त्वाचे



### आवाटी येथील प्राचार्य डॉ. जिया खलील खान यांना पीएचडी

**जेऊर, दि.१० नोव्हेंबर-**

मूळचे आवाटी (ता.करमाळा) येथील तसेच सध्या सातारा येथील छाबडा फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. जिया खलील खान यांना फार्मसी विषयांमध्ये मध्यप्रदेशातील सरदार पटेल युनिव्हर्सिटीने नुकतीच पीएचडी पदवी प्रदान केली. डॉ. खान हे करमाळा एसटी आगारातील सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक कै. खलील समशेर खान यांचे चिरंजीव, मा.सरपंच साबीर खान व येथील म. गांधी विद्यालयातील कला शिक्षक रफिक खान यांचे बंधू आहेत. सध्या सातारा येथील छाबडा फार्मसी कॉलेजमध्ये ते प्राचार्य आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण आवाटी येथे, माध्यमिक शिक्षण सुलाखे हायस्कूल बार्शी येथे तर महाविद्यालयीन शिक्षण शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे झाले आहे. डी. फार्मसी व एम. फार्मसी शिक्षण कराड येथे झाले आहे. त्यांच्या यशाबद्दल माजी आमदार जयंतराव जगताप, आमदार नारायण पाटील तसेच माजी नगराध्यक्ष वैभव जगताप, शंभूराजे जगताप, वली बाबा यांचे खादीम गुलाम नबी कादरी, इरफान कादरी, हसनैन कादरी तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक नसरुल्ला खान यांनी विशेष अभिनंदन केले आहे.



### सुळेवाडीत विठ्ठल दयाजी यात्रा उत्साहात

**पिलीव, दि.१० नोव्हेंबर-**

अधिकाऱ्यांचे गाव म्हणून ओळख असलेल्या सुळेवाडी येथील वीर पुरुष वीरगती प्राप्त झालेले विठ्ठल दयाजी व बहीण लक्ष्मी त्याच प्रमाणे सतोषा देवाची यात्रा कार्तिकी पौर्णिमेला साजरी झाली. प्रारंभी कार्तिकी द्वादशीला सांगली जिल्ह्यातील आरेवाडीचे बिरोबा मंदिर, सातारा जिल्ह्यातील म्हसवड, दिवडचे नागोबा मंदिर व बाळूमामा देवस्थान सुळेवाडी येथून तरुण कार्यकर्त्यांनी विठ्ठल दयाजी सतोषाच्या यात्रा कमिटी ट्रस्टीच्या कार्यकर्त्यांनी ज्योत आणून आरतीने यात्रेस सुरुवात केली. ढोलाच्या ठेक्यावर व सनईच्या तालात सलग तीन दिवस गजी ढोलचा खेळ सादर केला. यात्रेनिमित्त क्रिकेट स्पर्धाही घेण्यात आल्या. पौर्णिमेच्या दिवशी विठ्ठल दयाजी व लक्ष्मी व सतोषा देवास अजाबळी देऊन महाप्रसादाचे वाटप केले. यात्रेसाठी गावातील नोकर धंद्यासाठी बाहेरगावी असणारे गावकरी एकत्र आले होते. सहा गावांच्या गझी ढोल संघाने सहभाग घेतल्याची माहिती विक्रम सुळे यांनी दिली. भानुदास सुळे यांनी सुत्रसंचालन व निवेदन केले. सुमारे १०० वर्षांपासून या यात्रेस परपंरा असल्याचे सांगितले जाते.

### पिलीवचे शेतकरी मदतनिधीच्या प्रतिक्षेत

**पिलीव, दि.१० नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. प्रत्येक गावातील पंचनामे केले गेले. प्रत्येक गावातील वीस टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे सुद्धा जमा झाले. खरेतर शासनाने दिवाळी सणालाच पैसे देण्याचे जाहीर केले होते. त्याप्रमाणे पैसे जमाही झाले पण राहिलेल्या ऐंशी टक्के शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत पैसे मिळालेच नाहीत. यामध्ये बऱ्याच शेतकऱ्यांनी फार्मर आयडीच काढला नाही तर अनेक शेतकऱ्यांचा फार्मर आयडी ॲप्रोव्हल झाला नाही तर अनेक शेतकऱ्यांची बँक अकाउंटच बंद आहेत. त्याठिकाणी बँकेत केवायसी नाही.अशा अनेक अडचणींमुळे खरे तर पैसे जमा झालेच नाहीत. महसुल प्रशासनाने याद्या तहसील कार्यालयात जमा केल्या आहेत. तहसील कार्यालयातून त्या याद्या जिल्हाधिकारी कार्यालयात जमा केल्यानंतरच सदरची मदत मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# अकलूज निवडणूक बहुरंगी होणार?

**आज पहिल्या दिवशी एकही अर्ज नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१० नोव्हेंबर-**

अकलूज नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज पहिल्या दिवशी एकही अर्ज प्राप्त झाला नाही. महाविकास आघाडी व महायुतीच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती झाल्या असून महाआघाडीचे घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने स्वतंत्रपणे निवडणूक लढण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेने व महाराष्ट्र विकास सेना पक्षाने उमेदवार निश्चित केल्याने अकलुज नगरपरीषदेची निवडणूक बहुरंगी होण्याची चिन्हे आहेत.

अकलूज ग्रामपंचायतीची नगरपरिषद झाल्यानंतर पहिलीच सार्वत्रिक निवडणूक होत असुन ९९ वर्षाच्या ग्रामपंचायत कार्यकाळात महाविकास आघाडीतील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (मोहिते पाटील) गटाची सत्ता राहिली आहे. २०१९ नंतर मोहिते-पाटील भाजपात गेल्यावर ग्रामपंचायतीसह लोकसभा व विधानसभा निवडणुक (महायुती) भाजपने जिंकल्या होत्या. २०२४ मध्ये राजकीय उलथापालथ होवुन मोहिते-पाटील राष्ट्रवादीत परतल्यावर त्यांचे कट्टर विरोधक उत्तमराव जानकर यांच्याशी मनोमिलन झाल्यानंतर लोकसभा व विधानसभा निवडणुक महाविकास आघाडीने जिंकली. त्यावेळी मोहिते-पाटील व भाजपात दुरावा निर्माण झाला. मोहिते-पाटील व जानकर गट एकत्र आल्याने महाविकास आघाडीची ताकद वाढली गेली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपने माजी आमदार राम सातपुते यांना बळ दिल्याने माळशिरस तालुक्यात सातपुते यांनी मोहिते-पाटील गटाचे माने पाटील, माने देशमुख परीवारासह पानीवच्या प्रकाश पाटील यांना भाजपात आणण्यात यश मिळविले. आता अकलुज नगरपरिषदेच्या पहिल्या निवडणुकीचा बिगुल वाजला असुन या निवडणुकीत ९९ वर्षे ग्रामपंचायतीवर सत्ता राखणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे मोहिते-पाटील गट व राम सातपुतेंच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुतीसह, काँग्रेस, महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना व महाराष्ट्र विकास सेना पक्ष यांच्यात लढत होण्याची शक्यता असुन अकलुज नगरपरिषदेची निवडणुक बहुरंगी होण्याची शक्यता आहे.



अकलूज नगरपरिषदेची पहिलीच निवडणूक होत आहे. पहिले नगराध्यक्ष होण्याचा मान अनुसूचित जाती महिलेला मिळणार आहे. नगरसेवक म्हणून होण्याचा मान मिळवण्यासाठी अनेकजण प्रयत्नशील आहेत. तर नगरपरिषदेवर सत्ता मिळवण्याचा पहिला मान मिळवण्यासाठी राजकीय पक्ष सरसावले आहेत.सत्ता स्थापन करण्यासाठी स्थानिक पातळीवर आघाड्या होण्याची शक्यता असुन त्यादृष्टीने जुळवाजुळव सुरु असली तरीही भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शरद पवार गट, तसेच डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांची महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना, महाराष्ट्र विकास सेना पक्षांनी आपापल्या उमेदवारांच्या मुलाखती घेऊन जय्यत तयारी केली आहे.

## मंगळवेढा नगरपरीषद : एकही अर्ज दाखल नाही

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० नोव्हेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र पहिल्याच दिवशी कोणत्याही उमदेवाराकडून एकही अर्ज दाखल न झाल्याची माहिती निवडणूक विभागातून देण्यात आली. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

अर्ज दाखल करण्याचा पहिला दिवस शांततेत गेला. सकाळपासून दुपारपर्यंत अर्जदारांनी माहिती घेण्यासाठी निवडणूक कार्यालयात उपस्थिती लावली, मात्र कोणताही उमेदवार प्रत्यक्ष अर्ज घेऊन आला नाही. शिवाय विविध पक्षांचे स्थानिक नेते, संभाव्य उमेदवार कार्यालयात फिरताना दिसले, परंतु अधिकृत अर्ज दाखल करण्याचे धाडस कोणीही केले नाही. राजकीय जाणकारांच्या मते, प्रभाग रचनेत झालेल्या बदलांमुळे अनेक उमेदवार संभ्रमात आहेत. पक्षांतराचे वारे सुरू असल्याने अंतिम नावांची घोषणा प्रलंबित आहे. पक्षांतर्गत तिकीटवाटपासाठी अजूनही चर्चा सुरू आहेत. या सर्वांचा परिणाम अर्ज दाखल प्रक्रियेवर दिसून आला. नगरपरिषद निवडणूक अधिकारी, कर्मचारी यांनी दिवसभर अर्ज स्वीकृतीसाठी तयारी ठेवली होती.

सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही, व्हिडिओ रेकॉर्डिंग, नामनिर्देशन कक्षांची व्यवस्था याबाबत कोणतीही कमतरता नव्हती. मात्र अर्जदारांच्या अनुपस्थितीमुळे कार्यालयात दिवसभर शांतता होती. राजकीय समीक्षकांचे मत आहे की पहिला दिवस साधारणपणे शांत जातो. बहुतांश उमेदवार शुभमुहूर्त, पक्षाची अधिकृत घोषणा आणि अंतर्गत चर्चांची वाट पाहतात.त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसात अर्ज दाखल प्रक्रियेला वेग येईल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख दि.१७ नोव्हेंबर आहे. ऑनलाईन अर्ज भरणेस अडथळा येत असले बाबत अनेक इछुकांनी सांगितले. आगामी दिवसांत विविध प्रभागांमध्ये कोणाची बाजू जड ठरणार, कोणते नवे चेहरे उभे राहणार, आणि कोणाचे पक्षांतर निश्चित होणार, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.



**ऑनलाईन अर्ज भरण्यास अडथळा**

मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यामध्ये सबमिटचा ऑप्शन क्लोज होत नसल्यामुळे आज अर्ज भरता आला नाही.

- प्रकाश खंदारे, साठे नगर, मंगळवेढा

## कचरेवाडीत युवकाचा चक्कर येऊन झाला मृत्यू

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १० नोव्हेंबर-**

कचरेवाडी येथील एका ३० वर्षीय युवकाचा जागरण गोंधळ कार्यक्रम पाहण्याकरीता गेल्याने अचानक चक्कर येवून मृत्यू झाल्याची घटना घडली असून या घटनेची मंगळवेढा पोलिसात आकस्मात मयत अशी नोंद झाली आहे.



पोलिस सूत्रानी दिलेली माहिती अशी, यातील मयत अजित कोंडीबा अनुसे (वय ३० वर्षे रा.कचरेवाडी) हा दि.९ रोजी रात्री १० च्या सुमारास घराशेजारील भिमराव ठेंगील यांच्या घरी जागरण गोंधळाचा कार्यक्रम असल्याने ते पाहण्याकरीता गेला होता. सदर कार्यक्रम पाहत असताना रात्री १२ वाजता अचानक चक्कर आल्याने तो जमिनीवरती पडला. त्यास उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय मंगळवेढा येथे नेण्यात आले. तेथील डॉक्टरानी त्याला तपासून तो उपचारापुर्वीच मयत झाला असल्याचे सांगितले. याची खबर अनिल कोळेकर यांनी पोलिसात दिली आहे. याचा अधिक तपास पोलिस हवालदार तुकाराम कोळी हे करीत आहेत.



## आगामी निवडणूकीत स्पष्ट बहुमत मिळवा

**धैर्यशील मोहिते-पाटील : मोहोळमध्ये घेतला मेळावा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१० नोव्हेंबर-**

आगामी निवडणुकांमध्ये ७० टक्के तरुणांना संधी देण्याचे पक्षाचे धोरण आहे. स्थानिक आघाडी झाली तरी आपापल्या चिन्हावर सर्वजण लढणार आहेत. या सर्वांना आपण ताकद देऊन पाठिंबा द्यायचा आहे. पक्षाने आदेश दिल्याने जिल्हाभर मी दौरा करत असून आगामी निवडणुकांत स्पष्ट बहुमत मिळवायचे असल्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (शप) काँग्रेसचा मेळावा येथे घेण्यात आला. त्यावेळी खासदार मोहिते-पाटील बोलत होते. यावेळी माजी आमदार रमेश कदम, संजय (आण्णा) क्षीरसागर, ॲड. पवन गायकवाड, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, महिला जिल्हाध्यक्ष शिवपुरेताई, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी, ओबीसी जिल्हाध्यक्ष अरुण तोडकर, मोहोळचे माजी सरपंच अशोक देशमुख आदी उपस्थित होते. माजी आमदार कदम यांनी नगराध्यक्षपद राखीव असल्याने त्या प्रवर्गालाच संधी देण्याचे सुतोवाच केले. जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी आगामी निवडणुकीत आपले यश निश्चित असल्याचे सांगितले. तालुकाध्यक्ष विनय कुमार पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ॲड. इरफान पटेल, विलास पाटील, संभाजी मोटे, नवनाथ गोडसे, फय्याज शेख, भास्कर खटके, दत्ता पाटील, सुनील खराडे, सुनील फाळके, पांडुरंग हराळे, प्रशांत पाटील, सतीश पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## गौडगावात पार्कींगसाठी मुस्लिम भक्ताने दिली मोफत जागा

**हनुमान भक्तांतून होत आहे कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० नोव्हेंबर-**

तालुक्यातील श्रीक्षेत्र गौडगांव बु येथील जागृत दक्षिणमुखी मारुती देवस्थान येथे महाराष्ट्र कर्नाटकसह देशभरातून भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. त्यांच्या वाहन पार्किंगसाठी येथील अपुरी पडत असल्याने येथील निसार शेख या मारुती भक्ताने स्वतःच्या शेतात मोफत वाहन पार्किंगची सोय करून दिल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

अक्कलकोट पासून ११ कि.मी. व अक्कलकोट स्टेशनपासून २ कि.मी. अंतरावर हे देवस्थान आहे. या मारुतीची उपासना केल्याने आपल्या इच्छित मनोकामना पूर्ण होत असल्याची भाविकांची श्रध्दा आहे. ११ शनिवार किंवा ११ मंगळवार येथे न चुकता श्रद्धेने येणारे व व्रत पूर्ण करणारे देशभरातून लाखो भाविक भक्त येथे येतात. येथे समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापित केलेल्या जागृत मारुतीची मूर्ती आहे. येथे गर्दीमुळे भाविकांना पार्किंगची गैरसोय जाणवत होती. ती गैरसोय दूर होण्यासाठी येथील निसार शेख यांनी आपल्या एक एकर शेतात पेरणी न करता दुचाकी व चार चाकी वाहनांसाठी मोफत पार्किंगची सोय केली आहे. श्री. शेख यांनी यापूर्वी १५ लाख रूपयांचा खर्च करत हेलिकॉप्टरने मंदीरावर पुष्पवृष्टीही केली होती. विशेष म्हणजे पुष्पवृष्टी करण्यास स्वतः हेलिकॉप्टरमध्ये न बसता त्यांनी मंदिर समितीचे पुजारी व स्वामी यांना बसवले होते व त्यांच्याच हस्ते पुष्पवृष्टी करायला लावली होती. जातीपातीचे राजकारण करणाऱ्यांना लाजवेल असे कार्य त्यांनी केले आहे.



येथील दक्षिणमुखी जागृत हनुमान देवस्थान माझ्या कुटूंबाचे श्रद्धास्थान आहे. लहानपणी याच मंदिरात भरणाऱ्या जिल्हा परिषद शाळेत मी शिकलो आहे. गावातच लहानाचा मोठा झालो असून जागृत हनुमानामुळे माझे सर्व काही उद्योगधंदे व्यवस्थित चालू आहेत. त्यामुळे हेलिकॉप्टरने या मंदिरावर पुष्पवृष्टी केली. याशिवाय थोड्याच दिवसात स्वतःच्या अर्धा एकर शेतात मी अन्नछत्रासाठी जागा देऊन त्याचे बांधकाम करून देणार आहे.

- **निसार शेख**, निःसीम हनुमान भक्त तथा उद्योगपती

## मोहोळमध्ये भाजपाचा झेंडा नक्की फडकणार

**माजी आमदार राम सातपूते : माजी आमदार राजन पाटील यांच्यामुळे होईल फायदा; इच्छुकांनी दिली मुलाखत**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, १० नोव्हेंबर-**

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांच्या भाजपा पक्ष प्रवेशामुळे पक्षाला चांगली च ताकद मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ नगरपरिषद व अनगर नगरपंचायत या दोन्ही ठिकाणी भाजपा कमळ या चिन्हावर लढेल आणि भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकविला जाईल असे प्रतिपादन सोलापूर पूर्व निवडणूक प्रमुख माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी केले.



भारतीय जनता पार्टी, मोहोळ शहर यांच्या वतीने मोहोळ नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, माजी आमदार राजन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश चवरे, सुरेश राऊत, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, जिल्हा चिटणीस महेश सोवनी, तालुकाध्यक्ष सतीश काळे, रमेश माने, सोमेश क्षीरसागर, मोहोळ नगरपरिषद निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर आदींच्या उपस्थितीत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या मुलाखती प्रसंगी जवळ जवळ७० ते८० इच्छुक उमेदवारांनी नगरसेवक या पदासाठी तर १२ इच्छुकांनी नगराध्यक्ष पदासाठी मुलाखती दिल्या.

त्या प्रसंगी माजी आमदार रामभाऊ सातपुते माध्यमांशी बोलत होते. भाजपा तिकीटावर निवडणूक लढण्यास इच्छुकांनी केलेल्या गर्दी, उत्साह आणि जल्लोषामुळे भाजपा मध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झालेले पहावयास मिळाले. या पूर्वी माजी आमदार राजन पाटील यांना राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या कोट्यातून सहकार परिषदेचे अध्यक्षपद दिले होते. आत्ता ते भाजपाच्या कोट्यातून दिले जाईल.जरी त्यांनी राजीनामा दिला असला तरी मंजूर करण्याचे अधिकार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आहेत. आणि तो राजीनामा मंजूर होऊ नये यासाठी मी आग्रह धरणार आहे. असे ही माजी आमदार सातपुते यांनी यावेळी सांगितले.

**निवडून येण्याची क्षमता असणाऱ्यांना उमेदवारी मिळेल**

सोलापूर जिल्हा निवडणूक प्रभारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक प्रमुख माजी आमदार रामभाऊ सातपुते, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण व माजी आमदार राजन पाटील यांनी मोहोळ नगरपरिषदेसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या,७० ते८० जणांनी नगरसेवक तर १२ जणांनी नगराध्यक्ष पदासाठी मूलाखती दिल्या,हा अहवाल जिल्हा पातळीवर क्रम देऊन तो अहवाल प्रदेश कार्यलयाकडे जाईल आणि त्या ठिकाणी निवडून येण्याची क्षमता असणाऱ्या उमेदवाराला उमेदवारी दिली जाईल.

- **सुशील क्षीरसागर, मोहोळ नगरपरिषद निवडणूक प्रभारी**

**यांनी दिल्या नगराध्यक्षपदासाठी मुलाखती**

शीतल सुशील क्षीरसागर, सरिता संतोष सुरवसे, सुनीता छगन अष्ठूळ, सारिका किसन गायकवाड, साक्षी रोहित फडतरे, लक्ष्मी संतोष खंदारे, यशोदा दिलीप कांबळे, शोभा नागनाथ सोनवणे, स्मिता प्रकाश कोकणे, शुभांगी नागनाथ क्षीरसागर, वर्षा गौतम क्षीरसागर, मनीषा विक्रम फडतरे.

## पंढरपूर मंदिरास कार्तिकीत यंदा ५ कोटी १८ लाखाचे उत्पन्न

**मागील वर्षीपेक्षा १ कोटी ६२ लाखांची वाढ**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१० नोव्हेंबर -**

कार्तिकी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी पाच कोटी १८ लाख रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले असून मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी दिली.

२२ ऑक्टोंबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ४८ लाख ८ हजार २८९ रुपये अर्पण, १ कोटी २७ लाख १९ हजार ५२० रुपये देणगी, ५४ लाख १६ हजार ५०० रुपये लाडू प्रसाद विक्री, ७१ लाख ५९ हजार ९१० रुपये भक्तनिवास, १ कोटी ७७ लाख १५ हजार २२७ हुंडीपेटी, ५० हजार रुपये पुजा ३३ लाख ३६ हजार ८७६ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ६ लाख ७० हजार ९०६ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले. यातून पुरेशा सुविधा देणार असल्याचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगीतले.

**मागील वर्षीचे मिळालेले उत्पन्न**

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ४१ लाख ४१ हजार ३१४ रुपये अर्पण, १ कोटी १६ लाख ९९ हजार ४७३ रुपये देणगी, ६ लाख ६४ हजार ६२० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४लाख ४४ लाख ४८ हजार ५८१ रुपये भक्तनिवास, ७३ लाख ५६ हजार १०४ रुपये हुंडीपेटी, १० लाख ७२ हजार ६८१ रूपये पुजा तसेच ५ लाख ४ हजार १५ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ४ लाख ६० हजार ५३४ रुपये उत्पन्न प्राप्त झाले होते.

**१ कोटी ६२ लाख रुपयांची झाली वाढ**

सन २०२४ च्या कार्तिकी यात्रेत रू. ३ कोटी ५७ लाख ४७ हजार ३२२ रुपये व या वर्षीच्या यात्रेत. ५ कोटी १८ लाख ७७ हजार २२८ रुपये इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत १ कोटी ६१ लाख २९ हजार ९०६ रुपये इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.